CMYK

सोलापूर

# तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT


न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | शनिवार, १६ मे २०२६ । वर्ष ४ थे अंक ६८ । पाने १२ । किंमत रु. ८/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

▌dainiktarunbharat.com
▌epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



नि आपले प्रकल्प फक्त 'प्रकल्प' नाहीत. ते साधन आहेत, साध्य नाहीत. आपले साध्य आहे, 'युगानुकूल सामाजिक परिवार' निर्माण करण्याचे. आपल्या या प्रयोगातून प्रत्येक व्यक्ती समाजोन्मुख होईल, ती सामाजिक जबाबदारी पार पाडेल.

**- स्व. लक्ष्मणराव भिडे**
रा. स्व. संघाच्या विश्व विभागाचे पूर्व संयोजक आणि दीनदयाल शोध संस्थानचे पूर्व अध्यक्ष

# धार भोजशाला सरस्वती मंदिरच




### निकालातील महत्त्वाचे मुद्दे

- धार भोजशाला परिसर संरक्षित स्मारक असून ते एक मंदिर आहे
- हिंदूंना या ठिकाणी पूजा करण्याचा पूर्ण अधिकार
- सरकारने तेथे पुन्हा संस्कृत शिक्षणाची व्यवस्था करण्याचा विचार करावा
- वाग्देवीची (सरस्वतीची) मूर्ती भारतात परत आणून मंदिरात स्थापित करावी
- मुस्लिम पक्ष सरकारकडे मशिदीसाठी जागेची मागणी करू शकतो.

## ● हिंदूंना पूजेचा अधिकार; नमाजचा आदेश रद्द ● एएसआयच्या अहवालावर शिक्कामोर्तब

**◆ धार, १५ मे**

मध्यप्रदेशातील धार येथील भोजशाला मंदिर-कमल मौला मशीद हे सरस्वतीचेच मंदिर असून तेथे हिंदूंना पूजेचा अधिकार असल्याचा निकाल मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी दिला. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाच्या अहवालानुसार भोजशाला मंदिर असल्याचे निष्पन्न होत असल्याने या जागेवर नमाज पठण करता येणार नाही, असेही न्यायालयाने आदेशात स्पष्ट करत जैन समुदाय आणि मुस्लिम पक्षाच्या याचिका फेटाळून लावल्या.

ऐतिहासिक दस्तऐवज आणि पुरावे लक्षात घेता, या जागेवरील हिंदूंच्या पूजेचा हक्क कधीही संपुष्टात आलेला नाही, असे निरीक्षणही निकालावेळी न्यायालयाने नोंदवले.

१२ मे रोजी न्यायालयाने या प्रकरणावरील निकाल राखून ठेवला होता. भोजशाला प्रकरणात न्यायालयाने या परिसराला देवी वाग्देवीला समर्पित मंदिर म्हणून मान्यता दिली. तसेच, मशिदीच्या बांधकामासाठी मुस्लिम समुदायाला वेगळी जागा द्यावी, असे निर्देश राज्य सरकारला दिले. निकालानंतर धारमध्ये सुरक्षा वाढवण्यात आली आहे. भोज उत्सव समितीचे अध्यक्ष सुमित चौधरी यांनी न्यायालयाच्या निर्णयावर आनंद व्यक्त करत यास हिंदू समाजाच्या दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाचा विजय म्हटले. ते पुढे म्हणाले, १९३५ मध्ये हिंदू भोज समितीची स्थापना करणाऱ्या कार्यकर्त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य या प्रश्नासाठी समर्पित केले होते. ◂(वृत्तसंस्था)

### हिंदू पक्षाने सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट केले दाखल

हिंदू पक्षाने धार भोजशाला संकुल प्रकरणात सर्वोच्च न्यायालयात कॅव्हेट याचिका दाखल केली. या याचिकेत मागणी करण्यात आली आहे की, मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरुद्ध दाखल केलेल्या कोणत्याही अपिलावर हिंदू पक्षाचे म्हणणे ऐकल्याशिवाय कोणताही आदेश पारित करू नये. ही कॅव्हेट जितेंद्र सिंह विशेन यांच्या वतीने वकील बरुण कुमार सिन्हा यांच्यामार्फत दाखल करण्यात आली आहे. जितेंद्र हे या प्रकरणातील सहावे याचिकाकर्ते होते, ज्यावर इंदूर येथील मध्य प्रदेश उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने शुक्रवारी आपला निकाल दिला.

### भोजशाला संस्कृत शिक्षणाचे केंद्र

**न्यायालयाने निकालात म्हटले की, ऐतिहासिक साहित्य आणि कागदपत्रांवरून स्पष्ट होते की, ही वास्तू जागा परमार राजवंशातील राजा भोज यांच्या काळातील भोजशाला असून, ते संस्कृत अध्ययनाचे एक प्रमुख केंद्र होते. राजा भोज यांच्या काळातील साहित्यिक आणि वास्तुकलेचे संदर्भ या ठिकाणी देवी सरस्वतीचे मंदिर अस्तित्वात असल्याचे दर्शवतात.**

### संकुलाला राजा भोज यांची मालमत्ता म्हणून मान्यता

धार भोजशाला प्रकरणासंदर्भात वकील विष्णू शंकर जैन यांनी सांगितले की, इंदूर उच्च न्यायालयाने आपल्या ऐतिहासिक निकालात, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण (एएसआय) चा ७ एप्रिल २००३ चा आदेश अंशतः रद्द केला. याशिवाय न्यायालयाने भोजशाला संकुलाला राजा भोज यांची मालमत्ता म्हणून मान्यता दिली. लंडनमधील संग्रहालयात असेलेल्या सरस्वतीच्या मूर्तीला परत आणण्यासंदर्भात सरकारला विचार करण्याचे निर्देश दिले.

### निकालाला आव्हान देणार

**मुस्लिम पक्षाच्या वतीने, शहर काझी वकार सादिक यांनी सांगितले की, न्यायालयाच्या निर्णयाचा अभ्यास केल्यानंतर आणि त्यात काही त्रुटी आढळल्यास मुस्लिम समाज सर्वोच्च न्यायालयात आव्हान देईल. दुसरीकडे कमाल मौला मशीद नमाज इंतझामिया समितीचे प्रतिनिधी झुल्फिकार पठाण म्हणाले, आम्ही अद्याप आदेश वाचलेला नाही. आदेशाचा आढावा घेऊन निर्णय पुढील घेणार आहोत.**

## पेट्रोल-डिझेलच्या दरात प्रति लिटर तीन रुपयांनी वाढ

**◆ नवी दिल्ली, १५ मे**

पेट्रोल आणि डिझेल प्रति लिटर तीन रुपयांनी महाग झाले. हे नवीन दर १५ मे पासून लागू झाले आहेत. सुमारे दोन वर्षांनंतर दरांमध्ये ही वाढ करण्यात आली आहे. या वाढीचे मुख्य कारण आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीतील चढ-उतार आहे.

इराण आणि अमेरिकेतील युद्ध सुरू होण्यापूर्वी क्रूड ऑइलचे दर ७० डॉलर्स होते. ते आता वाढून १०० डॉलर्स प्रति बॅरलच्या पुढे गेले आहेत. क्रूडच्या किमती वाढल्याने तेल कंपन्या दबावाखाली होत्या. यामुळे कंपन्यांनी तोट्याची भरपाई करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये दीर्घकाळ वाढ कायम राहिली, तर पेट्रोल-डिझेलच्या किमती आणखी वाढू शकतात. देशात पेट्रोल आणि डिझेलच्या किमती मार्च २०२४ पासून स्थिर होत्या. सरकारच्या मते, इंडियन ऑइल, भारत पेट्रोलियम आणि हिंदुस्तान पेट्रोलियम यांसारख्या सरकारी कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे तोट्यात चालल्या होत्या.


**भारतात इंधन स्वस्त : रिजिजू**

होर्मुझ सामुद्रधुनीतील तणाव आणि मध्यपूर्वेतील संघर्षामुळे जागतिक बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढले असतानाही देशात आतापर्यंत पेट्रोल, डिझेलच्या दरात वाढ झालेली नव्हती. मात्र परिस्थिती अजूनही कायम असल्याने सरकारने आर्थिक स्थिरता आणि जनकल्याण यांच्यात संतुलन राखत इंधन दरात वाढ केली असल्याचे केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे. ◂(वृत्तसंस्था)



## महत्त्वाचे

### शेअर बाजारातही मोठी पडझड



**मुंबई** : भारतीय चलन रुपयाची विक्रमी घसरण आणि आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे शुक्रवारी भारतीय शेअर बाजाराने सुरुवातीची सर्व कमाई गमावली. पश्चिम आशियातील वाढत्या तणावाच्या पृष्ठभूमीवर गुंतवणूकदारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. यामुळे सेन्सेक्स आणि निफ्टी या दोन्ही निर्देशांकांमध्ये मोठी घसरण झाली. दिवसभराच्या व्यवहारादरम्यान सेन्सेक्स उच्चांकावरून तब्बल ७३१ अंकांनी कोसळला. निफ्टी ५० निर्देशांकाने २३,८३९ अंकांचा उच्चांक गाठल्यानंतर तो २३,६१० अंकांपर्यंत खाली आला होता. अखेर बाजार बंद होताना सेन्सेक्स १६१ अंकांनी घसरून ७५,२३८ वर स्थिरावला, तर निफ्टी ४५ अंकांनी घसरून २३,६४३ अंकांवर बंद झाला. परकीय चलन बाजारात रुपयाची स्थिती अत्यंत चिंताजनक राहिली.

### डॉलरच्या तुलनेत रुपया ९६.१४ वर

**नवी दिल्ली** : रुपया डॉलरच्या तुलनेत शुक्रवारी ३० पैशांनी घसरून ९६.१४ च्या विक्रमी नीचांकी पातळीवर पोहोचला. यापूर्वी गुरुवारी रुपया ९५.६४ च्या सर्वकालीन नीचांकी पातळीवर पोहोचला होता. मागील काही दिवसांपासून रुपयामध्ये सातत्याने घसरण सुरू आहे. २०२६ च्या सुरुवातीपासूनच रुपया दबावाखाली आहे. मागील वर्षी डिसेंबर २०२५ मध्ये पहिल्यांदाच रुपया ९० च्या पातळीच्या वर गेला होता. यामुळे महागाई वाढण्याचा धोका वाढला आहे. कच्च्या तेलाच्या किमती अशाच वाढत राहिल्या आणि भू-राजकीय तणाव कमी झाला नाही, तर रुपया लवकरच १०० च्या पातळीलाही स्पर्श करू शकतो, असे मत बाजार तज्ज्ञांचे आहे.

### मान्सून २६ मे रोजी केरळात होणार दाखल

**नवी दिल्ली** : यंदा नैऋत्य मान्सून वेळेआधीच केरळात दाखल होण्याची शक्यता आहे, अशी माहिती भारतीय हवामान विभागाने दिली. हवामान खात्याच्या अंदाजानुसार २६ मे रोजी मान्सून केरळ किनारपट्टीवर पोहोचू शकतो. भारतीय हवामान विभागाच्या माहितीनुसार, पुढील ४८ तासांत दक्षिण अंदमान समुद्र, बंगालचा उपसागर आणि अंदमान-निकोबार बेटां ध्ये मान्सूनच्या आगमनासाठी अनुकूल वातावरण तयार होत आहे. १६ मेच्या आसपास मान्सून अंदमान परिसरात दाखल होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. २६ मे रोजी मान्सून केरळात दाखल होणार असल्याचा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. याचबरोबर ईशान्य भारत आणि दक्षिण भारतातील काही राज्यां ध्ये पुढील चार ते पाच दिवस मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

# नीट फेरपरीक्षा २१ जूनला

- शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांची घोषणा
- पुढील वर्षीची परीक्षा ऑनलाईन होणार

**◆ नवी दिल्ली, १५ मे**

वैद्यकीय प्रवेशासाठी आवश्यक असलेली नीट युजीची फेर परीक्षा २१ जूनला घेण्याची घोषणा शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी शुक्रवारी केली.

तीन मूर्ती मार्ग स्थित आपल्या निवासस्थानी आयोजित पत्रपरिषदेत प्रधान म्हणाले की, २१ जूनला होणाऱ्या नीटच्या फेरपरीक्षेचे प्रवेशपत्र विद्यार्थ्यांना १४ जूनपर्यंत उपलब्ध करून दिल्या जातील.

पुढील वर्षी नीट परीक्षा ओएमआर शीट ऐवजी संगणकाच्या माध्यमातून घेतली जाईल. यावर्षी नीटची फेरपरीक्षा देणारे विद्यार्थी परीक्षेसाठी त्यांच्या पसंतीच्या तसेच सोयीच्या शहराची निवड करु शकतील, याकडे लक्ष वेधत प्रधान म्हणाले की, यासाठी त्यांना एक आठवड्याचा अवधी दिला जाईल. जेणेकरुन त्यांना आवश्यक तो निर्णय घेता येईल.

यावर्षी ३ मेला नीटची परीक्षा



झाली होती, त्यानंतर या परीक्षेत काही गडबडी झाल्याच्या तक्रारी ७ मेला समोर आल्या, त्यावर तातडीने चौकशी करण्यात आली, त्यात संभाव्य प्रश्नपत्रिकेच्या नावावर मुळ प्रश्नपत्रिका बाहेर आल्याचे म्हणजे पेपर फुटल्याचे स्पष्ट झाले, असे ते म्हणाले.

शिक्षण माफियाच्या या कृत्याचा फटका प्रामाणिक आणि मेहनती विद्यार्थ्यांना बसू नये, अशी सरकारची भूमिका आहे, त्यामुळे सरकारने फेरपरीक्षेचा निर्णय घेतला, असे प्रधान म्हणाले. विद्यार्थ्यांच्या हिताचे संरक्षण करण्याला सरकारची सर्वोच्च प्राथमिकता असून परीक्षा पूर्णपणे नि:ष्पक्ष आणि पारदर्शी वातावरणात घेतली जाईल, असा निर्वाळा त्यांनी दिला.

### विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाचे निर्णय

- १४ जूनपर्यंत प्रवेश पत्र उपलब्ध होणार
- पसंतीनुसार परीक्षा केंद्र, शहर निवडण्याचे स्वातंत्र्य
- पेपर सोडविण्यासाठी देणार अतिरिक्त १५ मिनिटांचा वेळ
- ही परीक्ष दुपारी २ ते सायंकाळी ५.१५ या वेळेत पार पडेल
- परीक्षा शुल्क परत करणार

**सरकारला चूक मान्य**

दोषींना कठोरातील कठोर शिक्षा देण्याची सरकारची भूमिका आहे, शिक्षण माफियांविरुध्दचा सरकारचा लढा सुरुच राहील.नीट युजी परीक्षेच्या सुरक्षेत चूक झाली. एनटीएच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. सरकार आपली चूक मान्य करत असल्याचे धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटले आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

**नीट पेपरफूट प्रकरण**

## मास्टरमाईंड पुण्यातून सीबीआयच्या जाळ्यात

**◆ पुणे, १५ मे**

देशभरात गाजत असलेल्या नीट-यूजी २०२६ परीक्षेच्या पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने महत्त्वाची कारवाई केली आहे. या प्रकरणातील मास्टरमाईंड असलेला रसायनशास्त्राचा प्राध्यापक पी. व्ही. कुलकर्णी (रा. लातूर) याला पुण्यातून अटक करण्यात आली आहे. कुलकर्णी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए)च्या परीक्षा प्रक्रियेशी संबंधित होता. सीबीआयच्या तपासानुसार, त्याच्यामार्फतच प्रश्नपत्रिका फुटल्याचा दावा करण्यात आला आहे.

सीबीआयच्या तपासात समोर आले की, एप्रिल २०२६ च्या शेवटच्या आठवड्यात कुलकर्णीने आरोपी मनीषा वाघमारेच्या मदतीने काही विद्यार्थ्यांना एकत्र केले. त्यानंतर पुण्यातील त्याच्या निवासस्थानी विशेष मार्गदर्शन वर्ग घेण्यात आले. या वर्गांमध्ये कुलकर्णीने विद्यार्थ्यांना प्रश्न, पर्याय आणि योग्य उत्तरे थेट सांगितल्याचा आरोप आहे. विद्यार्थ्यांनी हे प्रश्न आपल्या वहीत हस्तलिखित स्वरूपात नोंदवून ठेवले होते. ३ मे रोजी झालेल्या नीट-यूजी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेशी या नोंदी तंतोतंत जुळल्याचे सीबीआयने स्पष्ट केले आहे. कुलकर्णीला सखोल चौकशीनंतर पुण्यात अटक करण्यात आली. गेल्या २४ तासांत सीबीआयने देशभरातील विविध ठिकाणी छापे टाकून महत्त्वाची कागदपत्रे, इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि मोबाईल फोन जप्त केले आहेत. जप्त साहित्याचे फॉरेन्सिक आणि तांत्रिक विश्लेषण सुरू आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# पुण्यात बॉम्ब ठेवणाऱ्या आरोपीला पुलगाव रेल्वेस्थानकावरून अटक

### पुणे एटीएसची मोठी कारवाई

**◆ नागपूर, १५ मे**

पुण्यातील हडपसर परिसरामध्ये उषाकिरण रुग्णालयाजवळ बॉम्ब ठेवणाऱ्या आरोपीला पुणे एटीएसने वर्धा जिल्ह्यातील पुलगाव रेल्वेस्थानकावरून अटक केली. आरोपी हा रेल्वेगाडी क्रमांक १८०२९ शालिमार एक्सप्रेसने पळून जाण्याच्या प्रयत्नात होता. या अटकेमुळे पुण्यातील बॉम्ब प्रकरणाच्या तपासाला आता वेग येणार असून आरोपीची चौकशी सुरू करण्यात आली आहे. शिवाजी राठोड असे एटीएसने अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे. आरोपीला पुलगाव येथून अटक केल्यानंतर लवकरच पुण्यात नेण्यात येणार आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पुण्याच्या हडपसर भागातील कामधेनू सोसायटीच्या पार्किंग एरियामध्ये बॉम्बसदृश वस्तू आढळून आली होती. रुग्णालयाजवळ ही वस्तू सापडल्याने पुणे शहरात भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. सोसायटीच्या पार्किंगमध्ये बेवारस पडलेली ही संशयास्पद वस्तू स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आली होती. नागरिकांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली. त्यानंतर संपूर्ण सुरक्षा यंत्रणेने वेगाने हालचाली केल्या होत्या. पोलिस पथकांसह बॉम्ब शोधक आणि नाशक पथक घटनास्थळी रवाना झाले होते. बॉम्ब शोधक



पथकाकडून संशयास्पद वस्तूची अतिशय बारकाईने तपासणी करण्यात आली असता ती वस्तू बॉम्बसदृश असल्याचे निष्पन्न झाले होते.

**सीसीटीव्ही फुटेजमधून आरोपीचा सुगावा**

पुण्यातील उषाकिरण हॉस्पिटलच्या पार्किंग परिसरात ही बॉम्बसदृश वस्तू नेमकी कोणी ठेवली, यासाठी पुणे पोलिसांनी तातडीने एक विशेष तपास मोहीम सुरू केली होती. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या साहाय्याने आरोपीचा शोध घेतला. सीसीटीव्हीमध्ये आरोपीचा चेहरा स्पष्टपणे दिसला. त्यानंतर आरोपीला पकडण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. प्राथमिक तपासादरम्यान मिळालेल्या माहितीच्या आणि तांत्रिक पुराव्यांच्या आधारे पोलिसांना आरोपी रेल्वेगाडीने पळून जात असल्याचा सुगावा लागला. ◂(तभा वृत्तसेवा)

## अमेरिकेहून येणाऱ्या मुलीला घेण्यासाठी जाणे पडले महागात

### १४ तोळ्यांच्या दागिन्यांसह

### १० लाखांची घरफोडी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि.१५ मे-**

अमेरिकेहून येणाऱ्या मुलीला घेण्यासाठी म हागात पडल्याची घटना जुळे सोलापुरात घडली. यात १४ तोळ्याचे सोन्याचे, ३० तोळयाच्या चांदीच्या दागिन्यांसह १० लाखांची घरफोडी करण्यात आली. याप्रकरणी रेवती तमशेट्टी (वय-६३, रा.गीता नगर, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर) यांनी विजापूर नाका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.




यातील फिर्यादी रेवती तमशेट्टी ह्या ११ मे रोजी घराला कुलुप लावून म ुलीला आणण्यासाठी गेल्या होत्या. याचीच संधी साधून चोरट्याने घराचे कुलूप तोडून कपाटातील १४ तोळे सोन्याचे दागिने, ३० तोळे चांदीचे साम ान आणि रोख रक्कम मिळून ९ लाख ५७ हजार रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेले, असे फिर्यादीत म्हटले आहे. सहाय्यक पोलीस निरीक्षक गायकवाड हे पुढील तपास करीत आहेत.

# एआय क्षेत्रात १० हजार कोटींची गुंतवणूक

● महाराष्ट्राचे पहिले एआय धोरण जाहीर ● दीड लाख रोजगाराचे लक्ष्य

**◆ नागपूर, १५ मे**

कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) क्षेत्रात विकास, गुंतवणूक आणि प्रशासनातील वापर वाढवण्यासाठी राज्य शासनाने पहिले 'महाराष्ट्र कृत्रिम बुद्धिमत्ता धोरण- २०२६' जाहीर केले आहे. इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाने नुकताच हा शासन निर्णय जाहीर केला आहे. काहीच दिवसांपूर्वी मंत्रिमंडळाने या धोरणाला मंजुरी दिली होती.

उद्योग, प्रशासन, आरोग्य, शेती, शिक्षण, वाहतूक आणि डिजिटल सेवा यांसारख्या विविध क्षेत्रांमध्ये एआयचा व्यापक




वापर करण्यावर भर देण्यात आला आहे. धोरणानुसार २०३०-३१ पर्यंत एआय क्षेत्रात १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. तसेच एआय आणि त्याच्याशी संबंधित क्षेत्रांमध्ये १.५ लाखांहून अधिक प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार निर्मिती करण्याची योजना आहे.

एआय पायाभूत सुविधा उभारणीसाठी राज्यात किमान २ हजार 'ग्राफिक प्रोसेसिंग युनिट' उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यापैकी १ हजार युनिट एका एआय क्लस्टरमध्ये उपलब्ध राहतील. यासाठी 'कॉम्प्युटर अॅज अ सर्व्हिस' हे डिजिटल व्यासपीठ विकसित करण्यात येणार आहे. त्याद्वारे शासकीय विभाग, शैक्षणिक संस्था, संशोधक, स्टार्टअप्स आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना एआय संगणकीय सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.

राज्यात 'महाराष्ट्र सेंटर फॉर अॅडव्हान्स्ड एआय ट्रेनिंग' स्थापन करून विद्यार्थी, व्यावसायिक आणि उद्योजकांना उद्योगाभिमुख प्रशिक्षण दिले जाणार आहे. यासाठी जागतिक तंत्रज्ञान संस्था आणि नामांकित शैक्षणिक संस्थांसोबत भागीदारी केली जाणार आहे. एआय अंमलबजावणीसाठी सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना २० टक्के आणि प्रतिउद्योग कमाल ५ लाख रुपयांपर्यंत देण्यात येणार आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

### राज्यभरात ५० एआय प्रकल्प




**राज्यातील प्रत्येक प्रशासकीय विभागात एआयचा वापर करण्यासाठी यंत्रणा विकसित करण्यासोबतच राज्यभरात किमान ५० एआय प्रकल्प राबवण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.**

### मराठी भाषेचा डेटा सेट




**धोरणात मराठी भाषा आणि स्थानिक बोलींवर आधारित डेटा सेट विकसित करण्यालाही प्राधान्य देण्यात आले आहे. मराठी भाषेतील व्हॉईस-आधारित सेवा, संवादात्मक एआय आणि डिजिटल सार्वजनिक सेवा विकसित करण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.**

### 'महाराष्ट्र एआय मिशन'ची स्थापना



**राज्य शासन 'महाराष्ट्र एआय मिशन' स्थापन करणार असून ते इलेक्ट्रॉनिक्स, माहिती तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्ता विभागाच्या अधिपत्याखाली कार्य करेल. नैतिक आणि जबाबदार एआय वापरासाठी स्वतंत्र अनुपालन आराखडाही तयार करण्यात येणार आहे.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## महत्त्वाचे

### मुरुगानंथम एम. नागपूर मनपाचे अतिरिक्त आयुक्त

**मुंबई :** महाराष्ट्र शासनाने राज्यातील सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचा धडाका कायम ठेवला असून, सामान्य प्रशासन विभागाने जारी केलेल्या ताज्या आदेशानुसार गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुरुगानंथम एम. यांची नियुक्ती आता नागपूर महानगरपालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी करण्यात आली आहे. तसेच, क्रीडा व युवक कल्याण आयुक्त शीतल तेली-उगले यांची पुणे विभागीय आयुक्तपदी बदली झाल्याने, त्यांच्या जागी आता दीपक सिंगला पुण्याच्या क्रीडा आयुक्तालयाची सूत्रे हाती घेतील. तसेच, पुण्याचे मावळते विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांची मुंबईत अत्यंत महत्त्वाच्या अशा राज्य ग्रामविकास आणि पंचायत राज विभागाच्या सचिवपदी बदली करण्यात आली आहे. गोंदिया जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून ग्रामीण भागात काम केल्यानंतर, आयएएस मुरुगानंथम एम. आता नागपूर महापालिकेत अतिरिक्त आयुक्त म्हणून आपला कार्यभार स्वीकारतील. राज्यातील एकूण ५२ वरिष्ठ अधिकाऱ्यांची बदली आणि पदोन्नती करण्यात आली. तसेच रापोसे संवर्गातील ४४ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

### २८ ओलिसांची सुटका

**इंफाळः** मणिपूरच्या कांगपोकपी आणि सेनापती जिल्ह्यांमध्ये सशस्त्र गटांनी कथितरित्या ओलीस ठेवलेल्या २८ जणांची सुटका पोलिस, नागरी समाज संघटना आणि स्थानिक प्रशासनाच्या प्रयत्नांनंतर करण्यात आली, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्यांनी शुक्रवारी सांगितले. राज्यातील अलीकडील हिंसक घटना आणि अपहरणांमुळे डोंगराळ जिल्ह्यांतील नागरिकांच्या सुरक्षेबाबत चिंता वाढली आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, संशयित दहशतवाद्यांनी बुधवारी वेगवेगळ्या हल्ल्यांमध्ये अनेक लोकांना अज्ञात ठिकाणी ओलीस ठेवले होते. कांगपोकपी जिल्ह्यात तीन चर्च नेत्यांची गोळ्या घालून हत्या करण्यात आली, तर इतर चार जण जखमी झाले. शेजारच्या नोने जिल्ह्यात एका नागरिकाचा मृत्यू झाला आणि त्याची पत्नी जखमी झाली. तर कोन्साखुल गावातील १२ नागा महिलांना सशस्त्र दहशतवाद्यांनी ओलीस ठेवले होते, त्यांची माखन गावात सुटका करण्यात आली.

# पॉलिटेक्निक प्रवेश २० मेपासून!

## तंत्र शिक्षण संचालनालयाचे कालबद्ध नियोजन; चंद्रकांतदादा पाटील यांची घोषणा

**मुंबई, १५ मे**

दहावीच्या निकालानंतर आता विद्यार्थ्यांचे लक्ष लागलेल्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी व तंत्रज्ञान तसेच वास्तुकला पदविका (पॉलिटेक्निक) अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा मुहूर्त अखेर ठरला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची ही प्रवेश प्रक्रिया २० मे २०२६ पासून सुरू होणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांनी दिली. ही प्रक्रिया वेळेत आणि सुटसुटीत पार पाडण्यासाठी तंत्र शिक्षण संचालनालयाने कालबद्ध नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले.

दहावीनंतर तीन वर्षांचा पदविका अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उद्योग क्षेत्रात मोठ्या संधी उपलब्ध आहेत. तंत्रशिक्षणाचे महत्त्व विषद करताना मंत्री पाटील म्हणाले की, या शाखेतून विद्यार्थ्यांना केवळ अभियंताच नव्हे, तर यशस्वी उद्योजक होण्याचीही संधी मिळते. अनेक विद्यार्थ्यांना कॅम्पस प्लेसमेंटच्या माध्यमातून प्रति महिना १ लाख रुपयांपर्यंत पगाराच्या नोकऱ्या मिळाल्या आहेत, ज्यामुळे हा अभ्यासक्रम विद्यार्थ्यांसाठी एक उत्तम पर्याय ठरत आहे. प्रवेश प्रक्रियेचे सविस्तर वेळापत्रक, नावनोंदणी आणि अर्ज भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी तंत्र शिक्षण संचालनालयाच्या अधिकृत संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन पाटील यांनी केले आहे. (तभा वृत्तसेवा)

### अभ्यासक्रमाची खास वैशिष्ट्ये

- **द्विभाषिक शिक्षण:** विद्यार्थ्यांना आता मराठी आणि इंग्रजी अशा दोन्ही भाषेतून शिक्षण व परीक्षेचा पर्याय उपलब्ध असेल.
- **उदयोन्मुख तंत्रज्ञान:** अभ्यासक्रमात आता एआय, मशिन लर्निंग, रोबोटिक, ५जी, ड्रोन तंत्रज्ञान, आणि ईव्ही तंत्रज्ञान यांसारख्या आधुनिक विषयांचा समावेश करण्यात आला आहे.
- **कौशल्य विकास:** सॉफ्ट स्किल्स, योग, उद्योजकता विकास आणि १२ आठवड्यांचे औद्योगिक प्रशिक्षण यामुळे विद्यार्थी उद्योगांसाठी सज्ज होतील.
- **क्रेडिट्स:** नॅशनल अकॅडमिक डिपॉझिटरीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचे क्रेडिट्स अकॅडमिक बँक ऑफ क्रेडिट्समध्ये जमा होतील.

### प्रवेशाचा टक्का वाढला

**तंत्रशिक्षण संचालनालयाच्या विविध उपक्रमांमुळे गेल्या काही वर्षांत पदविका प्रवेशाचा आलेख उंचावला आहे. शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ८० टक्क्यांवर असलेले प्रवेश २०२५-२६ मध्ये ९५ टक्क्यांपर्यंत पोहोचले आहेत.**




उबाठाचे खासदार संजय राऊत यांनी देशातील युवकांच्याविरोधात केलेल्या वक्तव्याचा निषेध करण्यासाठी शुक्रवारी युवा सेनेच्या कार्यकर्त्यांनी ठाणे येथे आंदोलन केले

# एलपीजी, कच्च्या तेलाचा अबाधित पुरवठा

## भारत- यूएईत सामंजस्य करार ● पाच अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा

**अबू धाबी, १५ मे**

संयुक्त अरब अमिरातीच्या (यूएई) दौऱ्यावर असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची शुक्रवारी राष्ट्राध्यक्ष मोहम्मद बिन झायद अल नाहयान यांच्यासोबत द्विपक्षीय बैठक झाली. दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या चर्चेनंतर भारत आणि यूएईमध्ये एलपीजी आणि कच्च्या तेलाचा पुरवठा अबाधित ठेवण्यावर करार झाला. याशिवाय सामरिक पेट्रोलियम साठे, संरक्षण सहकार्य आणि वडीनार येथील जहाज दुरुस्ती क्लस्टरबाबतही सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. यावेळी नाहयान यांनी भारतातील आरबीएल बँक आणि सन्मान कॅपिटलमध्ये पाच अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा केली. यूएईच्या सीमेत दाखल होताच पंतप्रधान मोदींच्या विमानाला एफ-१६ लढाऊ विमानांनी संरक्षण दिले.



पाच देशांच्या परदेश दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात मोदी यूएईची राजधानी अबू धाबी येथे दाखल झाले. विमानतळावर उतरल्यावर अबू धाबीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी पंतप्रधानांचे भव्य स्वागत केले. यावेळी मोदींना मानवंदना देण्यात आली. नाहयान यांनी पंतप्रधानांची भेट घेतली. यावेळी दोन्ही नेत्यांमध्ये झालेल्या बैठकीत ऊर्जा सुरक्षा, व्यापार, गुंतवणूक आणि पश्चिम आशियातील परिस्थितीवर चर्चा केल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनातून दिली. ब्रिक्स संघटनेचे भागीदार असलेल्या भारत आणि युएईने यावेळी सामरिक संरक्षण सहकार्य, एलपीजी आणि कच्च्या तेलाचा अबाधित पुरवठा सुरू ठेवणे आणि गुजरातच्या वडीनार येथे जहाज दुरुस्ती क्लस्टर स्थापन करण्यासाठी दोन्ही नेत्यांच्या उपस्थितीत द्विपक्षीय करारावर स्वाक्षरी झाली. भारतातील पायाभूत सुविधा, आरबीएल बँक आणि सन्मान कॅपिटलमध्ये पाच अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीची घोषणा यावेळी नाहयान यांनी केली. (वृत्तसंस्था)

### कोणत्याही देशांवरील हल्ले अस्वीकारार्ह : मोदी

द्विपक्षीय करारानंतर संयुक्त संबोधनात मोदी म्हणाले, भारत यूएईसोबत शांतता, स्थैर्य आणि सहकार्यासाठी तयार आहे. यूएईवर झालेल्या हल्ल्याचा भारत निषेध करतो. ज्या प्रकारे यूएईला लक्ष्य केले गेले, ते कोणत्याही परिस्थितीत अस्वीकारार्ह आहे. कठीण काळात भारतीय लोकांना कुटुंबातील सदस्यांप्रमाणे वागवून, त्यांची जी काळजी घेतली त्याबद्दल मी यूएई सरकार आणि राजघराण्याचे मनापासून आभार मानतो. सामरिक संरक्षण भागीदारी करारामुळे दोन्ही देशांमधील लष्करी संबंध अधिक दृढ होतील.

### मध्यपूर्वेतील युद्धाची जगाला झळ

सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे भारत-यूएई सामरिक सहकार्याचे महत्त्व आणखी वाढले आहे. भविष्यात दोन्ही देश प्रत्येक क्षेत्रात एकत्र पुढे वाटचाल करतील, याचा मला विश्वास आहे. मध्यपूर्वेतील युद्धाचा परिणाम जगभर जाणवत असून, भारताने नेहमीच संवाद आणि राजनैतिक मार्गाने तोडगा काढण्याचे समर्थन केले आहे. होर्मुझ जलमार्ग खुला आणि सुरक्षित राहावा अशी भारताची अपेक्षा आहे.या प्रदेशात शांतता आणि स्थैर्य पुनर्संचयित करण्यासाठी भारत सर्वतोपरी मदत करेल, असे मोदी म्हणाले.

# आनंदवनला १० कोटींचा ‘कॉर्पस फंड’ मंजूर

## महायुती सरकारने पाळला ‘शब्द’

**मुंबई, १५ मे**

कुष्ठरोग्यांच्या सेवेसाठी जागतिक कीर्ती मिळवलेल्या चंद्रपूर जिल्ह्यातील वरोरा येथील ‘महारोगी सेवा समिती, आनंदवन’ या संस्थेला राज्य शासनाकडून १० कोटी रुपयांचा ‘कॉर्पस फंड’ वितरित करण्यास मंजुरी देण्यात आली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री आणि सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आनंदवन भेटीदरम्यान केलेली ही घोषणा आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी प्रत्यक्षात उतरवली आहे.

९ फेब्रुवारी २०२५ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आनंदवनला भेट दिली असता, संस्थेच्या कार्याचा गौरव करत १० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. स्वयंसेवी संस्थांना अशा प्रकारे ‘कॉर्पस फंड’ उपलब्ध करून देण्याचे कोणतेही ठराविक धोरण शासनाकडे उपलब्ध नाही. मात्र, आनंदवनने कुष्ठरुग्णांसाठी प्रदीर्घ काळ केलेले अतुलनीय कार्य विचारात घेऊन, राज्य मंत्रिमंडळाने २२ फेब्रुवारी २०२६ रोजी या निधीला ‘एक वेळची विशेष बाब’ म्हणून मंजुरी दिली आहे. सार्वजनिक आरोग्य विभागाने १५ मे २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय निर्गमित केला आहे.

सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी एकूण १० कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास शासन मान्यता मिळाली आहे. हा निधी कुष्ठरोग मुक्त झालेल्या रुग्णांच्या पुनर्वसनासाठी खर्च केला जाणार आहे. या निधीच्या विनियोगासाठी सहसंचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग व क्षयरोग), पुणे यांना नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्त करण्यात आले आहे. चंद्रपूरचे सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा (कुष्ठरोग) हे या निधीसाठी आहरण व संवितरण अधिकारी म्हणून काम पाहतील. (तभा वृत्तसेवा)

# माहितीचा अधिकार आता अधिक सुटसुटीत

## राज्यभरातील सर्व क्षेत्रीय कार्यालये येणार ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर!

**मुंबई, १५ मे**

पारदर्शक कारभारासाठी महत्त्वाचा असलेल्या माहितीचा अधिकार अधिनियमाची अंमलबजावणी आता अधिक प्रभावी होणार आहे. राज्यातील सर्व क्षेत्रीय कार्यालये, महामंडळे आणि अधिनस्त कार्यालयांचा समावेश आता ऑनलाइन माहितीचा अधिकार आवृत्ती २.० या अद्ययावत संकेतस्थळावर करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. यामुळे नागरिकांना गावपातळीपासून ते मंत्रालयापर्यंतची माहिती एका क्लिकवर मिळवणे सोपे होणार आहे.

### अशी असेल नवी कार्यपद्धती

**नोडल ऑफिसरची नियुक्ती:** प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणासाठी राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्र मार्फत एक नोडल ऑफिसर नियुक्त केला जाईल.

**गावपातळीवरील जोडणी:** जर तलाठी स्तरावर माहिती हवी असेल, तर संबंधित तहसील कार्यालय हे नोडल कार्यालय म्हणून काम करेल. त्याचप्रमाणे ग्रामसेवकांसाठी पंचायत समितीचे गट विकास अधिकारी कार्यालय नोडल कार्यालय असेल.

**अद्ययावत माहिती:** जन माहिती अधिकाऱ्यांच्या बदल्या, नियुक्ती किंवा निवृत्ती झाल्यास त्याची माहिती तातडीने पोर्टलवर अपडेट करण्याची जबाबदारी नोडल ऑफिसरची असेल.

**कार्यालय शोधणे होणार सोपे :** वापरकर्त्यांना विशिष्ट कार्यालय शोधताना अडचण येऊ नये, यासाठी सर्व क्षेत्रीय कार्यालयांचे त्यांच्या विभागाशी मॅपिंग केले जाणार आहे. यासाठी सर्व प्रशासकीय विभागांना त्यांच्या रचनेची माहिती ट्रि-डायग्राम (-) स्वरूपात सादर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

तांत्रिक मर्यादा संपल्या, आता व्हर्जन २.० सज्ज यापूर्वी सर्व्हरच्या मर्यादित क्षमतेमुळे केवळ मंत्रालयीन विभाग आणि जिल्हास्तरीय प्रमुख कार्यालयांचाच (एकूण २१५ कार्यालये) या पोर्टलवर समावेश होता. मात्र, आता पोर्टलचे अद्ययावतीकरण करून त्याची क्षमता वाढवण्यात आली आहे. या प्रकल्पाच्या नियोजनासाठी विशेष प्रकल्प अंमलबजावणी कक्ष देखील स्थापन करण्यात आला आहे. सामान्य प्रशासन विभागाचे प्रधान सचिव डॉ. अतुल पाटणे यांनी यासंदर्भात सर्व मंत्रालयीन विभागांना सूचना दिल्या असून, विहित नमुन्यात माहिती सादर करण्यास सांगितले आहे. या निर्णयामुळे आरटीआय अर्ज करण्याची प्रक्रिया अधिक वेगवान आणि पारदर्शक होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे. (तभा वृत्तसेवा)



# राज्यात महायुतीची ताकद वाढली!

## परांजपेंचा सेनाप्रवेश विरोधकांच्या चालींना चोख प्रत्युत्तर

**मुंबई, १५ मे**

माजी खासदार आनंद परांजपे यांनी राष्ट्रवादी काँग्रेसमधून शिवसेनेत (शिंदे गट) केलेला प्रवेश ही महायुतीमधील बिघाडी नसून, मित्रपक्षांमधील परस्पर सामंजस्याचा आणि समन्वयाचा एक उत्तम नमुना आहे. या पक्षप्रवेशावरून महायुतीत मिठाचा खडा पडल्याच्या चर्चा केवळ अफवा असून, विरोधकांचे हे मनसुबे शिवसेना नेते व उद्योगमंत्री उदय सामंत यांनी पत्रकार परिषदेत उधळून लावले.

बाळासाहेब भवन येथे झालेल्या पत्रकार परिषदेत उदय सामंत यांनी स्पष्ट केले की, महायुतीतील घटक पक्ष एकमेकांचा आदर राखत युतीधर्माचे काटेकोर पालन करत आहेत. एखादा मोठा पदाधिकारी जेव्हा पक्ष सोडण्याचा विचार करतो, तेव्हा तो युतीबाहेर जाऊन विरोधकांना बळ देण्याऐवजी युतीतच राहणे अधिक महत्त्वाचे आहे. आनंद परांजपे यांच्या बाबतीतही हेच घडले. राष्ट्रवादीचा राजीनामा दिल्यानंतर, त्यांचा शिवसेना डीएनए लक्षात घेऊन खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी त्यांना स्वगृही परतण्याचे आवाहन केले होते. हा पक्षप्रवेश कोणताही छुपा अजेंडा नसून, राष्ट्रवादी काँग्रेसच्या अध्यक्षा सुनेत्रा पवार, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे आणि सचिव जय पवार यांच्याशी रीतसर चर्चा करूनच पूर्ण झाला आहे. यातून महायुतीमधील पारदर्शकता आणि घटक पक्षांमधील परस्पर विश्वास अधोरेखित झाला आहे. परांजपे यांनीही मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला असून, कोणत्याही नेत्यावर टीका न करता आपला प्रवेश सकारात्मक असल्याचे सिद्ध केले आहे. (तभा वृत्तसेवा)

### पंतप्रधान आणि मुख्यमंत्र्यांच्या धोरणांची अंमलबजावणी

राजकीय समन्वयासोबतच महायुती सरकार प्रशासकीय पातळीवरही आदर्श निर्माण करत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार, उद्योग विभागाने आता इंधन बचतीसाठी आणि पर्यावरणासाठी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्याचा निर्णय घेतला आहे. मंत्र्यांनीही या काटकसरीच्या मोहिमेत सहभागी व्हावे, असे आदेश देण्यात आले असून ही प्रशासकीय पारदर्शकतेची मोठी पाऊल ठरत आहे.

# निकृष्ट कामावर नितीन गडकरींचा संताप

## ठेकेदारांचे पैसे थांबविण्याचा आदेश ● संत तुकाराम महाराज पालखी मार्गाची पाहणी

**पुणे, १५ मे**

संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग धार्मिक आणि भावनिक आहे. या महामार्गाच्या कामाच्या दर्जाबाबत कोणतीही तडजोड करणार नाही, अशा शब्दांत केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी अधिकाऱ्यांना सुनावले. नितीन गडकरी यांनी संत तुकाराम महाराज पालखी महामार्गाची शुक्रवारी बसमधून पाहणी केली. यावेळी अनेक ठिकाणी निकृष्ट दर्जाचे काम, उखडलेले डांबरीकरण, खचलेले रस्ते आणि अपूर्ण कामे आढळल्याने त्यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरत ठेकेदारांचे पैसे देणे थांबवा, असा थेट आदेश दिला. यामुळे बसमधून प्रवास करताना त्यांनी किती बारकाईने पाहणी केली हे दिसून आले.

संत ज्ञानेश्वर महाराज महामार्गाची गुरुवारी पाहणी केल्यानंतर नितीन गडकरी यांनी शुकवारी संत तुकाराम महाराज पालखी मार्गातील इंदापूर ते वसुंदे या दरम्यान बसने पाहणी केली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाचा प्रतिसाद देत गडकरी यांनी कोणताही मोठा ताफा घेतला नाही.

प्रशासनाकडून सुमारे ८० टक्के काम पूर्ण झाल्याचा दावा केला आहे. तरी प्रत्यक्षात अनेक ठिकाणी रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब असून त्याचे काम लवकरच पूर्ण केले जाणार असून येत्या सहा महिन्यांत काम पूर्ण काम होणार असल्याचा विश्वास देखील व्यक्त करण्यात आला आहे.

कामाच्या गुणवत्तेबाबत कठोर भूमिका घेणाऱ्या गडकरी यांनी यावेळीही कोणतीही तडजोड न करता थेट कारवाईचे संकेत दिले आहेत. काम दर्जेदार नसेल तर एक रुपयाचेही पेमेंट करू नये आणि गरज पडल्यास संबंधित ठेकेदारांना काळ्या यादीत टाकावे, असे निर्देश त्यांनी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांना दिले.

या दौऱ्यात राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, आमदार राहुल कुल यांच्यासह प्रवीण माने आणि प्रदीप गारटकर उपस्थित होते.



तुकाराम महाराज पालखी मार्गाची पाहणी करताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी. सोबत माजी मंत्री हर्षवर्धन पाटील, कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

### १३० किमीचा महामार्ग

देहू व पंढरपूर या दोन महत्त्वाच्या धार्मिक स्थळांना जोडणारा संत तुकाराम महाराज पालखी मार्ग (राष्ट्रीय महामार्ग- ९६५ जी) हा पाटस ते पंढरपूर असा १३० किमी लांबीचा महामार्ग पुणे आणि सोलापूर जिल्ह्यांना जोडतो.

**वारी होणार सुरक्षित**

हा महामार्ग बारामती, भिगवण, अकलूज आणि श्रीपूर यासारख्या भागांना बायपास करून जलद आणि सुरक्षित प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देतो. संत ज्ञानेश्वर महाराज पालखी मार्गाप्रमाणेच या मार्गावरही स्वतंत्र पदयात्रा मार्ग, आधुनिक पूल, अंडरपास आणि बायपास मार्गांच्या साहाय्याने वारी अधिक सुरक्षित आणि वेळेवर होण्यास मदत होणार आहे. (तभा वृत्तसेवा)

### खैबरमध्ये नऊ दहशतवादी ठार

**बाजोरः** पाकिस्तानच्या अशांत खैबर पख्तुनख्वा प्रांतात दहशतवादी आणि सुरक्षा दलांमध्ये झालेल्या चकमकीत नऊ संशयित दहशतवादी आणि चार सुरक्षा कर्मचारी ठार झाले. अधिकाऱ्यांच्या माहितीनुसार, ही घटना गुरुवारी रात्री उशिरा बाजोर जिल्ह्यात घडली, जेव्हा सशस्त्र दहशतवाद्यांच्या एका गटाने मीना आणि इनायत कलाय भागातील सुरक्षा चौक्यांवर हल्ला केला. त्यानंतर सुरक्षा दलांनी प्रत्युत्तर देत हल्लेखोरांना घेरले. या चकमकीत नऊ संशयित दहशतवादी जागीच ठार झाले, तर अनेक जण जखमी झाल्याचे वृत्त आहे. या घटनेनंतर, संपूर्ण परिसर सील करण्यात आला आणि फरार दहशतवाद्यांचा शोध घेण्यासाठी शोधमोहीम सुरू करण्यात आली. या हल्ल्याची जबाबदारी बंदी घातलेल्या तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान या संघटनेने स्वीकारली आहे.

# बेजबाबदार विधाने सहन करणार नाही

## सर्वोच्च न्यायालयाने ठाकरे गटाला ठणकावले

**नवी दिल्ली, १५ मे**

सर्वोच्च न्यायालयात शुक्रवारी शिवसेना पक्ष व चिन्हासंदर्भात सुनावणी झाली. या सुनावणीत सरन्यायाधीशांनी या खटल्याच्या विलंबाविषयी ठाकरे गटाच्या नेत्यांकडून करण्यात येणाऱ्या अनावश्यक विधानांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. खटल्याबाबत विधाने करणाऱ्यांना रोखा, असे कोर्टाने ठाकरे गटाच्या वकिलांना सुनावले आहे.

या सुनावणीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे वकील देवदत्त कामत यांनी या प्रकरणावर लवकर सुनावणी घेण्याची मागणी केली. त्यावर सरन्यायाधीश सूर्यकांत यांनी देवदत्त कामत यांना चांगलेच खडेबोल सुनावले. सर्वप्रथम तुम्ही तुमच्या लोकांना माध्यमांमध्ये जाऊन सुप्रीम कोर्ट निर्णय घेत नाही, अशी बेजबाबदार विधाने करण्यापासून रोखा. आम्ही दोन्ही पक्षांकडून सहकार्याची अपेक्षा करतो, असेही ते म्हणाले. यावर ॲड. कामत म्हणाले, न्यायालयाने आपल्या सोयीनुसार लवकरात लवकर हे प्रकरण हाती घ्यावे. आता या प्रकरणाची सुनावणी ३० जुलैला होणार आहे.

**तीन वर्षांपासून आम्ही वाटच पाहत आहोत**

ॲड. कामत यांनी हे प्रकरण आज निर्देशांसाठीच्या यादीत दाखवण्यात आले होते, यावर भर दिला असता सरन्यायाधीश म्हणाले, न्यायालय दोन्ही पक्षांकडून सहकार्याची अपेक्षा करते. त्यावर कामत म्हणाले, आम्हाला काही अडचण नाही. न्यायालयाला प्रत्येक पक्षासाठी २ तासांचा वेळ मिळेल तेव्हा आपण हे प्रकरण निश्चित करू शकता. आम्ही चिंतेत आहोत. कारण आम्ही या प्रकरणी मागील तीन वर्षांपासून वाट पाहत आहोत. (वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



# पुढील युद्धात ड्रोन, रोबोट्सचा वापर

## वायुदल प्रमुखांची माहिती; संघर्षाचे स्वरूप पूर्णपणे बदलणार



◆ **नवी दिल्ली, १५ मे**



ड्रोन, मानवरहित हवाई प्रणाली (यूएएस) आणि काउंटर यूएएस तंत्रज्ञानाने आधुनिक युद्धाचे स्वरूप पूर्णपणे बदलून टाकले आहे. युद्ध आता केंद्रीकृत हवाई शक्तीपासून दूर जाऊन वेगाने एका स्वायत्त मॉडेलकडे वाटचाल करत आहे. पुढील युद्ध ड्रोन आणि रोबोट्सच्या मदतीने लढले जाईल, असे मत भारतीय वायुदल प्रमुख एअर चीफ मार्शल अमर प्रीत सिंग यांनी एका कार्यक्रमात व्यक्त केले.

राजधानमी दिल्लीत आयोजित संयुक्त परिसंवादात बोलताना वायुदल प्रमुख म्हणाले, ड्रोन हे भविष्य नसून आजचे वास्तव आहे. आजच्या युद्धात ड्रोन केवळ पाळत ठेवण्याचे साधन राहिलेले नाही; ते आता हल्ल्याचे शस्त्र बनले आहे. ड्रोन यशस्वी होत आहेत कारण त्यांच्यामध्ये हवाई शक्तीचे सर्व सकारात्मक गुण आहेत. कमी खर्च, कमी धोका आणि दीर्घकालीन परिचालन क्षमतेमुळे युद्धात ड्रोनचा वापर वाढत आहे. आता मानवी जीविताचा धोका कमी करून युद्धे लढली जाऊ शकतात. यामुळेच जगभरातील देश ड्रोनमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करीत आहेत. ऑपरेशन सिंदूरचा संदर्भ देत, त्यांनी स्पष्ट केले की भारताने अचूक हल्ले आणि यशस्वी लक्ष्य साध्य केले. तिन्ही दलातील समन्वयामुळे हे शक्य झाले. आयएसीसीएस (एकात्मिक हवाई कमांड आणि नियंत्रण प्रणाली) ने संपूर्ण मोहीमेत महत्त्वाची भूमिका बजावली. केंद्रीय समन्वयाशिवाय हे यश अशक्य झाले असते. ◄(वृत्तसंस्था)

### नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज

**भारताला सातत्याने नवीन तंत्रज्ञान विकसित करण्याची आणि विद्यमान तंत्रज्ञान अद्ययावत करण्याची गरज आहे. स्वस्त ड्रोन आणि महागड्या संरक्षण प्रणाली यांच्यातील वादावर भाष्य करताना, त्यांनी सांगितले की, संरक्षण करायच्या लक्ष्याचे मूल्य हे हल्ला करणाऱ्या ड्रोनच्या खर्चापेक्षा नेहमीच जास्त असते. काही लक्ष्ये इतकी महत्त्वाची असतात की, खर्चाचा विचार कमीत कमी केला जातो. ड्रोनच्या वापरामुळे लढाऊ विमानांचे महत्त्व कमी होणार नाही. जगातील प्रमुख शक्ती अजूनही सहाव्या पिढीतील लढाऊ विमानांमध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करत आहेत.**

### नुकसान टाळण्यासाठी समन्वय आवश्यक

**युद्ध यापुढे केवळ हवेपुरते मर्यादित राहणार नाही. ते रोबोटिक युद्धाच्या दिशेने वाटचाल करत आहे, ज्यामध्ये मानवरहित सागरी जहाजे, रोबोटिक खेचरे आणि स्वायत्त भू-प्रणाली यांचा समावेश असेल. तिन्ही सेवांना एकाच हवाई क्षेत्रात एकत्र काम करावे लागेल. त्यामुळे, अनवधानाने होणारे नुकसान टाळण्यासाठी संपूर्ण समन्वय आणि कार्यक्षेत्राची जाणीव असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यासाठी सशस्त्र दल, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि धोरणकर्ते यांच्यात मजबूत सहकार्याची आवश्यकता आहे.**

# सागरी मार्गांच्या सुरक्षेत तडजोड केली जाणार नाही

### ब्रिक्स परिषदेच्या बैठकीत भारताची भूमिका | दहशतवादावर शून्य सहनशीलतेचे समर्थन

◆ **नवी दिल्ली, १५ मे**

होर्मुझची सामुद्रधुनी आणि लाल समुद्र यांसारख्या सागरी मार्गांची सुरक्षा जागतिक अर्थव्यवस्थेसाठी अत्यंत महत्त्वाची असून, जलमार्गातील सुरक्षेत कोणतीही तडजोड करताना येणार नाही. संवाद आणि मुत्सद्देगिरीने समस्येवर तोडगा काढणे हाच एकमेव मार्ग असल्याचे ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीत बोलताना एस. जयशंकर यांनी सांगितले, दहशतवादावर शून्य सहनशीलतेच्या धोरणाचे समर्थन करण्याची साद त्यांनी उपस्थित सदस्य देशांच्या प्रतिनिधींनी घातली.




मलेशियाचे परराष्ट्रमंत्री मोहम्मद हसन यांच्याशी हस्तांदोलन करताना एस. जयशंकर

राजधानी दिल्लीतील भारत मंडपम् येथे आयोजित ब्रिक्स परराष्ट्र मंत्र्यांच्या बैठकीच्या दुसऱ्या सत्राला संबोधित करताना जयशंकर म्हणाले, पश्चिम आशियातील संघर्ष आता केवळ दोन देशांपुरता मर्यादित राहिला नसून त्याचे पडसाद जागतिक व्यापारावर उमटत आहेत. जलमार्गातील तणाव सर्व देशांसाठी चिंतेचा विषय असून, तेथील सुरक्षेवर कोणतीही तडजोड करता येणार नाही. कोणत्याही संघर्षावर संवाद आणि मुत्सद्देगिरी हेच एकमेव शाश्वत उपाय आहेत.

सर्व जलमार्गांमधून सुरक्षित नौकानयन आवश्यक आहे. या मार्गांमध्ये कोणताही अडथळा आल्यास जागतिक अर्थव्यवस्थेवर गंभीर परिणाम होईल. त्यामुळे, सर्व सागरी मार्गांची सुरक्षा सुनिश्चित करणे ही सर्व देशांची सामूहिक जबाबदारी आहे. सागरी मार्गांवरील जहाज वाहतुकीला असलेला धोका सातत्याने वाढत आहे आणि ऊर्जा व तेल पुरवठा पायाभूत सुविधांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. हा तणाव कमी करण्यासाठी आणि शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या कोणत्याही प्रयत्नांना भारत पूर्ण पाठिंबा देईल. ◄(वृत्तसंस्था)

### आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन व्हावे

**जयशंकर यांनी सांगितले की, संपूर्ण पश्चिम आशियाई प्रदेश सध्या अत्यंत चिंतेचा विषय आहे. आंतरराष्ट्रीय कायद्यांचे पालन करणे, नागरिकांच्या जीविताचे रक्षण करणे आणि सार्वजनिक पायाभूत सुविधांवरील हल्ले रोखणे महत्त्वाचे आहे. दहशतवादावर भारताची भूमिका अखोरेखित करताना ते म्हणाले, सीमापार दहशतवाद सर्व जागतिक नियमांचे उल्लंघन करतो आणि जागतिक शांतता व सुरक्षेसाठी सर्वात मोठा धोका आहे. दहशतवाद कोणत्याही परिस्थितीत सहन केला जाणार नाही आणि त्याचे समर्थन करण्यासाठी कोणतीही सबब स्वीकारली जाणार नाही. सर्व ब्रिक्स देशांनी दहशतवाद समूळ नष्ट करण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे.**

### अराघची यांच्यासोबत द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा

**जयशंकर यांनी इराणचे परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांची भेट घेतली. दोन्ही नेत्यांनी पश्चिम आशियातील परिस्थिती, त्याचे जागतिक परिणाम आणि द्विपक्षीय मुद्यांवर चर्चा केली. एक्सवरील पोस्टमध्ये यासंदर्भात माहिती देताना जयशंकर म्हणाले, इराणी समकक्षांसोबत दोन्ही देशांच्या परस्पर हिताच्या मुद्यांवर विचारांची देवाणघेवाण केली.**

# आरजी कर प्रकरणी तीन आयपीएस अधिकारी निलंबित

◆ **कोलकाता, १५ मे**

पश्चिम बंगालमध्ये भाजपा सत्तेवर आल्यापासून मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी धडाधड निर्णय घेत आहेत. शुक्रवारी बंगाल सरकारने आर. जी. कर मेडिकल कॉलेजमधील एका महिला डॉक्टरवरील बलात्कार आणि हत्या प्रकरणात तीन आयपीएस अधिकाऱ्यांना निलंबित करून एक मोठे प्रशासकीय पाऊल उचलले. तसेच या प्रकरणात ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेचीही चौकशी करणार, असे संकेत दिले.

मुख्यमंत्री शुभेन्दू अधिकारी यांनी नवन्ना येथे सांगितले की, या प्रकरणाची फाईल पुन्हा उघडली जाईल आणि तत्कालीन पोलिस अधिकाऱ्यांच्या भूमिकेची विभागीय चौकशी केली जाईल. या चौकशीच्या कक्षेत तत्कालीन मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांच्या भूमिकेचाही आढावा घेतला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. निलंबित अधिकाऱ्यांमध्ये तत्कालीन कोलकाता पोलिस आयुक्त विनीत गोयल, तत्कालीन पोलिस उपायुक्त अभिषेक गुप्ता आणि इंदिरा मुखोपाध्याय यांचा समावेश आहे. हे प्रकरण हाताळताना गंभीर निष्काळजीपणा आणि प्रक्रियेतील त्रुटींचे आरोप समोर आल्या आहेत, असेही मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले. ◄(वृत्तसंस्था)

# प्रख्यात मानसोपचार तज्ज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी यांचे निधन

◆ **पुणे, १५ मे**

ज्येष्ठ मानसोपचारतज्ज्ञ, लेखक आणि मुक्तांगणचे विश्वस्त डॉ. आनंद नाडकर्णी यांचे शुक्रवारी पहाटे पाचच्या सुमारास निधन झाले. वयाच्या ६८ व्या वर्षी त्यांनी जगाचा निरोप घेतला. मुंबईतील खासगी रुग्णालयात उपचार घेताना त्यांची प्राणज्योत मालवली. मुक्तांगण व्यसन मुक्ती केंद्राचे विश्वस्त म्हणून त्यांनी प्रदीर्घ काळ काम केले.

डॉ.आनंद नाडकर्णी यांनी वैद्यकीय पदवी मुंबईतून पूर्ण केली होती. त्यानंतर मानसोपचार विषयात एमडी पदव्युत्तर शिक्षण मुंबई विद्यापीठात घेतलं होतं. ३० वर्षांहून अधिक काळ ते मानसोपचार तज्ज्ञ म्हणून काम करत होते. 'इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजीकल हेल्थ' आणि



'मुक्तांगण डी ॲडिक्शन सेंटर'चे ते संस्थापक होते. मानसोपचार तज्ज्ञ म्हणून काम करत असताना त्यांनी मानसिक आरोग्यबाबत जनजागृती केली. तसेच साहित्य आणि नाट्य क्षेत्रातही काम केले. पुस्तक लेखन, पॉडकास्ट या माध्यमातून डॉ. नाडकर्णी हे मानसिक आरोग्याबाबत जनजागृती करत होते. गेल्या काही काळापासून ते आरोग्याच्या समस्यांशी झुंजत होते. मुंबईत त्यांच्यावर उपचारही सुरु होते. विविध औद्योगिक संस्था आणि स्वयंसेवी संघटनांसाठी त्यांनी मानसिक आरोग्य विषयक सल्लागार व प्रशिक्षक म्हणूनही काम केले. कासव, कदाचित, देवराई आणि डॉ. काशिनाथ घाणेकर या मराठी चित्रपटांच्या निर्मितीत त्यांनी तज्ज्ञ म्हणून योगदान दिले होते. डॉक्टर मुक्तांगणचे विश्वस्त होतेच, त्याच सोबत त्यांनी आयपीएच ही संस्था प्रथम ठाण्यात स्थापन केली. त्यानंतर आठ वर्षांपूर्वी पुण्यात या संस्थेचे केंद्र सुरू झाले. ◄(तभा वृत्तसेवा)

## चित्रपट वार्ता

### रणबीर कपूरने अयोध्येत खरेदी केली जमीन



**अयोध्या** : अभिनेता रणबीर कपूरने अयोध्येतील 'द सरयू' या रिअल इस्टेट प्रकल्पात जमीन खरेदी केली आहे. हा प्रकल्प 'द हाऊस ऑफ अभिनंदन लोढा'चा प्रीमियम प्लॉटेड डेव्हलपमेंट प्रकल्प आहे. कंपनीच्या अधिकृत घोषणेनुसार, हा व्यवहार ३.३१ कोटी रुपयांना झाला आहे. खरेदी केलेल्या जमिनीचे एकूण क्षेत्रफळ २,१३४ चौरस फूट आहे. अमिताभ बच्चन यांच्यानंतर 'द सरयू' मध्ये गुंतवणूक करणारे रणबीर कपूर हे दुसरे मोठे अभिनेते ठरले आहेत. अयोध्येनेच निवडले आहे, असे वाटते. अयोध्या भारताच्या इतिहासाचा आणि सांस्कृतिक वारशाचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि द सरयू मधील ही जमीन त्याच्या कुटुंबाच्या वारशाचा भाग बनेल, असे रणबीरने निवेदनात म्हटले आहे.

### 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाचे पोस्टर प्रदर्शित




**मुंबई** : अक्षय कुमारच्या 'वेलकम टू द जंगल' चित्रपटाचे पोस्टर अधिकृतपणे प्रदर्शित करण्यात आले आहे. अनीस बजमी यांचा मल्टीस्टारर कॉमेडीपट अक्षय कुमारचा पुढील चित्रपट असेल. तो चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होईल, अशी घोषणा अक्षयने केली. याआधी आलेल्या 'वेलकम' आणि 'वेलकम बॅक' या चित्रपटांनी प्रेक्षकांना भरभरून हसवले होते. आता 'वेलकम टू द जंगल' हा तिसरा भाग आहे. हा चित्रपट सुरुवातीला २५ डिसेंबर रोजी प्रदर्शित होण्याचा अंदाज होता मात्र आता हा चित्रपट ४ डिसेंबर रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे दिग्दर्शन अनीस बजमी करत आहेत. या चित्रपटात रवीना टंडन, जॅकलीन फर्नांडिस, अर्शद वारसी, सुनील शेट्टी, दिशा पटानी, परेश रावल, जॉनी लिव्हर कलाकार दिसणार आहेत.

### ४ जूनला प्रदर्शित होणार माधुरीचा 'माँ बहन'




**मुंबई** : माधुरी दीक्षित, तृप्ती डिमरी आणि इन्फ्लुएन्सर धर्ना दुर्गा यांची प्रमुख भूमिका असलेला 'माँ बहन' हा क्राईम कॉमेडी चित्रपट ४ जून रोजी नेटफ्लिक्सवर प्रदर्शित होणार आहे. सुरेश त्रिवेणी यांनी दिग्दर्शित केलेला हा चित्रपट अनेक अनपेक्षित वळणांनी भरलेला असेल, असे आश्वासन दिले आहे. माधुरी दीक्षित यांच्या ५८ व्या वाढदिवसानिमित्त नेटफ्लिक्सने ही बातमी दिली. या चित्रपटात रवी किशन, गीतांजली कुलकर्णी, अरुणोदय सिंग आणि शार्दुल भारद्वाज यांच्याही प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटाची निर्मिती ओपनिंग इमेज फिल्म्सच्या सहकार्याने अबंडंटिया एंटरटेनमेंट प्रोडक्शनने केली आहे. या चित्रपटात माधुरी दीक्षित, तृप्ती डिमरी आणि धरणा दुर्गा या अप्रतिम त्रिकुटासोबत आपले लाडके रवी किशन यांना यापूर्वी कधीही न पाहिलेल्या भूमिकांमध्ये एकत्र आणले आहे.

# रथींद्र बोस प. बंगाल विधानसभेचे सभापती

◆ **कोलकाता, १५ मे**

पश्चिम बंगाल विधानसभेचे नवे सभापती म्हणून रथींद्र बोस यांची निवड करण्यात आली. पहिल्यांदाच आमदार झालेले बोस हे स्वातंत्र्यानंतर उत्तर बंगालमधून सभापती बनणारे पहिले नेते आहेत.



कूचबिहार दक्षिणचे आमदार रथींद्र बोस यांना भाजपाने विधानसभेच्या सभापतीपदासाठी उमेदवारी दिली होती. विरोधी पक्ष तृणमूल काँग्रेसने त्यांच्या विरोधात उमेदवार उभा न केल्यामुळे त्यांची बिनविरोध निवड निश्चित झाली. मुख्यमंत्री सुवेंदू अधिकारी यांनी विधानसभेत त्यांच्या उमेदवारीचा प्रस्ताव मांडला आणि हंगामी अध्यक्ष तापस रॉय यांनी आवाजी मतदानाने त्यांच्या निवडीची घोषणा केली. भाजपाचे राज्य उपाध्यक्ष आणि राज्य सरचिटणीस यांसारखी महत्त्वाची पदे भूषवलेले बोस सध्या पक्षाच्या उत्तर बंगाल संघटनात्मक विभागाचे संयोजक आहेत. उत्तर बंगालमध्ये भाजपाची संघटना विस्तारण्यात आणि मजबूत करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. ◄(वृत्तसंस्था)



# दोन दिवस आभासी पद्धतीने होणार सुनावणी

### सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय

◆ **नवी दिल्ली, १५ मे**

देशातील सर्वोच्च न्यायिक संस्था असलेल्या सर्वोच्च न्यायालयाने कामकाजात मोठा बदल केला असून एक आधुनिक आणि पर्यावरणपूरक प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला आहे. न्यायालयाने सोमवार आणि शुक्रवारी दोन दिवस केवळ आभासी पद्धतीने (व्हिडिओ कॉन्फरन्सिंग) खटल्यांची सुनावणी घेण्याचा निर्णय घेतला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार, आता सर्व संकीर्ण दिवस, म्हणजेच सोमवार, शुक्रवार आणि इतर नियोजित दिवसांवर केवळ आभासी पद्धतीनेच खटल्यांची सुनावणी घेतली जाईल. या निर्णयाअंतर्गत न्यायालयाने रजिस्ट्रीला निर्देश दिले आहेत की, व्हिडिओ लिंक वेळेवर पाठवल्या जातील आणि तांत्रिक सहाय्य सुरळीतपणे उपलब्ध होईल याची खात्री करावी, जेणेकरून कोणत्याही पक्षाला अडचणींचा सामना करावा लागणार नाही. कोविड-१९ महामारीनंतर सुरू झालेल्या डिजिटल सुनावण्या आता एका कायमस्वरूपी आणि पद्धतशीर चौकटीत समाविष्ट केल्या जात आहेत.

**कार-पूलिंगला प्रोत्साहन**

इंधनाचा वापर कमी करण्यासाठी आणि संसाधनांचा इष्टतम वापर करण्यासाठी, सर्वोच्च न्यायालयाच्या सर्व न्यायाधीशांनी आपापसात कार-पूलिंगला प्रोत्साहन देण्याचा एकमताने निर्णय घेतला आहे. सध्याची जागतिक परिस्थिती आणि ऊर्जा संवर्धनाची गरज लक्षात घेऊन हे पाऊल उचलण्यात आले आहे. याचा उद्देश पर्यावरणावरील ताण कमी करणे हा देखील आहे.

**वर्क फ्रॉम होमचे नवीन नियम**

सर्वोच्च न्यायालयाच्या रजिस्ट्रीशी संबंधित कर्मचाऱ्यांसाठी एक नवीन प्रणाली देखील लागू करण्यात आली आहे. आदेशानुसार, प्रत्येक शाखा आणि विभागातील ५० टक्के कर्मचारी आठवड्यातून दोन दिवस घरून काम करू शकतील. तथापि, कामकाज सुरळीत चालावे, यासाठी उर्वरित कर्मचारी कार्यालयात उपस्थित राहतील, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. कर्मचाऱ्यांना घरून काम करताना त्यांच्या फोनवर उपलब्ध राहण्याची आणि गरज भासल्यास तात्काळ कार्यालयात येण्यास तयार राहण्याची सूचनाही देण्यात आली आहे. ◄(वृत्तसंस्था)

### कांकेरमध्ये दारुगोळा, शस्त्रांसह स्फोटके जप्त

◆ **कांकेर, १५ मे**

छत्तीसगडच्या कांकेर जिल्ह्यातील सुरक्षा दलांना मोठे यश मिळाले आहे. शोध मोहिमेदरम्यान, सैनिकांनी माओवाद्यांचा एक लपण्याचा अड्डा शोधून काढला. तेथून त्यांनी ५० शस्त्रे आणि मोठ्या प्रमाणात दारुगोळा व स्फोटके जप्त केली.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, ३१ मार्चला छत्तीसगड सशस्त्र माओवाद्यांपासून मुक्त घोषित झाल्यानंतर माओवाद्यांनी पूर्वी लपवून ठेवलेली रोकड, शस्त्रे आणि स्फोटके शोधण्यासाठी सुरक्षा दलांनी बस्तर भागात शोध मोहीम तीव्र केली आहे. १ एप्रिल ते १४ मे या कालावधीत जिल्हा पोलिस, जिल्हा राखीव दल, बस्तर फायटर्स आणि सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी कांकेरच्या दुर्गम आणि संवेदनशील भागात सखोल शोधमोहीम राबविली. ◄(वृत्तसंस्था)

# भोजशाला प्रकरण : अखेर सत्याचाच विजय

## सुमारे ८०० वर्षांपूर्वी मुस्लिम आक्रमकांनी केला विध्वंस

◆ **धार, १५ मे**

राजा भोज यांनी ११ व्या शतकात बांधलेले माता सरस्वती यांचे मंदिर प्रथम १३०५ मध्ये मुस्लिम आक्रमक अलाउद्दीन खिल्जी आणि नंतर १४०१ मध्ये दिलावर खान याने तोडले होते. मुस्लिम भोजशालेला कमल मौला मशीद संबोधत होता. या प्रकरणात उच्च न्यायालयाने निर्णय देत भोजशाला वाग्देवी मंदिर असल्याचा निर्वाळा दिला. अयोध्येतील राम मंदिराप्रमाणेच हिंदूना न्यायासाठी शेकडो वर्षे प्रतीक्षा करावी लागली.

ब्रिटिशकालीन गॅझेटियर्स आणि इतिहासकारांच्या दस्तवेजांमध्येही भोजशालेचे वर्णन देवी सरस्वतीला समर्पित मंदिर आणि एक शिक्षण केंद्र म्हणून केले आहे. याचिकाकर्त्यांनी असाही दावा केला की, वसंत पंचमीसह विविध प्रसंगी येथे पूजेची एक दीर्घकाळ चालत आलेली परंपरा आहे. मुस्लिम पक्षाने न्यायालयात एएसआयच्या सर्वेक्षण अहवालावर टीका केली आणि दावा केला की, तो हिंदू पक्षाचे दावे बळकट करण्यासाठी तयार करण्यात आला होता. तथापि, भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाने न्यायालयात स्पष्टपणे सांगितले की, हे सर्वेक्षण वैज्ञानिक पद्धतीने करण्यात आले होते आणि त्यात मुस्लिम समाजातील तज्ञांचा समावेश होता.

### एएसआयचा अहवाल

सध्याच्या वास्तूच्या आधी परमार राजांच्या काळातील एक मोठी वास्तू



अस्तित्वात होती आणि सध्याची वास्तू त्या मंदिराच्या अवशेषांचा वापर करून बांधण्यात आली आहे. अहवालानुसार, या संकुलात कोरलेले लाल दगडाचे स्तंभ, सभामंडप, यज्ञकुंड आणि संस्कृत व प्राकृत भाषांमधील शिलालेख सापडले आहेत. यामध्ये परमार घराण्यातील राजा नरवर्मन यांचा समावेश आहे. एएसआयने असेही म्हटले आहे की, स्तंभ आणि भिंतींवर कोरलेल्या मानवी आणि प्राण्यांच्या आकृत्यांना हेतुपुरस्सर नुकसान पोहोचवण्यात आले होते. सापडलेल्या शिलालेखांमध्ये संस्कृत वर्णमाला, व्याकरणाचे नियम आणि कर्पुरमंजरी नावाच्या नाटकातील उतारे यांचा समावेश आहे.

### स्वातंत्र्यानंतर वाढला वाद

भोजशाळेला १९५१ मध्ये संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्यात आले.१९५२ मध्ये, हिंदूंनी येथे भोज दिन साजरा करण्यास सुरुवात केली, ज्यामुळे परिसरातील तणाव वाढला. याला प्रत्युत्तर म्हणून, मुस्लिम समाजाने १९५३ मध्ये येथे उर्स साजरा करण्यास सुरुवात केली. यानंतर, बराच काळ मुस्लिम समाज शुक्रवारी नमाज अदा करत असे, तर हिंदू समाज वसंत पंचमीला पूजा करत असे. १९६१ मध्ये, इतिहासकार डॉ. विष्णू श्रीधर वाकणकर लंडनला गेले आणि त्यांनी देवी वाग्देवीच्या मूर्तीच्या भारतीय मूळचे पुरावे सादर केले, तरीही मूर्ती परत मिळू शकली नाही.

### अयोध्या वादानंतर...

अयोध्या वादानंतर, भोजशालेचा मुद्दाही तीव्रतेने वाढला. उजव्या विचारसरणीच्या संघटनांनी तेथे पूर्ण हिंदू पूजा हक्काची मागणी तीव्र केली. १९९४ मध्ये, विश्व हिंदू परिषदेने स्मारकावर ध्वज फडकवण्याची धमकी दिल्यानंतर धारमध्ये संचारबंदीसारखी परिस्थिती निर्माण झाली होती. दोन्ही पक्षांमध्ये नंतर झालेल्या करारानंतर मंगळवार आणि शुक्रवार या दिवशी प्रार्थना आणि उपासना सुरू राहिल्या.

### २००३ मध्ये मोठे आंदोलन

जानेवारी २००३ मध्ये, वसंत पंचमीच्या वेळी, हिंदू संघटना आणि प्रशासन यांच्यात मोठा संघर्ष झाला. पोलिसांच्या लाठीचार्जनंतर, आंदोलने उसळली आणि जाळपोळीच्या अनेक घटना घडल्या. मार्च २००३ मध्ये, तत्कालीन केंद्रीय मंत्री जगमोहन यांनी सुचवले की, हिंदूंना सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत पूजा करण्याची आणि मुस्लिमांना शुक्रवारी दोन तास नमाज अदा करण्याची परवानगी द्यावी. यानंतर, भोजशाळा प्रकरण मध्य प्रदेश विधानसभा निवडणुकीत एक मोठा राजकीय मुद्दा बनले. भाजप नेत्या उमा भारती यांनी याला प्रचाराचा एक प्रमुख मुद्दा बनवला आणि त्यानंतर राज्यात भाजपाचे सरकार स्थापन झाले.

### प्रकरण पोहोचले सर्वोच्च न्यायालयात

मौलाना कमालुद्दीन वेल्फेअर सोसायटीने भारतीय पुरातत्व सर्वेक्षणाच्या आदेशाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले. १ एप्रिल २०२४ रोजी, सर्वोच्च न्यायालयाने निर्देश दिले की, सर्वेक्षणादरम्यान संकुलाच्या रचनेत कोणताही बदल करू नये आणि उत्खनन मर्यादित ठेवावे. दरम्यान, हिंदू संघटनांनी च्या अहवालाच्या आधारे संकुलात वाग्देवी देवीची मूर्ती बसवण्याची आणि मशीद बंद करण्याची आपली मागणी तीव्र केली. ◄(वृत्तसंस्था)



CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/



## अग्रलेख...

# एसआयआरच्या नव्या टप्प्यानिमित्त...

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाच्या तिसऱ्या टप्प्याची घोषणा निवडणूक आयोगाने केली आहे. ३ केंद्रशासित प्रदेश आणि १६ राज्यांत हे अभियान ३० जूनपासून राबवले जाणार आहे. हे अभियान स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन (एसआयआर) अर्थात विशेष सघन पुनरीक्षण म्हणून देशभर ओळखले जाते. या राज्यांतील ३६.७३ कोटी जनता या अभियानात सहभागी होणार आहे. महाराष्ट्रातील सर्वाधिक म्हणजे ९ कोटी ८६ लाख म्हणजे जवळपास १० कोटी लोकांचा त्यात समावेश होणार आहे. यानिमित्ताने फार मोठे शिवधनुष्य निवडणूक आयोगाने आपल्या हाती घेतले आहे. यापूर्वी बिहार आणि पश्चिम बंगालमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी हे अभियान राबवण्यात आले होते. ते वादग्रस्त ठरले होते, म्हणण्यापेक्षा ठरवून वादग्रस्त ठरवण्यात आले होते. आपल्या हक्काच्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्यासाठी या अभियानाचा वापर करण्यात आल्याचा आरोप बिहार आणि पश्चिम बंगालमधील काही राजकीय पक्षांनी केला. पश्चिम बंगालमध्ये तर आपल्या पराभवाचे खापर ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने एसआयआरवर फोडले आहे. त्यांचा पवित्रा म्हणजे 'नाचता येईना अंगण वाकडे'सारखाच. पराभवाचे खापर निवडणूक आयोगावर फोडून तृणमूल काँग्रेसला फार काही साध्य करता येणार नाही. त्याऐवजी आपल्याकडून सत्तेत असताना कोणत्या चुका झाल्या, आपण अतिशय एकांगी पद्धतीने तर सरकार चालवले नाही ना, मुस्लिमांचे तुष्टीकरण करताना बहुसंख्य हिंदूंची आपल्याकडून उपेक्षा तर झाली नाही ना अशा विषयांचे आत्मपरीक्षण त्यांनी केले पाहिजे.

नवीन मतदारांची नावे मतदारयादीत समाविष्ट करणे, ज्यांची नावे एकापेक्षा जास्त मतदारसंघातील यादीत आहेत, त्यांची नावे वगळणे तसेच मृत मतदारांची नावे वगळणे हा या मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा मुख्य उद्देश. त्यामुळे त्यावर कोणाला हरकत घेण्याचे कारण नाही. निवडणूक आयोगाचा हेतू शुद्ध आणि प्रामाणिक आहे. १ ऑक्टोबरला १८ वर्षांचे होत असलेल्या युवा मतदारांना आपली नावे मतदारयादीत नोंदवण्याचा मार्ग या अभियानामुळे प्रशस्त होणार आहे. ज्यांचा मृत्यू झाला, त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात गैर काय आहे? हे काम तर सामान्य पद्धतीने आणि नेहमी व्हायला हवे. मृत्यू झालेल्या प्रत्येक व्यक्तीच्या निधनाचे प्रमाणपत्र स्थानिक स्वराज्य संस्थांचा जन्म आणि मृत्यू विभाग जारी करत असतो. ज्यावेळी त्या व्यक्तीच्या निधनाच्या प्रमाणपत्राची मागणी केली जाते, त्याचवेळी त्या व्यक्तीचे नाव संबंधित स्थानिक स्वराज संस्थेतर्फे मतदारयादीतून वगळले का जात नाही, हा प्रश्न आहेच. याकडेही आयोगाने लक्ष दिले पाहिजे. यावेळी महाराष्ट्रात हे अभियान राबवण्यात येणार आहे. महाराष्ट्रात सध्या कोणतीच निवडणूक नाही. विधानसभेच्या निवडणुकीला जवळपास तीन वर्षांचा अवधी आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीनंतर महाराष्ट्रात विधानसभेची निवडणूक होणार आहे. त्यामुळे हे अभियान महाराष्ट्रात वादग्रस्त ठरेल, असे सध्या तरी वाटत नाही. महाराष्ट्रात या अभियानाचा संबंध राज्यातील विधानसभा निवडणुकीशी कोणाला जोडता येणार नाही. यापूर्वी महाराष्ट्रात २००२ मध्ये असे अभियान राबवण्यात आले होते. त्यामुळे हे काही आगळे घडत नाही, हे लक्षात घेतले पाहिजे. मतदारयाद्यांचे शुद्धीकरण म्हणून या अभियानाकडे पाहिले पाहिजे. मतदारयादीत या देशाचे नागरिक नसलेल्या कोणाचाही समावेश यापुढे होणार नाही, याची काळजी घेणे हे आयोगाचे कामच आहे. काही राजकीय पक्षांच्या मुस्लिम तुष्टीकरणाच्या धोरणातून ज्या घुसखोरांनी मतदारयादीत शिरकाव करून घेतला, त्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात काही गैर नाही. या देशाचा पंतप्रधान वा राज्याचा मुख्यमंत्री किंवा आमदार-खासदार निवडण्याचा अधिकार या देशातील मूळ नागरिकांचा आहे, घुसखोरांचा नाही. ज्यांनी बेकायदेशीर मार्गाने आधी देशात आणि नंतर मतदारयादीत घुसखोरी केली, त्यांना आधी मतदारयादीतून आणि नंतर देशातून हाकलून दिले पाहिजे. मात्र या मुद्यावरून कारण नसताना काही राजकीय पक्षांनी निवडणूक आयोगावर हल्ला चढवीत त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा तसेच तो केंद्र सरकारच्या तालावर नाचत असल्याचा आरोप केला हा मोठा विनोदच म्हटला पाहिजे.

देशात मुक्त आणि नि:पक्ष वातावरणात निवडणुका घेणे, ही निवडणूक आयोगाची जबाबदारी आहे. आपण तटस्थ आहोत आणि नि:पक्षपणे काम करत असल्याचे निवडणूक आयोगानेही आपल्या कृतीतून वेळोवेळी दाखवून दिले पाहिजे. मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणात काही चुका झाल्या तर त्या चुकांची कबुली देत आयोगाने त्या चुका तातडीने दुरुस्त केल्या पाहिजेत. सर्वात खालच्या पातळीवर निवडणूक आयोगाने प्रतिनिधी म्हणून त्या गावातील शिक्षक आणि शासकीय सेवक काम करत असतात. ही सर्व मंडळी प्रामाणिकपणे आपले कर्तव्य पार पाडत असताना एखादवेळी काही चूक झाली, तर त्याची दुरुस्ती लगेच केली पाहिजे. या चुकीमागे कोणताही गैरहेतू नसला म्हणजे झाले. महत्त्वाचे म्हणजे हे अभियान राबवताना आयोगाने संबंधित राज्यातील सर्व राजकीय पक्षांना विश्वासात घेतले पाहिजे आणि त्यांच्या मदतीने आणि सहकार्याने हे अभियान राबवले पाहिजे. राजकीय पक्षांनीही एसआयआरच्या संदर्भात राष्ट्रप्रेमाची भूमिका घेण्याची परिपक्वता दाखविली पाहिजे. राजकारण होत राहील. देश राहिला तर सारे काही होईल. हा देशच घुसखोरांनी पोखरला तर निवडणुकांना अर्थ उरणार नाही, हे राजकीय पक्षांनी लक्षात घ्यावे. त्यामुळेच आयोगाच्या अशा कामांच्या पाठीशी उभे राहणे, हे सर्व राजकीय पक्षांचे तसेच कायदा आणि संविधानप्रेमी नागरिकांचे कर्तव्य आहे. ज्या पक्षांचे राजकारण मुस्लिम तुष्टीकरणावर विशेषत: बांगलादेशी घुसखोरांवर अवलंबून होते, त्या राजकीय पक्षांनी आणि ममता बॅनर्जीसारख्या नेत्यांनी या घुसखोरांचे अवाजवी आणि अनावश्यक लाड केले. राजकीय स्वार्थ साधताना आपण देशाची एकता आणि अखंडता धोक्यात आणत आहोत, याचे भानही त्यांना राहिले नाही. ममता बॅनर्जींनी आपल्या राजकीय फायद्यासाठी बांगलादेशी घुसखोरांचे तुष्टीकरण करताना निष्पाप हिंदूंचा छळ केला. त्याची किंमत त्यांना चुकवावी लागली हे पश्चिम बंगालच्या निकालांनी स्पष्ट केले. नियमित कालावधीने सर्व गोष्टींची स्वच्छता करणे आवश्यक असते. घर, शरीर, वस्तूंची सफाई आपण करतोच. मतदारयाद्या या नियमाला अपवाद असू शकत नाहीत. मात्र, हे अभियान राबवताना कायद्यातील एका तत्त्वाचे भान संबंधित यंत्रणांनी ठेवणे गरजेचे आहे. शंभर अपराधी सुटले तरी चालतील, पण एकाही निरपराध व्यक्तीला शिक्षा होऊ नये, असे कायद्याचे तत्त्व आहे. ते लक्षात ठेवून कोणत्याही योग्य आणि पात्र व्यक्तीचे नाव मतदारयादीतून वगळले जाऊ नये, ही काळजी घेण्याची जबाबदारी निवडणूक आयोगासोबत संबंधित व्यक्ती आणि त्या भागातील राजकीय पक्षांचीही आहे. राजकीय पक्षांनीही या अभियानावर वाद उपस्थित न करणे देशहिताचे ठरेल. आपल्याला अनुकूल असलेल्या मतदारांची नावे मतदारयादीतून वगळण्याचा प्रयत्न निवडणूक आयोगाने केल्याचा आरोप पश्चिम बंगालमध्ये तृणमूल काँग्रेसने केला होता. तृणमूल काँग्रेसच्या या आरोपात तथ्य नसल्याचे त्या राज्यातील विधानसभा निवडणूक निकालातून दिसून आले आहे. ज्या मतदारसंघातून काही लाख मतदारांची नावे वगळल्याचा आरोप झाला, अशा अनेक मतदारसंघात तृणमूल काँग्रेस विजयी झाली आहे. मात्र, वाद व्हायचा तो झालाच. आता देशातील १६ राज्यांत हे अभियान राबवताना, त्या राज्यांतील कोणत्याही राजकीय पक्षाला असा आरोप करण्याची संधी मिळणार नाही, याची काळजी आयोगाने घेतली पाहिजे.

मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचे काम हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. देशाच्या एकता आणि अखंडतेशी जोडलेला तो एक मुद्दा आहे, याचे भान सर्वांनी ठेवले पाहिजे. व्यक्तीपेक्षा समाज मोठा आणि समाजापेक्षा देश मोठा ही जाणीव आपल्या मनात रुजवली तर देशासमोरील बरेच प्रश्न सुटू शकतात. त्यामुळे मतदारयाद्यांच्या विशेष सघन पुनरीक्षणाचा निवडणूक आयोगाचा आदेश राजकीय पक्षांनी व नागरिकांनी 'सर आँखों'पर घेतला पाहिजे.

## प्रासंगिक

**डॉ. विनय कृ. देशपांडे**

# वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) संस्कार ऊर्जाकेंद्र

**(शनिवार, १६ मे २०२६ ला वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) च्या नूतन वेद भवन आणि ऐतिहासिक अष्ट विकृती महाग्रंथांचा लोकार्पण समारोह संपन्न होत आहे. त्यानिमित्ताने गेल्या १८ वर्षांतील केंद्राच्या प्रगतीचा आढावा.)**

प्राचीन काळापासूनच भारतात, सुसंस्कारित समाजनिर्मितीसाठी शिक्षणाला महत्त्वाचे मानले गेले आहे. त्यामुळे कालौघाप्रमाणे शिक्षणव्यवस्था निर्माण होत गेल्यात. तसेच विविध प्रकारचे शिक्षणही निर्माण होत गेले. आज डिजिटल शिक्षण उपलब्ध आहे. ज्ञानाच्या कक्षा रुंदावल्या पण त्यातील संस्कार, आत्मीयता लुप्त झालेली आहे.

व्यक्तीच्या शिक्षणाची सुरुवात प्रथमतः त्याच्या घरापासूनच होत असते. 'आई' ही प्रथम शिक्षक-गुरू असते. कालांतराने विविध शिक्षण प्राप्त करण्यासाठी पूर्वी 'गुरुकुल'मध्ये जावे लागत असे. तेथे त्याचे शरीर, मन, बुद्धी व अध्यात्मशक्ती विकसित करणारे शिक्षण देण्यात येत असे. 'वेद' शिक्षण हा त्या काळातील महत्त्वाचा भाग होता. व्यक्तीला वाचन, पठन, मनन, चिंतन अशा विविध प्रक्रियांतून शिक्षण दिले जात असे. त्यासाठी अनेक 'आश्रम' (गुरुकुल) म्हणजेच विद्यालये होती. परंतु, परकीय आक्रमणामुळे व स्वकीयांच्या दूरदृष्टीच्या अभावामुळे वेद शिक्षण व्यवस्थेचा ऱ्हास होत गेला.

तरीही काही वेदमूर्तींमुळे वेद शिक्षणाचा झरा पूर्णपणेआटला नाही. गेल्या काही वर्षांपासून भारतात वेद शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊन अनेक व्यक्ती व संस्था पुढे आल्यात व त्यांनी वेद शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यास सुरुवात केलेली आहे. त्याद्वारे नवीन पिढीला वेद विषयाकडे वळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. भारतात पूर्वी वेदांच्या अनेक शाखा होत्या. त्यासोबत ग्रंथ, ब्राह्मण आरण्यक, उपनिषद आदी ग्रंथांचा सागर होता. या शाखा होय. पूर्वी या शाखेचे घनपाठ अध्ययनाचे कार्य महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर होत होते. विदर्भातही या वेद शाखेचे जवळपास शंभर घनपाठी होते. परंतु, कालांतराने ही संख्या हळूहळू कमी होत गेली. पण अलिकडेच या वेदशाखेचे शिक्षण देणारी एक संस्था नागपूर येथे स्थापन झालेली आहे. ही संस्था म्हणजेच वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) होय. हे वेद विद्यालय श्रद्धेय किशोरजी व्यास (श्रद्धेय स्वामी गोविंदगिरी महाराज) यांच्या प्रेरणेने व आशीर्वादाने सुरू झालेलेआहे. आधुनिक काळातही वेदाचे शिक्षण देणारी ही एक वैशिष्ट्यपूर्ण संस्था आहे. नागपूरला २००८ मध्ये एका लहानशा खोलीत, वेदमूर्ती प्रवीण लिगदे गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली, केवळ पाच विद्यार्थी वेद अध्ययन करीत आहेत. या वेद विद्यालयात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्याला संलक्षण घनपाठी शिक्षणाव्यतिरिक्त औपचारिक व व्यावसायिक शिक्षणही तसेच पौराहित्य - संहिता यांचे शिक्षण दिले जाते. वेदांचेअध्ययन करण्यासाठी बारा ते पंधरा वर्षे लागतात. यात संहिता अध्ययन तीन वर्षे, ब्राह्मण आरण्यक दोन वर्षे, पदपाठ अध्ययन दोन वर्षे, घनपाठ अध्ययन दोन वर्षे, उपनिषद दोन वर्षे याशिवाय संस्कृत, व्याकरण, वैदिक व्याकरण, निरुक्त, छंद मीमांसा, वेदांत यासाठी तीन वर्षे लागतात.

या वेद विद्यालयाद्वारे अष्टविकृती महाग्रंथांचे (जटा, माला, शिखा, रेखा, ध्वज, दंड, रथ, घन इ.) भारतात प्रथमच प्रकाशन होत आहे.

या वैदिक केंद्रात प्रवेशित विद्यार्थ्यांचे वय साधारणतः आठ ते बारा वर्षेपर्यंत आहे, पण यासाठी वयाची कोणतीही मर्यादा नाही. प्रवेशित विद्यार्थ्यांकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही. त्यांचा संपूर्ण खर्च संस्था करीत असते. यासाठी सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव असलेल्या व्यक्ती यथायोग्य मदत करीत असतात. या वैदिक केंद्रात जे विद्यार्थी संहिता पूर्ण करून आले होते, त्यांनी आठ वर्षे पुढील शिक्षण घेतले. ते पुणे, तिरुपती, कांचीपुरम येथील परीक्षा देऊन उत्तमरीत्या उत्तीर्ण झालेत. हेच विद्यार्थी नागपूर, रामटेक, चेन्नई येथे वेद शिक्षणाचे अध्यापक म्हणून कार्यरत आहेत. या वेद विद्यालयात प्रमुख सुवर्णपदक प्राप्त वेदमूर्ती प्रवीण लिंगदे गुरुजी यांच्यासह वे. मू. सर्वश्री आदित्य कुळकर्णी, प्रथमेश निर्मल, सचिन बाभूळगावकर आणि लीलाधर शर्मा (हे वेदांमध्ये पीएच. डी. करीत आहेत) असे पाच शिक्षक अध्यापनाचे कार्य करीत आहेत.

वैदिक केंद्रात येणाऱ्या विद्यार्थ्याला सुसंस्काराचे शिक्षण दैनंदिन कार्यातून मिळते. विद्यालयाची दिनचर्याही वैशिष्ट्यपूर्ण आहे. पहाटे ४ वाजता सुरू झालेली दिनचर्या रात्री १० वाजता संपते. यात वेद प्रार्थना, वेदाभ्यासाबरोबर भोजन, विविध खेळ, उपासना, संध्या इ. गतिविधी केल्या जातात. या दिनचर्येत संस्कृत, इंग्रजी व संगणक विषयाचे अध्यापनही उत्कृष्ट अध्यापकांद्वारे केले जाते. तसेच स्वावलंबनाचे धडेही दिले जातात. प्रत्येकातील सुप्त गुणांना विकसित करण्याची संधी दिली जाते. जेव्हा हे वैदिक अनुसंधान केंद्र (वेद विद्यालय) लक्ष्मीनगरमधील श्री सिद्ध हनुमान मंदिरात स्थानांतरित झाले, तेव्हा तेथील रहिवासी व समाजाचेही सहकार्य प्राप्त होऊ लागले. याच विद्यालयाने २८ जानेवारी ते ९ फेब्रुवारी २०१६ या कालावधीत शुक्ल यजुर्वेद काण्व शाखेचे संपूर्ण घन पारायणाचा कार्यक्रम भव्य स्वरूपात आयोजित केला होता. यात संपूर्ण महाराष्ट्रातील जवळपास एक हजार वेद शिक्षक व विद्यार्थी आणि वेदप्रेमी उपस्थित होते. या कार्यक्रमाच्या समारोपीय समारंभात रा. स्व. संघाचे प. पू. सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, श्रद्धेय स्वामी गोविंदगिरी देव महाराज, जितेंद्रनाथ महाराज यांचे मार्गदर्शन लाभले. याच कार्यक्रमाच्या एक दिवस आधी करवीर पीठाचे शंकराचार्य प. पू. नरसिंह भारती यांनी भेट दिली. तसेच वैदिक संमेलन २०१९ मध्ये घेण्यात आले. त्या संमेलनात भारतातील गणमान्य १०० वैदिक घनपाठींचा सहभाग होता. या संमेलनाचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी होते. हे वेद विद्यालय, महर्षी सांदीपनी राष्ट्रीय संस्कृत शिक्षा बोर्ड, उज्जैनतर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षांसाठी केंद्र म्हणून मान्यताप्राप्त आहे. वेद शिक्षण घेणारे विद्यार्थी या परीक्षा देऊ शकतात. उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांना बोर्डातर्फे बारावी समकक्ष प्रमाणपत्र देण्यात येते. वैदिक अनुसंधान केंद्र नरेंद्रनगर नंतर दीनदयालनगर वास्तूत स्थानांतरण केल्यानंतर वेद शिक्षणासमवेत औपचारिक शालेय शिक्षणही विद्यार्थ्यांना देण्यात येते. या वेद विद्यालयाच्या कार्यक्रमांमुळे सभोवतालच्या परिसरातील समाजात सुसंस्कारांचे वातावरण निर्माण होत आहे. वेद पठनामुळे निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा एक सकारात्मक परिणाम समाजावर होत असतो. अलिकडेच संपूर्ण जगात वेदांवर जे संशोधन चालले आहे त्यातील जवळपास ५० टक्के संशोधनाचा मुख्य विषय 'वेद पठनातून निर्माण होणारी ऊर्जा' हा होय.

वेद शिक्षणाची आधुनिक काळात गरज काय? ते शिक्षण घेतल्याने शिक्षित विद्यार्थ्यांचा लाभ काय? त्यांचे भवितव्य काय? असे अनेक प्रश्न विचारले जातात. वास्तविक कोणत्याही देशाची प्रतिमा, विकास व त्या देशातील जनसंख्या कशी आहे, यावर अवलंबून असते. त्यामुळेच सुसंस्कृत, संवेदनशील समाजरचना सातत्याने राहावी यासाठीच वेद शिक्षण महत्त्वाचे. वेद अभ्यासक, वेदमूर्ती, वेदशिक्षित व्यक्तींची संख्या वाढली तर समाजात सकारात्मकतेची बीजं रुजू होतील. रोजगार मागणाऱ्यांपेक्षा रोजगार देणाऱ्यांची संख्या अधिक असणे कोणत्याही देशाच्या दृष्टीने आवश्यक असते. स्वयंरोजगार संख्या महत्त्वाची असते. यासाठीच वेदशिक्षण महत्त्वाची भूमिका बजावू शकते. सर्व दृष्टीनेच वेद शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच वैदिक अनुसंधान केंद्र कार्य करीत आहे. म्हणूनच, संपूर्ण समाजाला सुसंस्कारित करण्याचे कार्य करणाऱ्या व त्यातून निर्माण होणाऱ्या ऊर्जेचा सुपरिणाम करणाऱ्या यासारख्या केंद्रांची आज आवश्यकता आहे. वेद शिक्षणाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी, त्याचे देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासातील महत्त्वाचे स्थान लक्षात घेता, शासन, सामाजिक संस्था व अन्य संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज आहे.

९८५०३१३३२९

## स्मरण

**अच्युत गोडबोले**

# आनंद कभी मरते नहीं...

माझ्या आयुष्यात सतत आनंद पेरणारा माझा अत्यंत जवळचा चाळीस वर्षांचा मित्र आनंद आज माझा हात सोडून गेला यावर विश्वासच बसत नाहीये. त्याचं मोठं ऑपरेशन होणार आहे, त्यानंतर ऑपरेशन चांगलं झालं आणि त्यानंतर त्याच्या प्रकृतीत सुधारणा होत असल्याच्या अनेक बातम्या आणि अपडेट्स आयपीएचकडून सतत मिळत होते. पण हे ऑपरेशन गुंतागुंतीचं होतं आणि त्यामुळे अचानक प्रकृती बिघडून आनंद आपल्याला सोडून निघून गेला.

१९८० च्या दशकात जेव्हा माझा मुलगा निहारला ऑटिझम डिटेक्ट झाला, तेव्हा डॉ. राजेंद्र बर्वे या सुप्रसिद्ध मानसोपचारतज्ज्ञानं त्याचं प्रथम निदान केलं होतं. त्यावेळी माझ्यासकट अनेकांनी ऑटिझम हा शब्दच ऐकलेलाच नव्हता. त्यामुळे राजेंद्रच्या रूममधून बाहेर येताना हा काहीतरी किरकोळ प्रकार असेल आणि थोड्याशा गोळ्या घेऊन बरा होईल, असं मला पहिल्यांदा वाटत होतं. त्यावेळी दादरला राजेंद्रच्याच जवळ आनंद प्रॅक्टिस करत होता. त्याच्याकडे मी जाऊन ऑटिझम म्हणजे काय एवढंच विचारलं. त्यावेळी आनंदनं मला त्याची पूर्ण कल्पना दिली आणि मी हादरूनच गेलो. तो क्षण माझ्या आयुष्याला कलाटणी देणारा ठरला आणि पूर्णपणे गर्तेत गेलेला मी आयुष्यात पुन्हा उभा राहिलो. हे सगळं राजेंद्र आणि आनंद यांच्यामुळेच शक्य झालं.

त्यानंतर आनंदच्या माझ्या गाठीभेटी अनेक वेळा होत गेल्या. माझ्या किमयागार पुस्तकाचं प्रकाशन अभिनेत्री रीमा हिच्या पुढाकारानं डॉ. वसंत गोवारीकर यांच्या हस्ते झालं होतं. त्यावेळी संगीत, साहित्य, रंगभूमी, चित्रपट आणि विज्ञान या क्षेत्रातले अनेक दिग्गज हजर होते. त्यातही आनंद माझ्यासाठी ठाण्याहून माझं कौतुक करायला हजर होता याचं मला केवढं अप्रूप होतं! माझ्या लिखाणाला तो सतत प्रोत्साहन देत असे. माझ्याबद्दल मनापासून बोलत असे.



मनोविकारांवर मनकल्लोळ नावाची दोन पुस्तकं मी नीलांबरी जोशीबरोबर लिहिली. ती लिहिल्यानंतर त्यात टेक्निकल काही चूक राहू नये म्हणून ती आनंदला वाचायला दिली होती. त्यानंतर त्याच्या घरी अनेक तास आम्ही चर्चा केली तेव्हा त्याच्या त्या विषयाच्या सखोल ज्ञानाची झलक आम्हाला बघायला मिळाली. शिवाय, एवढ्या व्यस्त दिनक्रमात त्यानं त्या पुस्तकाची ओळन्‌ओळ वाचली होती याचं मला प्रचंड आश्चर्य वाटत राहिलं. ते पुस्तक आज प्रचंड लोकप्रिय झाल्याचं खूप मोठं श्रेय मी आनंदलाच देईन.

एकाच वेळी अतिशय ज्ञानी आणि लोकाभिमुख मनोविकारतज्ज्ञ, लेखक, उत्कृष्ट वाचक, कवी, गायक, नाटककार, वक्ता, सामाजिक कार्यकर्ता, छायाचित्रकार, कॉर्पोरेट ट्रेनर, संत वाङ्मयाचा सखोल अभ्यासक हे सगळं असणं ही जवळपास अशक्य गोष्ट फक्त आनंदच करू जाणे! त्यानं लहान मुलांपासून अनेक विद्यार्थी आणि माणसं यांच्यावर सामाजिक संस्कार व्हावेत म्हणून ठाण्यामध्ये 'वेध' या नावानं कार्यक्रम करायला सुरुवात केली. ते इतके लोकप्रिय झाले की नंतर ते मोठ्या पटांगणावर व्हायला लागले. अनिल अवचट आणि आनंद यांनी व्यसनमुक्तीसाठी पुण्यामध्ये मुक्तांगण चालू केलं आणि त्यासाठी आनंदनं सुद्धा अनिलबरोबर प्रचंड श्रम केले आणि योगदान दिलं. दोन तीन वेळेला मुंबईहून पुण्याला रेल्वेनं जाताना मला आनंद गाडीत भेटला होता. कुठे चाललास, असं विचारलं तर मी मुक्तांगणला नेहमी जातो, असं त्यानं सांगितलं. हा टाईम मॅनेजमेंट केव्हा आणि कसं करतो याचं मला नेहमीच कोडं पडे.

त्याची मानसशास्त्रावर आणि भावनांवर तसंच आरईबीटीवरची व्याख्यानं म्हणजे बौद्धिक आणि भावनिक पर्वणीच असे. तो अनेक धर्मातले तसंच संत वाङ्मयातले इतके संदर्भ द्यायचा की हा मनोविकारतज्ज्ञ किंवा मनोविकासतज्ज्ञ आहे की संत वाङ्मयाचा गाढा अभ्यासक आहे हेच कळायचं नाही. तो उत्कृष्ट नाटककारही होता. त्याचं सगळ्यात शेवटचं नाटक म्हणजे लॉस्ट सपर. हे नाव सुद्धा लास्ट सपर वरून घेतलेलं होतं, कारण याला ख्रिश्चन धर्मामध्ये खूप महत्त्व होतं आणि त्यावरूनच अनेक प्रसिद्ध चित्रकारांनी याच नावाची चित्रंही काढली होती. आनंदचं नाटक मात्र विवेकानंदांच्या आयुष्यातल्या आणि स्वभावातल्या वेगळ्याच छटांवर प्रकाश पाडत होतं. आनंदनं मला फोन करून ते बघायला बोलवलं होतं. ते इंग्रजीतलं नाटक अतिशय उत्कृष्ट तऱ्हेनं सादर केलं होतं. काही दिवसांपूर्वी त्यानं हिंदी सिनेमातली गाणी आणि वेगवेगळ्या भावना यांची सांगड घालणारा एक कार्यक्रम पुण्यामध्ये यशवंतराव चव्हाणमध्ये केला होता. कार्यक्रम संपल्यावर टाळ्यांचा कडकडाट थांबलाच नाही आणि नाट्यगृहातल्या सगळ्या लोकांनी उभं राहून त्याला मानवंदना दिली होती. एवढं सगळं चालू असताना त्यानं इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ म्हणजेच आयपीएच ही संस्था काढली आणि ती मुंबई आणि पुणे इथे समर्थपणे चालवली. हजारो मनोरुग्णांना सल्ला आणि औषध देणं हे काम या संस्थेनं केलं आणि अजूनही करत आहे. आत्महत्येपासून परावृत्त करण्याकरिता २४ तासांची हेल्पलाईन चालू करण्यापासून अनेक उपक्रम तो त्यात राबवत असे आणि एवढं करून रोज तो त्याची ओपीडी मात्र कधी चुकवत नसे. हे सगळं अजबच!

गेल्या वर्षी मला ७५ वर्षे पूर्ण झाली तेव्हा त्या कार्यक्रमात डॉ. अनिल काकोडकर आणि आनंद यांना प्रमुख पाहुणे आणि अध्यक्ष म्हणून बोलवलं होतं. त्यावेळी सुद्धा आनंद माझ्याविषयी जे चांगलं बोलला, ते ऐकून मला हर्षवायूच झाला होता. आनंद रसरशीत आयुष्य जगला. खरं म्हणजे त्याच्या आयुष्यात खूप संघर्ष होता. लहानपणीच झालेला पोलिओ, त्यानंतर आलेल्या अनेक शारीरिक व्याधी, वैयक्तिक आयुष्यात आलेले अनेक कटू प्रसंग आणि चढ-उतार, मध्येमध्ये येणाऱ्या आर्थिक अडचणी अशा अनेक अडचणींमधून हा मनुष्य वाट काढतो आहे असं त्याला भेटणाऱ्या कोणालाच कळणं शक्य नव्हतं इतका तो सतत आनंदी असे.

आज आनंद आपल्यात नसला तरी तो लोकांच्या हृदयावर कायमच कोरलेला असेल यात शंकाच नाही. त्याला कदापि विसरणं शक्य नाही. कारण आनंद कभी मरते नहीं हेच खरं!

## मुंबई वार्तापत्र

**नागेश दाचेवार**

# नाकर्त्यांची जळजळ!

ज्यांच्या राजकारणाचा पायाच मुळात नैराश्य, गद्दारीचे रडगाणे आणि केवळ वैयक्तिक टीकेवर आधारलेला आहे, त्यांच्याकडून देशाच्या हिताच्या धोरणांची स्तुती होण्याची अपेक्षा करणे म्हणजे गाढवाकडून सुरेल गायनाची अपेक्षा करण्यासारखे आहे. ज्यांच्या घरात घुसून बसण्याच्या सवयीचे एकेकाळी वाभाडे काढले गेले, त्यांच्या मालकीच्या मुखपत्राची ओळख आता केवळ आणि केवळ 'ऊर बडवेगिरी' आणि 'वैफल्याचे डोस' देणारे पत्रक एवढीच उरली आहे. त्या पत्रकातून देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या परदेश दौऱ्यावर आणि त्यांच्या काटकसरीच्या आवाहनावर जी चिखलफेक करण्यात आली आहे, ती त्यांच्या बौद्धिक, वैचारिक दारिद्र्याची साक्ष देते.

**'वर्क फ्रॉम होम' मुख्यमंत्री आठवतात?** : पंतप्रधानांच्या काटकसरीवर आणि दौऱ्यांवर बोट ठेवणाऱ्या संजय राऊत यांनी आधी आपल्या मालकाचा इतिहास चाळावा. रोज सकाळी नऊ वाजता कॅमेऱ्यासमोर येऊन पोपटासारखी बडबड करणाऱ्या राऊतांना विसर पडला असेल, पण महाराष्ट्रातील जनता तो काळा कालखंड कधीच विसरू शकत नाही. जेव्हा संपूर्ण देश आणि महाराष्ट्र कोरोना महामारीच्या महाभयंकर संकटाशी दोन हात करत होता, जनता हवालदिल होती, राज्याचे अर्थचक्र ठप्प झाले होते आणि लोक हक्काच्या मुख्यमंत्र्यांकडे आशेने पाहत होते, तेव्हा यांचे 'लाडके' मुख्यमंत्री उद्धव ठाकरे 'मातोश्री'च्या एसी खोलीत लपून बसले होते.

कोरोनाच्या भीतीने घराबाहेर न पडता, केवळ 'फेसबुक लाईव्ह'वरून 'माझे कुटुंब, माझी जबाबदारी'चे तुणतुणे वाजवून संपूर्ण राज्य सांभाळू पाहणारे त्यांच्यासारखे तेच. मंत्रालयाची पायरी न चढता, जनतेला वाऱ्यावर सोडून घरातून सरकार चालवणाऱ्या या 'फेसबुक मुख्यमंत्र्यांना' महाराष्ट्रातील जनतेने उद्वेगाने आणि संतापाने 'घरकोंबडा' ही पदवी बहाल केली होती, याची आठवण आज संजय राऊत यांना आहे का? ज्यांच्या नेतृत्वाने संकटाच्या काळात जनतेच्या पाठीशी उभे राहण्याचे धाडस दाखवले नाही, ज्यांनी केवळ 'वर्क फ्रॉम होम' करून राज्याची वाट लावली होती, ते मुख्यमंत्री त्यांना आठवतात काय, हा खरा प्रश्न. यापूर्वी या 'फेसबुक मुख्यमंत्र्यांनी' राज्यातील शेतकऱ्यांना शेती 'वर्क फ्रॉम होम' करण्याचा सल्ला देऊन मोठा पराक्रम केला होता. त्यांच्या तोंडून अहोरात्र, २४ तास देशासाठी धावणाऱ्या आणि संकटसमयी थेट सीमेवर सैनिकांसोबत दिवाळी साजरी करणाऱ्या पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका व्हावी, हा या शतकातील सर्वांत मोठा विनोद आहे!



**'टोमणे गँग'ला फक्त 'हप्तेखोरी' समजणार!** : पंतप्रधान मोदींनी देशातील जनतेला इंधनाची बचत करण्याचे आणि काटकसरीचे जे आवाहन केले, तो सुजाण राष्ट्रप्रमुखाचा देशाप्रति असलेला प्रामाणिक दृष्टिकोन आहे. संकटसमयी देशाने एकत्र यावे, ही भारतीय संस्कृती आहे. पण, ज्यांना केवळ 'चेष्टा करणे' एवढेच समजते, त्यांना या आवाहनामागील राष्ट्रीय भावना कशी समजणार? निवडणुकांमध्ये पैसे उडवले, रॅली काढल्या म्हणून पंतप्रधानांनी काटकसरीचे ज्ञान शिकवू नये, असा अजब जावईशोध या बौद्धिक दिवाळखोरांनी लावला आहे. लोकशाहीच्या उत्सवात जनतेपर्यंत पोहोचणे आणि देशाच्या आर्थिक शिस्तीसाठी धोरणे आखणे, या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत, हे समजण्याइतके शहाणपण उबाठा गटाच्या नेत्यांकडे शिल्लक राहिलेले नाही. कोरोनाच्या काळात ज्यांनी 'खिचडी घोटाळा' आणि 'बॉडी बॅग घोटाळा' करून मृतांच्या टाळूवरील लोणी खाल्ले, त्यांनी आर्थिक शिस्तीच्या गप्पा मारणे म्हणजे शुद्ध ढोंगीपणा आहे.

**'गल्लीतल्या' नेत्यांचे भाष्य** : अमेरिकेच्या दबावामुळे मोदी रशियाकडून स्वस्त गॅस घेत नाहीत, असा अत्यंत बालिश आणि खोटा आरोप हे लोक करत आहेत. संभ्रम पसरविण्याचा प्रयत्न करत आहेत. संपूर्ण जगाने पाहिले आहे की, युक्रेन युद्धाच्या काळात जेव्हा संपूर्ण जगाने रशियावर निर्बंध लादले होते, तेव्हा केवळ आणि केवळ पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कणखर नेतृत्वामुळे भारताने अमेरिकेच्या दबावाला झुगारून रशियाकडून सवलतीच्या दरात कच्चे तेल आणि गॅस खरेदी केला. हा भारताचा आंतरराष्ट्रीय विजय होता. पण, ज्यांचे राजकारण केवळ मुंबई महापालिकेच्या कंत्राटांभोवती आणि 'वझे'शाहीच्या हप्तेखोरीभोवती फिरते, त्यांना जागतिक पातळीवरील 'भू-राजकारण' 'अर्थकारण'काय समजणार?

**टोमणे गँगचे दुकान आता बंद होणार!** : 'ईव्हीएम'मध्ये कमळाबाईला कोंबून संकट दूर होणार नाही, अशी भाषा वापरणाऱ्यांना हे ठावूक असावे की, जनतेने तुम्हाला तुमच्या घरात बसून राहण्याच्या कर्मामुळे नाकारले आहे. महापालिकेतून होणारी मुंबईकरांच्या पैशांची लूट बंद झाल्यामुळे आणि सत्तेची ऊब गेल्यामुळे जी तडफड सुरू आहे, ती वेगवेगळ्या माध्यमातून बाहेर पडत आहे. त्यामुळे कितीही जळजळ व्यक्त केली तरी जनतेचा गैरसमज होणार नाही, हे नक्की. नाकर्ते म्हणूनच या जळजळ करणाऱ्यांना जनतेने वारंवार नाकारले हेच सत्य आहे आणि कर्ते काय करू शकतात, हे सारा महाराष्ट्र पाहतोय. महाराष्ट्रात देवेंद्र फडणवीस आणि महायुतीचे सरकार आल्यापासून कोट्यवधींच्या गुंतवणुकीचा महाधडाका सुरू झाला आहे. तरुणांना प्रत्यक्ष रोजगार मिळत आहेत. पाणलोट क्षेत्राला बळ, दमणगंगा-गोदावरी, नळगंगा-वैनगंगा, पारगोदावरी यासारख्या नदीजोड प्रकल्पांसाठी चालना, 'मुळा-मुठा'सारख्या रखडलेल्या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पांना गती मिळत आहे. मिठी नदीची वाट लावणाऱ्यांना ही विकास कामे डोळ्यांनी पाहण्याचे आणि त्याचे स्वागत करण्याचे औदार्य कसे होईल? हे सगळे बघून त्यांची जळजळच होईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतिपथावर आहे आणि जगभरात भारताचा डंका वाजतोय. विरोधकांच्या छातीत यामुळे धडधड होत आहे. मात्र, उबाठा गटाने कितीही जळजळ व्यक्त केली, तरी स्वतःच्या घरातून बाहेर पडून देशासाठी धावणाऱ्या नेतृत्वाची बरोबरी हे कधीच करू शकत नाहीत.

९२७०३३३८८६

## वाचक पत्रे

### वर्क फ्रॉम होमची मर्यादा

कोरोना महामारीपासून अनेकांना वर्क फ्रॉम होमच्या मंत्राची सवय झालेली आहेच आणि त्यामुळे वेळ, ऊर्जा, इंधनाची बचत होऊन कामेही गतिशील होतात; परंतु शिक्षणाच्या बाबतीत हा मंत्र योग्य वाटत नाही. गुरुकुलात अर्थात शाळा, महाविद्यालयात गुरुमुखातील शिक्षण हेच संस्कृतीने प्रमाण मानलेले आहे. त्यामुळे घरी बसून इंटरनेट अथवा मोबाईलवरील शिक्षण सार्थ वाटत नाही व शारीरिकदृष्ट्या मुलांना हानिकारकच ठरते. तेव्हा पंतप्रधानांनी किमान शैक्षणिक बाबतीत वर्क फ्रॉम होमच्या मंत्रापासून विद्यार्थ्यांना दूर ठेवणे उचित वाटते. कारण शेवटी प्रत्येक गोष्टीची लक्ष्मणरेषा असतेच.

**अमोल करकरे**/ ९९६७९२७६१७

### अफगाणिस्तान-पाकिस्तानातील वाढता संघर्ष चिंताजनक

जेव्हापासून अफगाणिस्तानमध्ये तालिबान सत्तेवर आले आहे तेव्हापासून त्यांचा पाकिस्तानबरोबर संघर्ष वाढतच चालला आहे. ज्या पाकिस्तानने अफगाणिस्तानमध्ये कट्टर इस्लामी सत्ता येण्यासाठी प्रोत्साहन दिले, त्याचबरोबर वेगवेगळ्या प्रकारे मदतीची रसद पुरवली त्याच अफगाणिस्तानकडून आता पाकिस्तानवर हिंसक हल्ले वाढवले जात आहेत. अलिकडेच झालेल्या लष्करी संघर्षात तालिबानने पाकिस्तानच्या ५५ सैनिकांना ठार केले आहे. मागील काही दिवसांच्या सुरुवातीपासून दोन्ही देशांच्या सीमावर्ती भागात अंदाधुंद गोळीबार झाला होता. अफगाणी सैन्याने पाकिस्तानच्या पंधरा लष्करी चौक्या ताब्यात घेतल्याचा दावा केला गेला. दोन्ही देश स्वतःला मुस्लिम राष्ट्र म्हणवत असतानाही हा संघर्ष अनाकलनीय वाटतो. पाकिस्तानी लष्कराने सीमेवरील पंधरा निष्पाप अफगाणी नागरिकांना मारले होते. त्यावरून हा संघर्ष पेटला आहे. रमजानच्या पवित्र महिन्यात देखील इस्लामी राज्यकर्त्यांना रक्तरंजित संघर्ष करावा लागला होता. यावरून धर्माच्या आधारावर एखाद्या राष्ट्राची निर्मिती झाली असेल तर समानधर्मीय राष्ट्रांमध्ये सौहार्दपूर्ण वातावरण राहीलच याची शाश्वती देता येत नाही.



आखाती देशातील शेजारी राष्ट्रेसुद्धा एकमेकांवर हल्ले करताना दिसून येतात. या पृष्ठभूमीवर पाकिस्तान आणि अफगाणिस्तानमधील वाढता संघर्ष भारतीय उपखंडासाठी चिंतेचा विषय झाला आहे. अफगाणिस्तानसारखा देश मागील अनेक दशके रशिया आणि अमेरिका यासारख्या महाशक्ती मानल्या जाणाऱ्या देशांच्या ताब्यात होता. तिथे तालिबानींच्या माध्यमातून धार्मिक इस्लामिक क्रांती झाल्याचे सांगितले जाते. ज्या अवस्थेत स्त्रियांना अतिशय अन्यायकारक वागणूक मिळत आहे. अफगाणिस्तान आणि पाकिस्तान या दोन शेजाऱ्यांमध्ये युद्ध पेटलेले असताना भारताचे मात्र अफगाण राज्यकर्त्यांशी मैत्रीचे संबंध आहेत. इतकेच नव्हे तर अफगाणी क्रिकेटपटूंना आपल्या देशातील जनता डोक्यावर घेत असते. त्याचबरोबर भारत आणि अफगाणिस्तान यांच्यामधील व्यापारी संबंधदेखील वाढत चालले आहेत. या पृष्ठभूमीवर तालिबान विरुद्ध पाकिस्तान हा संघर्ष मिटण्याची आवश्यकता आहे. युद्धग्रस्त वातावरणाची झळ सामान्यांनाच बसत असते.

**प्रा. मधुकर चुटे**/ ९४२०५६६४०४

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

# देशाला परमवैभवाकडे नेणारा कार्यकर्ता घडवण्याचे ठिकाण म्हणजे संघ शिक्षा वर्ग : सचिन कुलकर्णी

## सोलापुरातील रा.स्व संघाच्या तिसऱ्या संघ शिक्षा वर्गाला प्रारंभ




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १५ मे-**

स्वयंसेवकाला समाजात काम करण्यासाठी तयार करणारा हा प्रथम शिक्षा वर्ग महत्त्वाचा आहे. ही कार्यकर्त्यांसाठी एक वैचारिक पर्वणीच आहे. पहाटे ५ ते रात्री १० वाजेपर्यंत चालणाऱ्या विविध प्रकारच्या प्रशिक्षणातून कार्यकर्त्यांचा गुणात्मक विकास या वर्गात केला जातो. हा वर्ग म्हणजे देशाला परम वैभवाकडे नेणारा कार्यकर्ता घडविण्याचे ठिकाण आहे असे प्रतिपादन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहकार्यवाह सचिन कुलकर्णी यांनी केले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पश्चिम महाराष्ट्र प्रांताच्या सोलापुरातील संघ शिक्षा वर्गाचा प्रारंभ हरिभाई देवकरण प्रशालेत शुक्रवारी झाला. याप्रसंगी त्यांनी स्वयंसेवकांना संबोधित केले. याप्रसंगी व्यासपीठावर महापौर विनायक कोंड्याल, पश्चिम महाराष्ट्र प्रांताचे संघचालक सुरेश जाधव, या वर्गाचे सर्वाधिकारी कराडचे जिल्हा सहसंघचालक शशिकांत फिरंगे

उपस्थित होते. भारत मातेच्या पूजनाने वर्गाचे उद्घाटन करण्यात आले. सचिन कुलकर्णी यांनी पुढे बोलताना संघाचे वैचारिक अधिष्ठान मजबूत असल्यानेच त्याची तुलना इतर कोणत्याही संघटनेशी होऊ शकत नाही, असे पूजनीय सरसंघचालक म्हणूनच म्हणतात असे सांगितले. संघ कोणत्याही जातीचा नसून, तो सर्व भारतीयांना संघटित करतो. घरात भांडे कोणतेही असले तरी त्यातील पाणी हिंदुत्वाचेच आहे, इतक्या सोप्या भाषेत संघाचे स्वरूप स्पष्ट होते. या वर्गात शालेय, महाविद्यालयीन आणि व्यावसायिक अशा तीन वेगवेगळ्या श्रेणींतील कार्यकर्ते संघाच्या कार्यपद्धतीचा जवळून अभ्यास करतील. अखिल भारतीय स्तरावरील कार्यकर्ते त्यांच्या शंकांचे निरसन करून कार्यवृद्धीसाठी मार्गदर्शन करणार आहेत. संघशताब्दीसाठी कार्यकर्त्यांच्या पाच पिढ्या खर्ची पडल्या असून, आता सहावी पिढी हे वैचारिक अधिष्ठान पुढे नेण्यासाठी सरसावली आहे. या वैचारिक अधिष्ठानातूनच समाजात परिवर्तन घडवणारे कार्यकर्ते तयार होतील. त्यामुळे सर्व स्वयंसेवकांनी समाजाप्रती कर्तव्य भावना व सहजीवनाची सवय लावून घेत संघ कामाचा प्रभाव सर्वत्र वाढवण्याचा प्रण करावा, असे आवाहन सह प्रांत कार्यवाह सचिन कुलकर्णी यांनी केले.

### संघ विचार हा एक संस्कारच

महापौर विनायक कोंड्याल यांनी मनोगत व्यक्त करताना, संघ विचारांचा पहिल्यापासूनच माझ्यावर प्रभाव आहे. माझ्या वडिलांवरही संघाचा संघाप्रती माझ्या मनात नितांत आदर आहे. संघ विचार हा एक संस्कारच आहे. या वर्गाचा उद्घाटक म्हणून मला आमंत्रित केले हे मी माझे भाग्य समजतो. राष्ट्र प्रेमाचे संघाचे धोरण माझ्या मनाला भावले आहे. सोलापूरच्या सर्वांगीण विकासासाठी संघाचे मार्गदर्शन घेत राहणार.

### मोबाईल विरहित वर्ग

सलग १५ दिवस चालणारा या वर्गात सर्व स्वयंसेवकांकडे मोबाईल नसणार आहे. या वर्गात पहाटे ५ वाजल्यापासून रात्री १०.३० पर्यंत, वेळेचे नियोजन, शारीरिक, बौद्धिक प्रशिक्षण यासोबतच सेवाव्रत, सामाजिक समरसता आदी बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

## शुध्दीपत्रक

यांत दि. १४/०५/२०२६ रोजी सोलापूर येथील दैनिक तरुण भारत या वृत्तपत्रात पान नं. ५ वर जाहिर नोटीस देण्यात आली असून यातील स.नं. ७६०-अ याऐवजी स.नं. ४६०-अ असे वाचण्यात यावे. तसेच आमचे अशिल नं. १ सुरेश राजू यमपूरे याऐवजी सुरेखा राजू यमपूरे असे वाचण्यात यावे. हे शुध्दीपत्रक दिले दि. १५/०५/२०२६

(शिक्का)

**सही/-**
**श्री. अश्विन एस. कोंगारी**
**बी.कॉम., एलएल.बी. ॲडव्होकेट**
**पत्ता - प्लॉट नं. २३, नवनाथ नगर, आकाशवाणी केंद्र रोड, सोलापूर मो.नं. ९८९०५०३२८१**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## जाहीर नोटीस

जन्म-मृत्यू प्रकरण
अर्ज क्र. ५०/२०२६

### मे. कार्यकारी दंडाधिकारी, बार्शी यांच्या न्यायालयात

**१. घनश्याम जगन्नाथ राऊत** - **अर्जदार**
रा. तानाजी चौक बार्शी ता. बार्शी
(असल्यास, तर्फे वकील विजय न. कुलकर्णी)
विरुध्द
**२. जन्म-मृत्यू नोंदणी अधिकारी तथा मुख्याधिकारी न.प. बार्शी** - **गैरअर्जदार**

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, अर्जदाराचे आई काशीबाई जगन्नाथ राऊत, रा. तानाजी चौक बार्शी, ता. बार्शी यांचा मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी याठिकाणी दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी मृत्यू झालेला असून त्यांची मृत्यू नोंद नजरचुकीने करण्याची राहिलेली असून, जन्म-मृत्यू नोंदणी नियम १९६९ (सुधारीत २०२३) कलम १३ (३) अन्वये मृत्यू नोंदीचा आदेश होणेकामी अर्ज दाखल केलेला आहे. तरी अर्जदाराचे आई काशीबाई जगन्नाथ राऊत यांचा दिनांक १९ फेब्रुवारी २०२२ रोजी मौजे बार्शी स्थानिक क्षेत्र ता. बार्शी, जि. सोलापूर येथील राहत्या घरी या ठिकाणी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः किंवा वकिलामार्फत मे. न्यायालयात प्रसिध्दीच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत समक्ष हजर राहुन द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून सदरची नोंद घेणेकामी गैरअर्जदार यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतीचा विचार केला जाणार नाही.

आज ता. ०९ एप्रिल २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व शिक्यानिशी दिली.

(शिक्का)

**सही/-**
**(एफ.आर. शेख)**
**तहसिलदार, बार्शी**

## सावधानतेची नोटीस

जनजागृती प्रबोधन मंच रजिस्टर नंबर F-1896 या संस्थेचा परिशिष्ट-अ चा विचार केला असता, ज्ञानेश्वर भानुदास बाबर यांना सन १९९१ मध्ये संस्थेने अविश्वासाचा ठराव घेऊन संस्थेच्या विरोधात काम करत असल्याने त्याच वेळेला संस्थेतून काढून टाकलेले असताना संस्थेशी कोणत्याही प्रकारचा संबंध नसताना स्वतःला संस्थेचा अध्यक्ष म्हणत सर्वांची दिशाभूल करत आहे. त्रयस्थ व्यक्ती असल्याने कायदेशीर, वैधानिक आणि घटनात्मक अधिकार नाही. ज्ञानेश्वर भानुदास बाबर यांचा गेली ३७ वर्षापासून संस्थेशी कोणत्याही प्रकारचा संबंध नाही केवळ फुकट काही मिळाले तर हडपण्याच्या उद्देशाने वायफळ प्रयत्न करीत आहे.

मु.पो. चोपडी, ता. सांगोला, जि. सोलापूर या गावाचा तंटामुक्ती अध्यक्ष म्हणून ओळखले जाणारे ज्ञानेश्वर भानुदास बाबर यांनी सन १९९१ ते सन १९९८ या कालावधीत सिध्दनाथ नागरी पतसंस्था चोपडी या संस्थेच्या सचिव पदावरती असताना लाखो रूपयांचा अपहार करून सदर संस्था मोडकळीस आणली. व आमच्या संस्थेशी काहीही संबंध नसताना सेवा समाप्त कर्मचाऱ्यांचे वेतन स्वतःच्या सहीने नियमबाह्य व बेकायदेशीरपणे विविध शासकीय कार्यालयात दाखल करीत आहेत व राजकीय दबाव आणत शासकीय कार्यालयाची फसवणूक करत आहे व सेवा समाप्ती कर्मचाऱ्यांची फसवणूक करत आर्थिक लाभ विळविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

जनजागृती प्रबोधन मंच या संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. युगंधर लालासो पाटील यांनी ज्ञानेश्वर भानुदास बाबर यांचेवर सांगोला कोर्ट, सांगोला येथे याचिका क्र. Cri.M.A./680/2023 नुसार दावा दाखल केलेला आहे तसेच श्रीमती. शैलजा लालासाहेब पाटील यांनी सांगोला कोर्ट, सांगोला येथे संबंधीता विरुद्ध दावा क्र. १६३/२०२५ नुसार मानहानीचा दावा दाखल केलेला आहे.

**सही/-**
**अध्यक्ष**
**जनजगृती प्रबोधन मंच, टेंभुणीं**
**गट क्र ९४/१ जुना सोलापूर, पुणे रोड**
**चव्हाणवाडी, टेंभुर्णी, ता. माढा. जि. सोलापूर**

## महिला सक्षमीकरणासाठी विशेष योजना राबवा : अंबिका पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**दक्षिण सोलापूर, दि. १५ मे -**

पंचायत समिती सदस्या अंबिका पाटील यांनी केंद्रीय रस्ते व महामार्गमंत्री नितीन गडकरी यांना निवेदन सादर करून महिलांसाठी उद्योग प्रशिक्षण, आर्थिक सहाय्य व बाजारपेठ उपलब्ध करून देण्याबाबत मागण्या मांडल्या.

प्रत्येक जिल्ह्यात महिला उद्योजकता प्रशिक्षण केंद्र सुरू करणे, महिला बचत गट व नवउद्योजक महिलांसाठी सुलभ कर्ज योजना राबवणे, राष्ट्रीय महामार्ग परिसरातील फूड प्लाझा, कॅफे व स्थानिक उत्पादन विक्री केंद्रांमध्ये महिला बचत गटांना प्राधान्य, ग्रामीण भागात महिला उद्योग क्लस्टर उभारणे तसेच महिला उत्पादनांसाठी ऑनलाइन विक्री सुविधा उपलब्ध करून देणे आदी मागण्या केल्या आहेत.

कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या महिलांना रोजगार व उद्योग सुरू करण्यासाठी विशेष मार्गदर्शन केंद्र स्थापन करण्याचीही मागणी केली. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम केल्यास देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल तसेच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर स्वयंरोजगार निर्माण होईल, असे निवेदनात नमूद केले आहे. केंद्रिय मंत्री गडकरी यांनी सकारात्मक विचार करण्याचे आश्वासन दिल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी आमदार सुभाष देशमुख, शहराध्यक्ष रोहिणी तडवळकर, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सुधा अळ्ळीमोरे व दक्षिण सोलापूर तालुक्यातील कार्यकर्ते उपस्थित होते.

## खरेदीपूर्व जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः शहर सोलापूर येथील लोकांना कळविण्यात येते की, मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि. सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी मौजे मजरेवाडी येथील गट नं.१३०/७/४ याचे एकूण क्षेत्र ६९.७०.२६ हे. आर तथा ६९७०.२६ चौ.मी. आकार रु. ४२५१-०० पैसे पैकी पूर्वेकडील क्षेत्र ३९०५.१२ चौ.मी (० हे. ३९ आर) यासी चतुःसिमा :- पुर्वेस - रस्ता, पश्चिमेस - गट नं. १३०/७/४ पैकीची उर्वरीत मिळकत, दक्षिणेस - गट नं. १३०/७/६, उत्तरेस - रस्ता.

सदरची मिळकत लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑप सोसायटी लि. यांचे मालकी व कब्जे वहिवाटीचा असून सदर मिळकत आमचे अशिलांना विकत देण्याचे निश्चित केले आहे व इसारापोटी काही रक्कम देखील स्विकारली आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री आमचे अशिलास दिलेली आहे.

तरी तमांम लोकांना या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, वरील मिळकतीवर कोणाचा हक्क, दावा, लिज, गहाण, दान, बक्षीस, साठेखत, खरेदी-विक्री, वगैरे स्वरुपांचा हस्तांतराचा व्यवहार केलेला असल्यास अगर स्थगिती आदेश असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ८ (आठ) दिवसाचे आत लेखी पुराव्यासह आपल्या हक्क खालील पत्त्यावर सादर करावी अथवा c.sarthak222gmail.com. यावर नोंदवावी. जर मुदतीत कोणाचीही तक्रार न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध व निजोखमी समजून खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख. १५/०५/२०२६

**सही/-**
**श्री. सार्थक एस. चिवरी**
**सौ. अश्विनी एस. चिवरी (पाटील)**
**ॲडव्होकेटस दोघे रा. ३२, गीता नगर, चतुर अपार्टमेंट, गोविंदश्री मंगल कार्यालयाजवळ, जुळे सोलापूर**
**मो. नं.९४२१०६६२२२**
**अशिलातर्फे ॲडव्होकेट**

## लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर

**९४/२९ मंगल प्लाझा, पहिला मजला, जोडभावी पेठ, सोलापूर. फोन नं ०२१७ २७३५५३७**

### अंतिम जाहीर लिलाव

**परिशिष्ठ-२०**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १५६ व महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ चे नियम १०७ यास अनुसरून लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर या पतसंस्थेचे थकबाकीदार श्री हणंमत रामचंद कुलकर्णी, रा. माळकवठे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर यांची खालील नमुद केलेली पतसंस्थेस तारण असलेली स्थावर मालमत्ता त्यांचेकडील थकबाकी वसुलीसाठी विशेष वसूली अधिकारी यांनी दिनांक : ०२/०३/२०२३ रोजीच्या आदेशाने जप्त केलेली आहे. सदर स्थावर मिळकत मा. उपविभागीय अधिकारी दक्षिण सोलापूर यांचे आदेशाने मंडळ अधिकारी निंबर्गी यांनी ताब्यात दिलेली मालमत्ता असून खाली नमुद केल्याप्रमाणे सदर मिळकतीचा जाहीर लिलावाने विक्री करण्यात येणार आहे. तरी इच्छूक खरेदीदारांनी सदर लिलावाच्या वेळी हजर राहून लिलाव विक्रीमध्ये सहभागी व्हावे.

**स्थावर मिळकतीचे वर्णन.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव | थकबाकीदारांचे नाव व पत्ता | स्थावर मिळकतीचा तपशिल गट नंबर |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर | श्री. हणमंत रामचंद्र कुलकर्णी, रा. माळकवठे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर | मौजे. माळकवठे, ता. दक्षिण सोलापूर, जि. सोलापूर येथील गट नं. २१२/१/अ/२, क्षेत्र २.४४ |

| लिलावाची तारीख | लिलावाची वेळ | लिलावाचे ठिकाण | शेरा |
|---|---|---|---|
| ५ | ६ | ७ | ८ |
| वार :- शुक्रवार दिनांक : २९/०५/२०२६ | सकाळी ११.०० वाजता | लोकमंगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर प्रधान कार्यालय | |

**टिप -** १) लिलावाच्या शर्ती व अटी लिलावाच्या वेळी वाचून दाखविण्यात येईल.
२) लिलाव तारखेपूर्वी कर्जदाराने संपुर्ण व्याजासह रक्कम भरल्यास लिलाव रदद करण्यात यईल.
३) सदर मालमत्ता 'जशी आहे जेथे आहे' या तत्वावर लिलाव करण्यात येईल.

**ठिकाण - सोलापूर**
**दिनांक १६/०५/२०२६**

(शिक्का)

**सही/-**
**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
**द्वारा लोकंमगल नागरी सहकारी पतसंस्था मर्या., सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

कि. अर्ज. ५९/२०२५
नि.नं. ८

### बार्शी येथील मे. सि.ज.ज्यु.डि. सो. यांचे कोर्टात

**अमोल रमेश पाठक,**
वय ३२ वर्ष, धंदा - मजूरी,
रा. आगळगाव, ता. बार्शी, — **अर्जदार**
विरुध्द
**कोणी नाही - सा.वाला**

ज्या अर्थी, मयत आनंदीबाई व आत्माराम धोंडदेव पाठक यांचे नावे मौजे आगळगाव, ता. बार्शी, येथील सिटी सर्व्हे नं. १०९ क्षेत्र ७९.४० चौ.मी. व ग्रामपंचायत मिळकत नं. ४६१ क्षेत्र ७८५ चौ.फुट अशा जागा आहेत. मयत आनंदीबाई आत्माराम पाठक व आत्माराम धोंडदेव पाठक यांचे पश्चात यातील अर्जदार यांचे नावाची नोंद सदर मिळकतीचे सिटी सर्व्हे उताऱ्याला व ग्रामपंचायत उताऱ्याला लावणेकामी तसेच इतर शासकीय व निमशासकीय कार्यासाठी यातील अर्जदार हा मयत आनंदीबाई आत्माराम पाठक व मयत आत्माराम धोंडदेव पाठक यांचे पश्चात एकमेव जवळचा व कायदेशीर वारस (Legal heirs) आहे असे जाहीर होऊन त्याप्रमाणे अर्जदार याचे नांवे (heriship Certificate) मिळणेसाठी अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्या अर्थी, सदर अर्जदार याचे व्यतिरीक्त मयत आनंदीबाई आत्माराम पाठक व मयत आत्माराम धोंडदेव पाठक यांचे पश्चात इतर कोणाचा वारसाहक्क हित संबंध असलेस त्यांनी सदर जाहीर प्रसिध्दी करणापासून ३० दिवसांचे आत किंवा नेमली ता. १५/०७/२०२६ रोजी सदरकामी हजर राहून आपले म्हणणे वा हरकत लेखी स्वरूपात पुराव्यानिशी दाखल करावी मुदतीत कोणाची हरकत वा म्हणणे आले नाही. तर कोणाचे काही म्हणणे नाही असे समजून यातील अर्जदारांना अर्जाप्रमाणे वारस दाखला देणेत येईल.

कळावे हे प्रसिध्दीकरण मे. कोर्टाचे सही शिक्क्यानिशी दिले असे. ता.०२/०५/२०२६

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**मा. दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर, बार्शी, ता. बार्शी**

## Classifieds

### Vacancy

Vacancy available for Sales Engineer / Marketing Executive. Swaraj Pneumatics mobile: 8380050483

### पाहिजेत

**जुनी मील कंपाऊंड परिसरात बंगल्यात घरगुती काम करण्यासाठी २५ ते ३५ वयोगटातील महिला पाहिजे. संपर्क: ९४२३५९००३६/ ९४२०८८५६०७**

**दै. सोलापूर तरुण भारत मध्ये प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातींमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसारच प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही मजकुराच्या सत्यतेबाबत दै. सोलापूर तरुण भारत हमी घेऊ शकत नाही, याची वाचकांनी नोंद घ्यावी.**

## Union Education Society's Mahila Mahavidyalaya, Solapur AIDED

(Affiliated to Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University Solapur)

Applications are invited for the following CLOCK HOUUR BASIS (CHB) Posts for the Academic Year 2026-27

| Sr. No. | Course | Subject | Designation | Total No CHB Posts |
|---|---|---|---|---|
| Humanities Faculty | | | | |
| 1 | B.A. | English | Assistant Professor | 4 CHB |
| 2 | B.A. | Urdu | Assistant Professor | 4 CHB |
| 3 | B.A. | Hindi | Assistant Professor | 3 CHB |
| 4 | B.A. | Persian | Assistant Professor | 1 CHB |
| 5 | B.A. | Sociology | Assistant Professor | 1 CHB |

1) The above posts are open to all however candidates from any category can apply for the post.
2) All the above posts are purely on Temporary Clock Hour Basis for Academic Year 2026-2027 & subject to workload approval of Jt. Director of Education, H.E., Solapur Region, Solapur for Senior College section.
3) Educational Qualification and other requirements are as prescribed by the UGC Notification did. 18th July 2018. Govt of Maharashtra Resulation No. Mise-2018/C.R.56/18UNI-Idts. 8 March 2019 and University Circular Nu PAHSUS/Estt/7 pay/2019/2285/dtd. 25 March 2019.
4) Remuneration the above posts will be as per Govt. Resulation No. संकिर्ण-२०१८/(१८५/१८)मशि-३, dated 14 November 2018 und University Circular No. सोविसो/शि.मा./ परिपत्रक /२०१८-१९/१०९४९ / dtd.24 December 2018, nd Govt. Resulation No. संकिर्ण-२०२१/प्र.क्र.१८१/२१/विशि-१ dated 17 October 2022.
5) Applications with full details should reach to the Principal Union Education Society's Mahila Mahavidyalaya, Solapur within 8 days from the date of publication of this advertisement. Incomplete applications will not be entertained.
6) This is University approved advertisement.

The interested candidates have to appear for interview on 23/05/2026 at 10.30 am in the Office of Principal, U.E.S. Mahila Mahavidyalaya, Solapur along with original documents & attested photo copies. No TA/DA will be given.

Solapur. 16/05/2026

(Stamp)

**Sd/-**
**Principal**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.की.अर्ज.नं ३६/२०२६
नि.७

### बार्शी येथील मे. अतिरिक्त जिल्हा व सत्र न्यायाधीश सो. यांचे कोर्टात

**१) प्रियांका आनंद कोकीळ**
वय - ४१ वर्षे, धंदा - घरकाम
रा. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलपूर
ह.मु. श्रेयस किशोर झरकर
मुक्काम पोस्ट सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
**२) कु. स्वरा आनंद कोकीळ**
वय - १६ (अज्ञान), धंदा - शिक्षण
रा. कुर्डूवाडी, ता. माढा, जि. सोलपूर
ह.मु. श्रेयस किशोर झरकर
मुक्काम पोस्ट सोनई, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर
अर्जदार नं १ हि अर्जदार नं २ ची अ.पा.क म्हणून — **अर्जदार**
विरुध्द
**महाराष्ट्र शासन** - **सामनेवाला**

**अर्ज :- हिंदू मायनॉरिटी ॲन्ड गार्डियनशिप ॲक्ट चे कलम ८ प्रमाणे**

ज्याअर्थी यातील अर्जदार नं १ व २ हे आई व मुलगी आहेत अर्जदार नं १ चे पती नामे आनंद कोकीळ हे दि.२४/०४/२०२१ रोजी कोरोनाने मयत झाले आहेत. त्यामुळे अर्जदार नं १ हिने डी. सोलापूर सब डी. व ता. माढा पैकी मौजे कुर्डूवाडी म्युनिसिपल हद्दीतील गट नं. २३० याचा मिळकत नं ९७१ याचा प्लॉट नं २ पैकी बांधकाम केलेली जागा याचे क्षेत्रफळ १०८.०७ चौ.मी. यासी चतुः सिमा, पुर्वेस - गट नं २२९, दक्षिणेस - प्लॉट नं २ पैकी, पश्चिमेस - अंतर्गत रस्ता, उत्तरेस - गट नं २३० पैकी भाग यांसी वागणूक मोरी व पन्हाळी पश्चिमेस जाते यांवर विटामध्ये बांधकाम केलेले असून एकूण खोल्यासह ६ नळाचे पाणीसह, विद्युत मिटर चालू आहे. येणेप्रमाणे चतुःसिमापुर्वक मिळकत, त्यामधील वहीवाटीचे हक्कासह काही एक राखून न ठेवता अर्जदार नं १ व २ यांचा असलेला अर्धा हिस्सासह मिळकत (अज्ञानाची) विक्री करण्यासाठी मे. कोर्टाची परवानगी मिळणेसाठी अर्जदार यांनी सदरचा अर्ज मे. जिल्हा कोर्टात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी या जाहीर प्रसिध्दीकरणाने कळवण्यात येते की, अर्जदारांचे वर नमूद मागणी संबंधाने, वा अन्य कोणाचे काही कायदेशीर हक्क हितसंबंध, आक्षेप असलेस वा कुणाचे हक्कात काही दस्त असलेस संबंधितानी हि नोटीस प्रसिद्ध झाले पासून ३० दिवसांचे आत वा पुढील नेमलेले तारखेस १२/०६/२०२६ रोजी मे. कोर्टात स्वतः व वकीलामार्फत हजर होऊन आपले म्हणणे, हरकती, तक्रारी लेखी स्वरुपात सादर कराव्यात. मुदतीत कोणाचेही तक्रार, हरकती न आल्यास प्रकरणी मे. कोर्टाचे योग्य ते आदेश होतील.

**सही/-** **कनिष्ठ लिपिक** **जिल्हा न्यायालय, बार्शी**

(कोर्टाचा शिक्का)

**सही/-** **सहा. अधीक्षक** **जिल्हा न्यायालय, बार्शी**

## IDFC FIRST Bank Limited

**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited)**
**CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai-600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा हित अंमलबजावणी कायदा, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली आहेत. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित करण्यात आली आहेत.

संबंधित कर्ज करारातील अटी व शर्तीचे पालन करण्यास ते अपयशी ठरल्यामुळे आणि कर्जाचे व्यवहार अनियमित झाल्यामुळे, त्यांची कर्ज खाती आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार 'एनपीए' म्हणून वर्गीकृत करण्यात आली आहेत.**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला** त्यांच्याकडून देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये दिलेल्या माहितीनुसार आणि संबंधित नोटीसमध्ये अधिक सविस्तरपणे वर्णन केल्याप्रमाणे आहे. या रकमेवर पुढील व्याज देखील लागू होईल आणि ते संबंधित तारखांपासून करारातील दराने आकारले जाईल..

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 163555279 | मालमत्तेवर कर्ज | 1. रेखा विजय जगदाळे 2. विजय काशिनाथ जगदाळे | 14/03/2026 | INR 8,28,510.16/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिळकत क्रमांक ५७९ चा तो सर्व जमिनीचा तुकडा आणि भाग, ज्याचे एकूण मोजमाप क्षेत्रफळ २७५० चौ.फूट आहे. ही मालमत्ता गाव : आनंदनगर, आनंदनगर ग्रामपंचायतीच्या हद्दीत, तालुका : माळशिरस, जिल्हा : सोलापूर, महाराष्ट्र-४१३१०१ येथे स्थित आहे. चतु:सीमा :- पूर्व - दामोदर भांगे (घर), पश्चिम - भागवत भोसले (घर), उत्तर - रस्ता, दक्षिण - चांगदेव भांगे (घर)

तुम्हाला याद्वारे वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार, संबंधित तारखांपासून करारातील व्याजदर आणि इतर खर्च, शुल्कासह सर्व रक्कम **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** (पूर्वीची **कॅपिटल फर्स्ट लिमिटेड,** जी **आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झाली असून सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाते) कडे या प्रसिद्धीच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत जमा करण्याचे आवाहन करण्यात येत आहे. रक्कम भरण्यात अयशस्वी ठरल्यास, **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडची** येणेबाकी वसूल करण्यासाठी, स्वाक्षरीकर्त्याला सरफेसी कायद्याच्या कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, वर नमूद केलेल्या गहाण मालमत्तेवर कायदेशीर कार्यवाही सुरू करण्यास भाग पडेल. तसेच, सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये तुम्हाला संबंधित मालमत्तेची विक्री, भाडेपट्टा किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मनाई करण्यात आली आहे.

**स्वाक्षरी/-**
**प्राधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आहे आणि आता आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

**दिनांक : 16/05/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**




## महत्त्वाचे

### न्यूझीलंडच्या रचिनचा आयपीएलला 'रामराम'



**कोलकाता :** न्यूझीलंडचा अष्टपैलू खेळाडू रचिन रवींद्र याने न्यूझीलंडच्या आगामी इंग्लंड कसोटी दौऱ्याच्या तयारीला सुरुवात करण्यासाठी आयपीएल मधून माघार घेतली आहे, अशी माहिती कोलकाता नाईट रायडर्सने (केकेआर) दिली. रचिन रवींद्र हा न्यूझीलंडच्या आगामी इंग्लंड कसोटी दौऱ्यासाठी तयारीला सुरुवात करण्यासाठी आपल्या मायदेशी परतला आहे, असे केकेआरने शुक्रवारी स्पष्ट केले. केकेआरचा सामना शनिवारी येथील ईडन गार्डन्सवर गुजरात टायटन्सशी होणार आहे. या घरच्या सामन्याच्या पूर्वसंध्येला संघाच्या स्थितीबाबत माहिती केकेआरने दिली. आयपीएल २०२६ च्या लिलावात केकेआरने रचिनला त्याच्या २ कोटी रुपयांच्या मूळ किमतीवर खरेदी केले होते. मात्र, या हंगामात आपल्या नवीन फ्रँन्चायझीसाठी एकही सामना न खेळताच तो मायदेशी परतला आहे; कारण केकेआरने त्यांचा प्रमुख अष्टपैलू म्हणून कॅमेरॉन ग्रीन या मोठ्या नावाला पसंती दिली आहे.

# कार्तिक शर्माचे अर्धशतक

## चेन्नई ५ बाद १८७ ● पदार्पणात आकाश सिंगचे ३ बळी

◆ **लखनौ, १५ मे**

१९ व्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात शुक्रवारी येथे सुरू असलेल्या लखनौ सुपर जायंट्सविरुद्धच्या आयपीएल सामन्यात आकाश शर्मानि (८७) झळकावलेल्या दमदार अर्धशतकाच्या बळावर चेन्नई सुपर किंग्सने २० षटकांत ५ बाद १८७ धावा उभारल्या आणि लखनौ संघापुढे विजयासाठी १८८ धावांचे लक्ष्य ठेवले. लखनौच्या आकाश सिंगने पदार्पणातच २६ धावांत ३ बळी टिपण्याची किमया केली.

लखनौ संघाचा कर्णधार ऋषभ पंतने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. चेन्नई सुपर किंग्सकडून संजू सॅमसन व कर्णधार ऋतुराज गायकवाडने सावधपणे फलंदाजी करीत डावाची सुरुवात केली, मात्र ही जोडी स्थिरावण्याआधीच पदार्पण करणाऱ्या डावखुरा वेगवान गोलंदाज आकाश सिंगने सीएसकेला पहिला हादरा दिला. आकाशला पुलचा फटका मारण्याच्या नादात ऋतुराजने निकोलस पूरनकडे झेल सोपविला.



आकाश सिंग

ऋतुराजने ९ चेंडूंत १३ धावा केल्या. त्यानंतरही आकाश सिंगने नियमित अंतराने सीएसकेला आणखी दोन धक्के दिले. आकाशने सॅमसनलाही (२०) मुकुल चौधरीकडे, तर उर्विल पटेलला (६) मिचेल मार्शकडे झेल सोपविण्यास भाग पाडले. त्यामुळे सीएसकेची ७.२ षटकांत ३ बाद ५२ धावा अशी स्थिती झाली, परंतु त्यानंतर कार्तिक शर्मा व डेवाल्ड ब्रेविसने सुरेख ताळमेळ साधत संघाचा डाव सावरला. कार्तिकने शमीच्या एका चेंडूवर जोरदार षट्कार ठोकला, त्याने



कार्तिक शर्मा
धावा ७१
चेंडू ४२
चौकार ६
षट्कार ५

अवघड खेळपट्टीवर ३५ चेंडूंमध्ये आपले अर्धशतक पूर्ण केले. या दोघांनी चौथ्या गड्यासाठी ७० धावांची भागीदारी केली असता शर्मीने ब्रेविसला बाऊन्सर टाकून बाद केले, त्यामुळे १५ व्या षटकांत सीएसकेची धावसंख्या ४ गडी बाद १२२ झाली.

पुढे कार्तिकने शिवम दुबेच्या साथीने संघाची धावसंख्या वाढविण्याचा प्रयत्न केला, मात्र अशातच तो डावखुरा फिरकीपटू शाहबाज अहमदच्या फिरकीला बळी पडला. कार्तिक शर्मानि ४२ चेंडूंत ६ चौकार व ५ षट्कारांसह ७१ धावांची खेळी केली. नंतर शिवम दुबे व प्रशांत वीरने नाबादखेळी करत चेन्नई सुपर किंग्सला २० षटकांत ५ बाद १८७ धावा रचून दिल्या. लखनौकडून आकाश सिंगने ३ बळी, तर मोहम्मद शमी व शाहबाज अहमदने प्रत्येकी एक बळी टिपण्यात यश मिळविले. (वृत्तसंस्था)

# डिजिटल माध्यमात आयपीएलची प्रेक्षकसंख्या वाढली

## टीव्हीवर ५० कोटींचा टप्पा गाठण्याच्या मार्गावर

◆ **मुंबई, १५ मे**

सध्या सुरू असलेल्या इंडियन प्रीमियर लीगचा डिजिटल माध्यमांमधील पाहण्याचा कालावधी सात टक्क्यांनी वाढला आहे, तर टीव्हीवरील प्रेक्षकसंख्या ५० कोटींचा टप्पा गाठण्याच्या मार्गावर आहे, अशी माहिती स्पर्धेच्या प्रसारकांनी दिली. आयपीएलची एकूण डिजिटल व्याप्ती १५ टक्क्यांनी वाढली आहे, असे जिओ स्टारने प्रसिद्धीपत्रकात नमूद केले आहे.

ही आकडेवारी लिनियर टीव्हीवरील ५१ सामन्यांची व डिजिटल प्लॅटफॉर्मवरील ५७ सामन्यांची आहे. 'सी टीव्हीच्या (कनेक्टेड टीव्ही) व्याप्तीमध्ये २५ टक्क्यांची वाढ झाली असून, पाहण्याचा कालावधी २० टक्क्यांनी वाढला आहे. प्रादेशिक भाषांमधील पाहण्याच्या कालावधीत तब्बल ४२ टक्क्यांची लक्षणीय वाढ दिसून आली आहे, असा दावा कंपनीने केला आहे.

स्पर्धेतील तीव्र चुरशीमुळे प्रेक्षकव्याप्तीमध्ये आठवड्यागणिक




वाढ होत आहे; यावरून ही स्पर्धा विविध माध्यमांवरील चाहत्यांच्या किती मनाला भिडत आहे, हे दिसून येते,असे जिओ स्टारचे विक्री प्रमुख अनुप गोविंदन् यांनी सांगितले.

गत हंगामाच्या तुलनेत १२५ नवीन जाहिरातदारांमुळे ही वाढ साध्य झाली आहे, असा दावाही प्रसारकांनी केला आहे.

डिजिटल माध्यमावर २२ प्रायोजकांनी जिओ स्टारसोबत भागीदारी केली आहे, तर १६ प्रायोजक लिनियर टीव्हीवर सहभागी झाले आहेत. यामध्ये भारतातील जुन्या व प्रतिष्ठित ब्रॅण्ड्सचा, तसेच आधुनिक काळातील तंत्रज्ञान-आधारित प्लॅटफॉर्म्सचा समावेश आहे. हे ब्रॅण्ड्ससाठी टाटा आयपीएलची राष्ट्रीय स्तरावरील व्याप्ती व वाढती प्रासंगिकता अधोरेखित करतात. (वृत्तसंस्था)

### पाकिस्तानचे डब्ल्यूटीसी गुण कापले

**मीरपूर :** बांगलादेशविरुद्धच्या पहिल्या कसोटीतील पराभवादरम्यान, संथ गतीने गोलंदाजी केल्याबद्दल पाकिस्तानला त्यांच्या सामना शुल्काच्या ४० टक्के दंड ठोठावण्यात आला आहे. तसेच, सध्या सुरू असलेल्या आयसीसी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) २०२५-२७ च्या चक्रात त्यांचे आठ गुणही कापण्यात आले आहेत. वेळेची भरपाई विचारात घेतल्यानंतर, पाहुण्या संघाची गोलंदाजी निर्धारित वेळेत आठ षटके कमी पडल्याचे निष्पन्न झाले, असे आयसीसीने शुक्रवारी जारी केलेल्या एका निवेदनात म्हटले आहे. या दंडात्मक कारवाईमुळे, डब्ल्यूटीसी गुणतालिकेत पाकिस्तानचे गुण आता चारवर आले आहेत. यामुळे ते आठव्या स्थानावर पोहोचले असून, वेस्ट इंडीजच्या अगदी वरच्या क्रमांकावर आहेत. बांगलादेशने कसोटीच्या शेवटच्या दिवशी केलेल्या अप्रतिम गोलंदाजीच्या जोरावर पहिला कसोटी सामना जिंकला. नाहिद राणाने घेतलेल्या पाच बळींच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे बांगलादेशने हा सामना १०४ धावांनी आपल्या खिशात घातला.

### बिहार सरकारकडून ईशानला १ कोटी रुपयांचे बक्षीस



**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री सम्राट चौधरी यांनी शुक्रवारी आपल्या निवासस्थानी भारतीय क्रिकेटपटू ईशान किशनचा अधिकृतपणे सत्कार केला आणि राज्य सरकारतर्फे त्याला १ कोटी रुपयांचे बक्षीस देऊन सन्मानित केले. टी-२० विश्वचषक २०२६ जिंकून देण्यात टीम इंडियाला मदत करण्यात बजावलेली महत्त्वाची भूमिका आणि ईशानच्या उत्कृष्ट कामगिरीची दखल घेऊन हे रोख बक्षीस प्रदान करण्यात आले. या प्रसंगी किशनचे कुटुंबही उपस्थित होते. त्यांच्यासोबतच राज्यातील काही क्रिकेटपटूही उपस्थित होते; यामध्ये सध्या सुरू असलेल्या आयपीएल २०२६ मध्ये आपल्या गोलंदाजीने छाप पाडणाऱ्या वेगवान गोलंदाज साकिब हुसेनचाही समावेश होता. सम्राट चौधरी यांनी विश्वचषकादरम्यान किशनने दिलेल्या योगदानाचे कौतुक केले.

### चौथ्या पंचांविरुद्ध अपशब्द वापरल्याबद्दल पोलार्डला शिक्षा

**धर्मशाला :** गुरुवारी येथे पंजाब किंग्स आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील आयपीएल सामन्यादरम्यान चौथ्या पंचांशी अपशब्द वापरल्याबद्दल मुंबई इंडियन्सचे फलंदाजी प्रशिक्षक कायरॉन पोलार्ड यांच्यावर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने कारवाई केली आहे. आपल्या या वर्तनाबद्दल पोलार्डला त्याच्या सामन्याच्या मानधनाच्या १५ टक्के रक्कम दंड म्हणून ठोठावण्यात आली असून, त्याच्या खात्यावर एक डिमेरिट पॉईंट जमा करण्यात आला आहे. ही घटना दुसऱ्या डावातील १९ व्या षटकात घडली, जेव्हा विल जॅक्स आणि तिलक वर्मा मैदानात असताना, मुंबई इंडियन्स धावसं'येचा पाठलाग करत होते. एखाद्या गोष्टीवरून पोलार्डचा संयम सुटल्याचे दिसून आले.



### दीपक सिंगला यांची क्रीडा आयुक्तपदी नियुक्ती

**मुंबई, दि. १५ मे-**

राज्य शासनाने प्रशासकीय पातळीवर मोठे फेरबदल केले असून, भारतीय प्रशासकीय सेवेतील अधिकारी दीपक सिंगला यांची नियुक्ती आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, पुणे या पदावर केली आहे.

सामान्य प्रशासन विभागाने १४ मे २०२६ रोजी यासंदर्भातील अधिकृत आदेश निर्गमित केले आहेत. यापूर्वी २ एप्रिल २०२६ रोजी दीपक २सिंगला यांची बदली करण्यात आली होती, मात्र तिथे रुजू न होता ते वैद्यकीय रजेवर होते. आता शासनाने त्यांची रवानगी पुणे येथे केली असून, त्यांनी शितल तेली-उगले यांच्याकडून या पदाचा कार्यभार त्वरित स्वीकारण्याचे निर्देश दिले आहेत. विशेष म्हणजे, ही नियुक्ती करताना संबंधित पद निवड श्रेणीत अवनत करण्यात आले आहे. या आदेशानुसार, दीपक सिंगला यांना नवीन पदावर रुजू झाल्याचा अहवाल सुप्रिमो प्रणालीवर अपडेट करणे अनिवार्य आहे. तसेच, ई-ऑफिस आणि ई-एचआरएमएस प्रणालीचा वापर वाढवण्याकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचनाही सहसचिव सुभाष उमराणीकर यांनी पत्राद्वारे दिल्या आहेत. या नियुक्तीची प्रत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री कार्यालयास माहितीसाठी सादर करण्यात आली आहे. शुक्रवारी पुण्यातील शिवछत्रपती क्रीडा संकुलातील मुख्यालयात त्यांचे स्वागत सहसंचालक सुधीर मोरे यांनी केले. यावेळी उपसंचालक संजय सबनीस व उदय जोशी उपस्थित होते.

### भारताच्या ऑलिम्पिक दावेदारीवर चर्चा

**नवी दिल्ली, १५ मे -**

भारताच्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेच्या (सीडब्ल्यूजी) तयारीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती.

परंतु या बैठकीत देशाच्या २०२६ च्या ऑलिम्पिक दावेदारीला पुढे कसे न्यावे, यावरही चर्चा झाली. केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडविया यांनी येथे घेतलेल्या या आढावा सत्रात गुजरातचे उपमुख्यमंत्री हर्ष संघवी हे ऑनलाइन माध्यमातून सहभागी झाले होते.

# गुजरातचे लक्ष्य अव्वल स्थान मिळविण्याचे

◆ **कोलकाता, १५ मे**

जवळपास महिनाभराच्या दौऱ्यानंतर मायदेशी परतलेला आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी धडपडणारा कोलकाता नाईट रायडर्स संघ, आयपीएलमध्ये आपले अस्तित्व टिकवण्यासाठी शनिवारी येथे अव्वल दोनमध्ये स्थान मिळविण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या गुजरात टायटन्स संघाशी सामना करेल.

अनुभवी अजिंक्य रहाणेच्या नेतृत्वाखाली केकेआरसाठी हा आणखी एक अस्थिर व निराशाजनक हंगाम ठरला आहे. गत वर्षी त्याच्या नेतृत्वाखाली संघ निराशाजनक आठव्या स्थानावर राहिल्याने, कर्णधार म्हणून त्याच्या नियुक्तीवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते.

केकेआरला आपला पहिला विजय नोंदविण्यासाठी हंगामातील सातव्या सामन्यापर्यंत वाट पाहावी लागली आणि संपूर्ण हंगामात हा संघ स्थिर झालेला दिसला नाही. वादग्रस्त संघ निवड आणि फलंदाजीच्या क्रमामुळे त्यांच्या लयीला धक्का बसला आहे.



अजिंक्य रहाणे



शुभमन गिल

१९ एप्रिल रोजी त्यांच्या शेवटच्या घरच्या सामन्यात राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या विजयाने सुरू झालेले त्यांचे अल्पकालीन पुनरुज्जीवन संपुष्टात आले. विराट कोहलीच्या फलंदाजीच्या उत्कृष्ट प्रदर्शनाच्या बळावर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने केकेआरवरमात केली होती. केकेआरचे आता तीन सामने शिल्लक आहेत व जर त्यांनी ते सर्व जिंकले, तर ते जास्तीत जास्त १५ गुणांपर्यंत पोहोचू शकतात, परंतु तरीही प्लेऑफमधील स्थानाची हमी मिळणार नाही, कारण त्यानंतर पात्रता इतर सामन्यांच्या निकालांवर अवलंबून असेल.

मात्र, आणखी एक पराभव झाल्यास त्यांची मोहीम जवळजवळ संपुष्टात येईल आणि फ्रँन्चायझीमधील रहाणेच्या भविष्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण होऊ शकते. त्यांची चार सामन्यांची विजयी मालिका मुख्यत्वे फिरकी गोलंदाजांची जोडी सुनील नरेन आणि वरुण चक्रवर्ती यांच्या फॉर्ममध्ये परतण्यावर, तसेच उपकर्णधार रिंकू सिंगच्या सातत्यपूर्ण योगदानावर आधारित होती. परंतु डाव्या पायाला फ्रॅक्चर झाल्यामुळे आरसीबीविरुद्ध चक्रवर्तीची अनुपस्थिती त्यांना महागात पडली.

याउलट, शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्स हा संघ या हंगामात सर्वात परिपूर्ण संघांपैकी एक म्हणून दिसून आला आहे. त्यांनी सलग पाच सामने जिंकत, गुणतालिकेत अव्वल स्थानी असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूच्या गुणांची बरोबरी केली आहे.

गुजरात टायटन्सच्या या जबरदस्त कामगिरीचे मुख्य श्रेय त्यांच्या गोलंदाजी आक्रमणाला जाते. त्यांनी अगदी योग्य वेळी आपली चमक दाखवली आहे.

या विजयाच्या मालिकेत कॅगिसो रबाडाने दोनदा सामनावीर पुरस्कार पटकावला आहे, जेसन होल्डरनेही दोन पुरस्कार मिळविले आहेत, तर रशीद खानने आपली जुनी जादू पुन्हा एकदा गवसल्याचे दिसून येत आहे.

त्यांची गोलंदाजी गिल व साई सुदर्शन यांच्या नेतृत्वाखालील भक्कम फलंदाजीच्या आघाडीच्या फळीशी अगदी सुरेखपणे जुळून आली आहे.

सुदर्शन हा पुन्हा एकदा या हंगामातील सर्वाधिक धावा करणाऱ्या फलंदाजांपैकी एक ठरला आहे. गत वर्षी ७५९ धावा करत ऑरेंज कॅप जिंकल्यानंतर या डावखुऱ्या सुदर्शनने या हंगामात आतापर्यंत ५०१ धावा जमा केल्या आहेत व तो सध्याच्या आघाडीच्या फलंदाज हेनरिक क्लासेनपेक्षा केवळ सात धावांनी मागे आहे. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

कोलकाता नाईट रायडर्स
वि. गुजरात टायटन्स
**स्थळ :** ईडन गार्डन्स स्टेडियम, कोलकाता
**वेळ :** सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रसारण :** स्टार स्पोर्ट्सवर

# प्रतिक, बालाजी, इम्रान, मुंतजीर उपांत्य फेरीत

## ३२ वी मुंबई महापौर केसरी अखिल भारतीय कुस्ती स्पर्धा

**मुंबई, दि.१५ मे-**

आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू प्रतिक देशमुख, बालाजी मेटकरी, इम्रान मुजावर, मुंतजीर सरनोबत यांनी आपल्या उपांत्यपूर्व लढती सहज जिंकत बृहन्मुंबई महानगरपालिका आणि मुंबई शहर तालीम संघटना आयोजित ३२ व्या अखिल भारतीय मुंबई महापौर केसरी कुस्ती स्पर्धेत आगेकूच कायम राखली. उपांत्य फेरीत प्रतीकचा सामना इम्रानशी होईल.तर बालाजी समोर मुंतजोरचे आव्हान असेल.

वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या क्रीडांगणात रंगलेल्या या स्पर्धेत चार आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू सहभागी झाले होते. पण कझाकिस्तान मध्ये २३ वर्षांखालील आशियाई कुस्ती स्पर्धेत रौप्य पदक मिळवणाऱ्या प्रतिक देशमुखचा अपवाद वगळता ओमकार काटकर, सनी फुलमाळी, दिनेश काकडे या आंतरराष्ट्रीय



कुस्तीपटूंना प्राथमिक लढतीमध्ये पराभव पत्करावा लागला. विजेतपदाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकताना प्रतिकने ठाण्याच्या विपुल परबला तांत्रिक चितपटीने १०-० असा मोठा विजय मिळवला.

अन्य लढतीत सांगलीच्या इम्राननेे सोलापूरच्या वैभव मानेला चितपट करत स्पर्धेतील आगेकूच कायम राखली. मुंताजोरने चितपट करत सोलापूरच्या सचिन काळेचे आव्हान संपुष्टात आणले. बालाजी मेटकरीने ५-३ अशा गुणांनी विनायक बजबळ विजय मिळवला.

कुमार केसरी गटाच्या चुरशीच्या लढतीत विवेक पाटीलने हर्षवर्धन जाधवचा ५-४ असा एक गुणाने विजय मिळवला. ज्योतिधराज मुगदुमने सरस गुणांवर समर्थ बाऊलकरवर सहज विजय मिळवला. विराज कदमने त्रुतीराजा मुगदुमला ८-१ अशा गुंणफरकाने हरवले. तर उत्कंठापूर्ण लढतीत ठाण्याच्या जय भोईरने मेघराज मानेवर ७-४ असा विजय मिळवला.

सुरुवातीला आमदार कालिदास कोळंबकर यांच्या हस्ते स्पर्धेचा शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी मुंबई शहर तालीम संघाचे अध्यक्ष संजय शेटे, नगरसेवक अमेय घोले, सचिव प्रकाश तानवडे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.

स्पर्धेतील अन्य निकाल : ५७ ते ६२ किलो वजनी गट -जय पाटील विजयी विरुद्ध धनंजय भंडारी. विवेक भंडारी पराभूत विरुद्ध लकी खरात, जयदीप बडरे विजयी विरुद्ध अक्षय भोईर, विघ्नेश्वर मेटकर विजयी विरुद्ध प्रमोद पाटील. ७२ किलो वजनी गट - गौरव यादव विजयी विरुद्ध कुणाल पाटील, सचिन शिंदे विजयी विरुद्ध यश ढाकणे, ओम काळे विजयी विरुद्ध भावेश चौधरी. संग्राम डवरी विजयी विरुद्ध प्रताप माने.

# मुंबई, कोल्हापूर, लातूर उपांत्य फेरीत

## छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्य व्हॉलीबॉल स्पर्धा

**तभा वृत्तसेवा,**
**बदलापूर, दि. १५ मे-**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, कुळगाव-बदलापूर नगरपरिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेत सलग २ लढती जिंकून यजमान मुंबईसह कोल्हापर व लातूर विभागाने उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

बदलापूर जिमखाना मैदानावर विघुत प्रकाशझोतात रंगलेल्या राज्य व्हॉलीबॉल स्पर्धेचा दुसरा दिवस कोल्हापूर गाजविला. १८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूर संघाने पहिला सेट गमावून २६/२८,२५/२१,१५/१२ गुणांनी मुंबईला हरवून मैदान गाजवले. या गटातील दुसऱ्या साखळी लढतीत लातूरने पुण्याची विजयी वाटचाल रोखत उपांत्य फेरीतील प्रवेशावर शिक्कामोर्तब केले. २१ वर्षांखालील मुलीच्या गटात मुंबईने पुणे संघावर २५- १९,२५- १९ गुणांनी मात करीत उपांत्य



फेरीत मजल मारली आहे. याच गटात नागपूरने संभाजीनगरला -२५- ५,२५- ६ एकतर्फी पराभूत करीत स्पर्धेत आपले आव्हान कायम राखले आहे.

१८ वर्षांखालील मुलांच्या गटात कोल्हापूर विरूध्द मुंबई लढत लक्षवेधी ठरली. पहिल्या मिनिटापासून रंगलेल्या या सामन्यात पहिला सेटवर मुंबईचे वर्चस्व गाजवले. मेहूल ताजणे व यश शेट्टीने आक्रमक खेळी करीत पहिला सेट मुंबईच्या नावावर जमा केला. दुसऱ्या सेटमध्ये कोल्हापूरच्या मुलांनी अष्टपैलू खेळाचे प्रदर्शन घडवित सामन्याचे पारडे फिरवले. वैभव ढगेचे जोरदार स्मॅशेस् व निखिल वाघच्या सुरेख पासवर सलग दोन सेट जिंकून कोल्हापूरने सामना जिंकत आपला उपांत्य फेरीतील प्रवेशही निश्चित केला.

आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय खेळाडूंचा भरणा असणाऱ्या लातूर संघाने १८ वर्षांखालील मुलांच्या गटात चमकदार खेळाचे प्रदर्शन घडवले. पुणे संघाला २५- १९,२५- २१ गुणांनी पराभूत करीत विजेतेपदाकडे वाटचाल कायम ठेवली आहे. लातूरकडून आंतरराष्ट्रीय खेळाडू श्रीयश खांडेकर, सुवेज शेख, फैजान शेख यांनी तुफानी खेळ करीत उपांत्य फेरीकडे कूच केली. या पराभवामुळे पुण्याची विजयी वाटचाल थांबली आहे. उपांत्य फेरीसाठी शेवटच्या अमरावती विरूध्दचा सामना जिंकणे गरजेचे आहे. २१ वर्षांखालील मुलीच्या गटात मुंबईने सलग दुसरा विजय संपादन केला. शिवप्रिया पनीकर, दिव्या महेता व वेदिका सामगिर या खेळाडुंच्या जोरावर मुंबईने पुण्याला शेवटपर्यंत झुंज देत मैदान मारले. याच गटातील मुलांचमध्येही मुंबई संघ सरस ठरला आहे. पुणे विभागाला १७- २५,२५- २२,१५- ८ गुणांनी पराभूत करीत मुंबईने पहिला सेट गमवूनही विजयश्री खेचून आणली.

### लातूरच्या मुली ढसाढसा रडल्या

गतविजेत्या लातूर संघाला १८ वर्षांखालील मुलांच्या गटात तिसऱ्या सेटमध्ये पराभवाचा धक्का बसला. सामना संपल्यानंता सारा संघ ढसाढसा रडताना दिसत होता. कोल्हापूर विरूध्द लातूरने चिवट झुंज दिली. २५-२०, २१-२५, १६-१४ गुणांनी लातूरचा पराभव झाला. आंतरराष्ट्रीय खेळाडू गायत्री नांदे, श्रुति राऊत यांचे प्रयास शेवटच्या क्षणी अपुरे ठरल्याने लातूरचा संघ भावनाविवश झाल्याचे चित्र पहाण्यास मिळाले.

## महत्वाचे...



### राहुल साकोरे-बोर्डीकर यांचा अन्नछत्र मंडळातर्फे सत्कार

**अक्कलकोट, दि. १५ मे -**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून आधुनिक पायाभूत सुविधांनी पर्यटनाला एक नवी दिशा दिली आहे. नव्याने होणारे महाप्रसादालय अक्कलकोटच्या विकासात भर टाकणारे असल्याचे मनोगत पुणे गृहनिर्माण मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल साकोरे-बोर्डीकर यांनी व्यक्त केले.ते श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ येथे आले असता न्यासाचे मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते श्रींची प्रतिमा, कृपावस्त्र, श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी म्हाडा सोलापूर व पुण्याचे हरिदास देशमुख, सुमित उबाळे आदी उपस्थित होते. याप्रसंगी मनोज निकम, प्रवीण देशमुख, सतीश महिंद्रकर, दत्ता माने, लक्ष्मण बिराजदार, श्रीनिवास गवंडी, राजू पवार, रमेश हेगडे, तानाजी पाटील, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, अनिल बिराजदार, मल्लिकार्जुन गवळी, महांतेश स्वामी, विशाल घाटगे, धनंजय निंबाळकर, समर्थ चव्हाण, विठ्ठल रेड्डी आदी उपस्थित होते.



### छत्रपती संभाजी महाराजांचे विचार आचरणात आणा: आयपीएस राहुल आत्राम

**टेंभुर्णी, दि. १५ मे-**

''छत्रपती संभाजी महाराज यांचे विचार व आचार समाजासाठी प्रेरणादायी आहेत. सर्व शिवभक्तांनी तसेच समाजातील तरुणांनी केवळ जयंती उत्सव साजरा करण्यापुरते मर्यादित न राहता त्यांच्या विचारांचे आचरण करून समाजोपयोगी कार्यात सहभागी व्हावे. रक्तदानासारख्या उपक्रमांद्वारे मानवतेची सेवा करणे हीच खरी थोर पुरुषांना आदरांजली आहे. आज युवकांनी मोठ्या संख्येने रक्तदान करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे, त्याचे अनुकरण इतरांनी करावे.'' असे प्रतिपादन सहायक पोलीस अधीक्षक राहुल आत्राम यांनी केले.धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या ३६९व्या जयंतीनिमित्त टेंभुर्णी नगरीत उत्सव मोठ्या उत्साहात, जल्लोषात व भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. यानिमित्त संभाजी महाराज स्मारक समितीच्या वतीने समाजोपयोगी उपक्रम रक्तदान शिबिराच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरज भैय्या देशमुख होते.या शिबिरास टेंभुर्णी शहरासह पंचक्रोशीतील युवक-तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत तब्बल १०१ रक्तदात्यांनी रक्तदान केले.रक्तदान शिबिरासाठी वैद्यकीय पथकाने मोलाचे सहकार्य केले.

### घरात झोपल्या ठिकाणी मनपा कर्मचाऱ्याचा मृत्यू

**सोलापूर, दि.१५ मे-**

घरामध्ये झोपल्या ठिकाणी महापालिकेच्या स्वच्छता विभागातील कर्मचाऱ्याचा मृत्यू झाला. सुनील अभिमन्यू भालशंकर (वय-५२, रा. माने वस्ती, सम्राट चौक, न्यु बुधवार पेठ, सोलापूर) असे मयत व्यक्तीचे नाव आहे. सुनील भालशंकर हे शुक्रवारी दुपारी ४ वाजता घरामध्ये झोपले होते. ४.३० वाजता त्यांना झोपेतून उठवण्याचा प्रयत्न केला असता ते उठले नाहीत. घरच्यांनी त्यांना बेशुध्दावस्थेत उपचारासाठी येथील शासकीय रुग्णालयातील दाखल केले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

## निधन वृत्त...



### शिवानंद दरेकर महाराज

**सोलापूर, दि. १५ मे -**

श्री नागनाथ महाराजांच्या परंपरेचे गादीपती शिवानंद नागनाथ दरेकर महाराज (वय ८०) यांचे आज हृदयविकाराने निधन झाले. शिवानंद महाराज हे श्री नागनाथ महाराजांच्या पवित्र परंपरेतील पाचवे वंशज होते. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात अध्यात्म, समाजसेवा, शेतकऱ्यांविषयीची तळमळ आणि सर्वसामान्यांप्रती अपार प्रेम यांचा सुंदर संगम होता. त्यांच्या पश्चात चार भाऊ, दोन बहिणी, एक मुलगा, दोन विवाहित मुली, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांची अंत्यसंस्कार शनिवार दि. १६ मे रोजी सकाळी नऊ वाजता धोत्री येथे होणार आहे.



### वसंतराव मेळकुंदे

**सोलापूर, दि. १५ मे-**

दुधनी नगर परिषदचे सेवानिवृत्त कर निरीक्षक वसंतराव दिगंबर मेळकुंदे (वय ८४) यांचे आकस्मिक निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्चात दोन मुले एक मुलगी व नातू असा परिवार आहे. होत. दुधनी नगरपरिषदचे भारती जनता पार्टीचे माजी नगरसेवक अतुल मेळकुंदे यांचे ते वडील होत.



### प्राणेश बेळगावकर

**अक्कलकोट दि. १५ मे -**

श्री काशिविश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ जेऊर संचालित श्री काशिविश्वेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय जेऊर येथील इंग्रजी विषयाचे शिक्षक प्राणेश उर्फ मुरली आनंदराव बेळगावकर वय ४० यांचे दि. १४ मे रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यामागे आई, वडील व बहीण असा परिवार आहे.

# शिरूर अनंतपाळच्या पथकाकडून चिंचणीची तपासणी

## मुख्यमंत्री समृध्द पंचायतराज अभियानांतर्गत आत्म निर्भरतेकडे वाटचाल

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१५ मे -**

तालुक्यातील चिंचणी ग्रामपंचायतची दोन वर्षापुर्वी स्थापना झाली असुन ग्रामस्थांनी गटविकास अधिकारी अमोल जाधव, सहायक गटविकास अधिकारी अरूण भुजबळ, ग्रामसेवक चंद्रशेखर गिड्डे यांच्या माध्यमातून मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात सक्रीय सहभाग घेऊन आत्मनिर्भरतेकडे वाटचाल सुरू केली आहे. त्याची शिरूर अनंतपाळ (जि.लातूर) येथील तालुकास्तरीय पथकाकडून शुक्रवारी तपासणी करण्यात आली आहे.

राज्य सरकारतर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सुरू आहे. अभियानात सहभागी पंढरपूर तालुक्यातील १९ गावांची शिरूर अनंतपाळच्या तालुकास्तरीय पथकाकडून तपासणी केली आहे. यामध्ये चिंचणी ग्राम पंचायतीने लोकसहभाग, लोकवर्गणी, शासन निधीच्या माध्यमातून नेत्रदिपक कामे करून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आत्मनिर्भर व समृद्ध गाव संकल्पनेस सत्यात उतरवण्याचे काम केले आहे.



ग्रामीण कृषी पर्यटन केंद्र, वृक्षलागवड, परसबाग, गुणवत्तापुर्ण शाळा, अंगणवाडी आरोग्यसेवा, स्मशानभूमी, जलजीवन व्यवस्थापन, शुद्ध पाणी पुरवठा, घरकुल बांधकाम, समृद्ध ग्रामपंचायतच्या माध्यमातुन सुशासनाच्या कामाचा समावेश आहे. त्याची पथक प्रमुख गटविकास अधिकारी रविंद्र साचणे, विस्तार अधिकारी दिनकर व्होट्टे, पत्रकार रमेश मुळे, अभियंता अविनाश मोरे, रूपाली हटकर, पर्यवेक्षिका अनुसया खलंग्रे, समन्वयक लक्ष्मण नाटकरे यांच्या पथकाने तपासणी करून मूल्यांकन केले.

**टॉपच्या पाच गावांना मिळणार पुरस्कार**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात तालुक्यातील चिंचणी, तुंगत, नारायण चिंचोली, गोपाळपूर, धोंडेवाडी, सरकोली, भोसे आदी १९ गावांचा समावेश आहे. यातील टॉपच्या पाच गावांना पुरस्काराची अपेक्षा आहे. मुल्यांकन निकालानंतरच ही बाब स्पष्ट होणार असुन, जिल्हास्तरीय, राज्यस्तरीय पथकाकडूनही तपासणी होणार आहे. स्वयंमूल्यांकनाचे गुण आणि त्याबाबत ऑनलाइन दाखल केलेले पुरावे यांची आठ निकष आणि अडोतीस मुद्दे याच्या आधारे सखोल पडताळणी करून निष्पक्ष मूल्यांकन तपासणी केली आहे. त्यामुळे उत्कृष्ट कार्य करणारीच गावे निवडली जातील.



# अक्कलकोट लायन्स क्लबच्या सादरीकरणाला प्रथम क्रमांक

## पाच पुरस्कारांची प्राप्ती; गोव्यात झाली लायन्सची परिषद

**तभा वृत्तसेवा**
**अक्कलकोट : दि १५ मे**

गोवा येथे लायन्स क्लब गोवा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण विभागाच्या लायन्सची परिषद झाली. परिषदेमध्ये अक्कलकोट लायन्स क्लबने श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखालील अन्नछत्र मंडळाच्या पालखी परिक्रमा व कार्य सादर केले. त्याने प्रथम क्रमांक पटकावला.

अध्यक्षस्थांनी प्रांतपाल डॉ. विरेंद्र चितले हे होते. अक्कलकोट लायन्स क्लबच्या पदाधिकारी महाराष्ट्रीयन पेहराव्याने लक्षवेधी ठरले. या बरोबरच भजनी मंडळ श्री स्वामी समर्थांच्या रूपातील व्यक्तीच्या अभिनयामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. अक्कलकोट लायन्स क्लबला उत्कृष्ट कार्यामुळे पाच पुरस्कारांनी गौरविण्यात आले. अक्कलकोट लायन्स क्लबला मिळालेल्या पुरस्काराने गोवा येथील कार्यक्रमात मानाचा तुरा खोवला आहे.

क्लबची प्रांत पाल निवडणूकही झाली. ला. मंगेश दोशी- फलटण हे द्वितीय प्रांतपाल म्हणून विजयी झाले. उपप्रांतपाल म्हणून गडहिंग्लज चे डॉ. किरण खेराटे तर सन २०२६-२०२७ प्रांत पाल म्हणून सोलापूरचे उद्योजक राजेंद्र शहा-कासवा यांची निवड करण्यात आली. नूतन पदाधिकाऱ्यांचे श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले व न्यासाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांनी अभिनंदन केले.

या प्रसंगी गोवा येथील अनिता कलंगुड, गोविंदा कलंगुड, शाहू पाटील, रघुनाथ पाटील, रमेश राठोड, गोव्यातील सर्व भजनी मंडळासह अक्कलकोट लायन्स कल्बचे अध्यक्ष व श्री स्वामी समर्थ मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, राजेंद्र हत्ते, प्रभाकर मजगे, शहीद वळसंगकर, मल्लिनाथ साखरे, राजशेखर कापसे, शिरीष पंडित, विठ्ठल तेली, मल्लिकार्जुन मसुती, सुभाष गडसिंग, कल्याणी आळगी, शिवशरण खुबा, सुधीर माळशेट्टी, कमल अळ्ळोळी, महिबूब सलगरकर, राजू विभूते, राहुल आळंद, अमोल आहेरकर आदी उपस्थित होते.



# श्रीपूरमध्ये समाधान शिबीरातून ४१० दाखल्यांचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**श्रीपूर, दि. १५ मे -**

श्रीपूर ता. माळशिरस येथील गणेश हॉलमध्ये महाराजस्व अभियाना अंतर्गत समाधान शिबीराचे आयोजन केले होते. शिबीरात ४१० दाखल्यांचे वितरण करण्यात आले.

शिबीराची अधिक माहिती देताना माळशिरसचे नायब तहसीलदार अमोल कदम यांनी सध्या १० वी व १२ वीच्या परीक्षांचे निकाल लागले आहेत. विद्यार्थांना आवश्यक असणारे दाखले, शेतकऱ्यांना प्रलंबित फेरफार, डिजीटल ७/१२ उतारा, रहिवासी व जातीचे प्रमाण पत्र, तुकडाबंदी कायद्याचे उल्लंघन, पाणंद रस्ते प्रशासकीय मान्यता एकाच ठिकाणी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने या शिबिराचे आयोजन केल्याचे सांगितले.

शिबिरामुळे विद्यार्थी, पालक तसेच शेतकऱ्यांना एका दिवसात दाखले मिळाले आहेत. महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या विविध निर्णयांनूसार संबंधित रहिवाशांनी त्वरित आपल्या नोंदी करून घेण्याचे आवाहन केले.

प्रथम छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पुजन नायब तहसीलदार अमोल कदम, मंडल अधिकारी शरद खंडागळे, पं. स. सदस्य आप्पा कदम यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस (श.प.) गटाचे संदीप सुरेश घाडगे , बोरगांवच्या पोलीस पाटील मनीषा पाटील, दिलीप मिसाळ, विनायक केचे, विरेंद्र पाटील, नितीन घाडगे उपस्थित होते. प्रास्ताविक महाळुंगचे तलाठी निहाल जाधव यांनी केले. सुत्रसंचालन पत्रकार दत्ता नाईकनवरे यांनी केले. महाळुंग मंडलमधील सर्व महसुल अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शिबीरासाठी प्रयत्न केले. शिबिरास नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

### अज्ञात वाहनाच्या धडकेत बोरामणीत पादचारी वृध्द जागीच ठार

**सोलापूर, दि. १५ मे-**

अज्ञात वाहनाच्या धडकेत एक वाकिंग करणारा पादचारी वृद्ध जागीच ठार झाल्याची घटना बोरामणी येथे आज शुक्रवारी पहाटे साडेचार वाजता घडली. वसंत शंकर आवटे (वय ६५ वर्ष, रा. बोरामणी, दक्षिण सोलापूर) असे या मयत वृद्ध पादचाऱ्याचे नाव आहे ते आज पहाटे बोरामणी येथे वाकिंग करीत असताना पाणी टाकीजवळ अज्ञात वाहनाने त्यांना धडक दिली. या धडकेत ते गंभीर गंभीर जखमी होऊन जागीच मृत्युमुखी पडले. दरम्यान पुतण्या मल्लिनाथ आवटे यांनी चुलते वसंत यांना येथील शासकीय रुग्णालयात सकाळी पावणे सात वाजता दाखल केले असता डॉक्टरनी त्यांना मृत घोषित केले.

# सौरऊर्जा उत्पादकांना ग्रीड सपोर्ट चार्ज : गैरसमज आणि वस्तुस्थिती

**छतावरील सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या वीज ग्राहकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज नावाचा अधिभार महावितरणने लागू केला आहे व त्यामुळे सौरप्रकल्प बसविणाऱ्या ग्राहकांचे विशेषतः औद्योगिक ग्राहकांचे प्रचंड नुकसान होणार आहे, असा गैरसमज फार मोठ्या प्रमाणात प्रसरला आहे. हा सर्व प्रचार चुकीचा आहे. हा विषय समजून घेतला तर ध्यानात येईल की, ग्रीड सपोर्ट चार्जबाबत हितसंबंधी गटांनी गैरसमज पसरविला असून हा विषय एक टक्क्यांपेक्षा कमी ग्राहकांसाठी लागू आहे.**




**ग्रीड सपोर्ट चार्ज का लावला जात आहे ?**

सौरऊर्जेसारखी नवीकरणीय ऊर्जा पर्यावरण रक्षणाला मदत करते. आता ही ऊर्जा स्वस्तही मिळू लागली आहे. पण नवीकरणीय ऊर्जानिर्मिती अस्थिर असते. उदाहरणार्थ सौरऊर्जा निर्मिती करणाऱ्या पॅनेल्सवर सावली पडली की वीजनिर्मितीवर परिणाम होतो किंवा सायंकाळी सूर्य मावळला की, वीजनिर्मिती बंद होते. असे असल्याने ज्या विजेच्या जाळ्यामधून म्हणजे ग्रीडमधून नवीकरणीय ऊर्जा पाठविली जाते त्यामध्ये अस्थिरता निर्माण होते. विजेची मागणी आणि पुरवठा याचा समन्वय साधून ग्रीडमध्ये स्थिरता टिकविणे गरजेचे असते. ग्रीड अस्थिर झाले तर विजेची उपकरणे खराब होतात. त्यामुळे महावितरणला ग्रीड स्थिर ठेवण्यासाठी अतिरिक्त खर्च करावा लागतो. नवीकरणीय ऊर्जा निर्माण झाल्यानंतर तिचे ग्रीडमधून वहन करण्यासाठीही महावितरणला खर्च येतो. त्याची भरपाई करण्यासाठी मोठ्या सौरऊर्जा उत्पादकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करण्यात येतो. सौरऊर्जा निर्मिती करणारा ग्राहक आपल्याकडील अतिरिक्त वीज महावितरणच्या जाळ्यात पाठवितो व त्याला ज्यावेळी विजेची गरज असते त्यावेळी तो महावितरणच्या जाळ्यातून वीज घेतो. अर्थात हा ग्राहक महावितरणच्या जाळ्याचा वापर बॅटरीप्रमाणे वीज साठविण्यासाठी करत असल्याने त्या वापरासाठी मा. आयोगाने ग्रीड सपोर्ट चार्जची निश्चिती केली आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग या राज्यातील वीजविषयक निर्णय देणाऱ्या संस्थेने २०१९ साली सर्व नियामक प्रक्रिया पूर्ण करून विनियामाला मंजुरी दिली व सौरऊर्जा उत्पादकांवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा असा निर्देश दिला. त्यामुळे या क्षेत्रातील घटकांना गेली सात वर्षे याची जाणीव होती की, ग्रीड सपोर्ट चार्ज लागू होणार आहे. प्रश्न होता की, हा चार्ज कधी लागू होणार ? आयोगाने सुरुवातीला अशी अट घातली की, राज्यातील छतावरील सौरऊर्जानिर्मिती २००० मेगावॅटपेक्षा जास्त झाली की ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा. त्यानंतर आयोगाने २०२३ साली ही मर्यादा वाढवून ५००० मेगावॅट केली. महावितरणच्या वेबसाईटवर दररोज राज्यातील किती ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले व त्यांची एकूण क्षमता किती आहे, हे सातत्याने प्रसिद्ध केले जाते. राज्याची छतावरील सौरऊर्जा प्रकल्पांची क्षमता वाढत आहे, हे अनेक वर्षे जाहीरपणे स्पष्ट होते होते. अशा स्थितीत औद्योगिक ग्राहकांसाठी सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविणाऱ्या सौरऊर्जा व्यावसायिक कंत्राटदारांनी ग्राहकांना सुरुवातीलाच कल्पना द्यायला हवी होती की, भविष्यात त्यांना ग्रीड सपोर्ट चार्ज द्यावा लागेल. या सौरऊर्जा व्यावसायिक कंत्राटदारांनी ग्राहकांना अंधारात ठेवले. राज्याची छतावरील सौरऊर्जानिर्मिती क्षमता ५६०० मेगावॅटपेक्षा जास्त झाली आहे. ५,००० मेगावॅटची मर्यादा ओलांडल्यामुळे ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. आता सात वर्षांनी हा चार्ज लागू झाला तर हे व्यावसायिक कंत्राटदारच त्यावरून तक्रार करत आहेत, हे विशेष आहे.

**ग्रीड सपोर्ट चार्ज आकारणी**

ज्या ग्राहकांचा मंजूर भार १० किलोवॅटपेक्षा अधिक आहे व ज्यांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविला आहे त्यांना त्यांनी निर्माण केलेल्या विजेवर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू करावा, असा आदेश महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने दिला आहे. त्यानुसार महावितरणने संबंधित वीज ग्राहकांना हा अधिभार लागू केला आहे. ग्रीड सपोर्ट चार्जमुळे राज्यातील सोलर पॅनेल बसविलेल्या सर्व ग्राहकांना झळ बसणार असल्याचे जे चित्र निर्माण केले जात आहे, ते पूर्णपणे चुकीचे आहे.

राज्यामध्ये महावितरणचे एकूण ३ कोटी १७ लाख वीज ग्राहक असून त्यापैकी ४४,२४६ ग्राहकांना म्हणजे केवळ ०.१४ टक्के वीज ग्राहकांना हा अधिभार लागू झाला आहे. इतक्या कमी प्रमाणातील ग्राहकांपुरता असलेल्या विषयाच्या आधारे जणू काही सर्वांचे नुकसान झाल्याचे चित्र निर्माण करणे योग्य नाही. राज्यात महावितरणचे २ कोटी ३७ लाख घरगुती वीज ग्राहक आहेत. त्यापैकी ६ लाख ५७ हजार घरगुती वीज ग्राहकांनी छतावरील सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प बसविले आहेत. आयोगाच्या आदेशानुसार सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या एकूण घरगुती ग्राहकांपैकी १६,४१० म्हणजे केवळ २.४९ टक्के घरगुती ग्राहकांनाच ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. सर्व २ कोटी ३७ लाख ग्राहकांशी तुलना केली तर ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेल्या घरगुती ग्राहकांचे प्रमाण केवळ ०.०७ टक्के आहे.

राज्यात एकूण ४ लाख ४५ हजार औद्योगिक (उच्चदाब व लघुदाब) वीज ग्राहक असून त्यापैकी केवळ ८,८९४ ग्राहकांना म्हणजे सुमारे २ टक्के ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झालेला आहे. त्याचप्रमाणे महावितरणच्या एकूण २३ लाख ३० हजार व्यावसायिक वीजग्राहकांपैकी १२,८३२ ग्राहकांना म्हणजे ०.५५ टक्के व्यावसायिक ग्राहकांना ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे.

आयोगाने मार्च २०२६ मध्ये जो बहुवार्षिक वीजदर आदेश दिला त्याम ध्ये ग्रीड सपोर्ट चार्ज निश्चित केला व त्यानुसार महावितरणने तो १ एप्रिलपासून लागू केला आहे. आयोगाचा आदेश हा महावितरण कंपनीप्रमाणेच राज्य सरकारसह सर्वांसाठी बंधनकारक असतो आणि आयोगाच्या आदेशानुसार ग्रीड सपोर्ट चार्ज लागू होणार ही जाणीव २०१९ पासून सर्व ग्राहकांना होती.

चालू आर्थिक वर्षात उच्चदाब वीज ग्राहकांसाठी प्रती युनिट १ रुपये ४२ पैसे तर लघुदाब वीज ग्राहकांसाठी १ रुपये ९६ पैसे ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाला आहे. १० किलोवॅटपेक्षा अधिक मंजूर भार असेल आणि सौरऊर्जानिर्मिती प्रकल्प असेल अशा ग्राहकाने जेवढी सौरऊर्जानिर्मिती केली त्यानुसार हा चार्ज लागू होतो. या ग्राहकांनी जेवढी वीज निर्माण केली तेवढी ते स्वतः वापरत असल्याने त्यासाठीचे त्यांचे बिलाचे पैसे वाचतात. म्हणजे प्रति युनिट सुमारे १० रुपयांची बचत होते व त्या बदल्यात वर उल्लेख केल्याप्रमाणे ग्रीड सपोर्ट चार्ज भरावा लागतो.

ग्रीड सपोर्ट चार्ज लागू होण्यापूर्वी १० किलोवॅटपेक्षा अधिक मंजूर भार असलेल्या व सौरऊर्जा प्रकल्प बसविलेल्या ग्राहकांना बँकिंग चार्ज द्यावा लागत होता. या ग्राहकांनी महावितरणच्या जाळ्यात जी अतिरिक्त वीज पाठविली त्यातून उच्चदाब ग्राहकांसाठी ७.५ टक्के तर लघुदाब ग्राहकांसाठी १२ टक्के युनिटची कपात बँकिंग चार्ज म्हणून केली जात होती. आता ग्रीड सपोर्ट चार्ज लागू झाल्यानंतर बँकिंग चार्ज रद्द करण्यात आला आहे. बँकिंग चार्जचे पैसे थेट द्यावे लागत नव्हते तर युनिटच्या कपातीच्या स्वरुपात अप्रत्यक्षपणे द्यावे लागत होते, एवढेच.

**उद्योजकांना वीजदराबाबत लाभच**

मार्च २०२६ मध्ये महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने राज्यातील ग्राहकांसाठी दिलेल्या बहुवार्षिक वीजदर आदेशानुसार औद्योगिक ग्राहकांसाठीचा वीजदर पाच वर्षे कमी होत जाणार आहे. उदाहरणार्थ उच्चदाब औद्योगिक ग्राहकांसाठीचा सरासरी बिलाचा दर जुन्या १० रुपये ८८ पैशावरून चालू आर्थिक वर्षात १० रुपये ७१ पैशांवर आला आहे व तो आर्थिक वर्ष २०२९-३० मध्ये ९ रुपये ९७ पैसे प्रती युनिट इतका कमी होणार आहे. पूर्वी दरवर्षी १० टक्के दराने वीजदर वाढत होते. आता त्या ऐवजी २ टक्के दराने दरवर्षी दर कमी होणार आहेत व ही कपात पुढील पाच वर्षे होणार आहे. त्यासोबत औद्योगिक ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या काळातील वीज वापरासाठी एप्रिल ते सप्टेंबर या महिन्यात १५ टक्के तर ऑक्टोबर ते मार्च या महिन्यात २५ टक्के इतकी घसघशीत ग्रीड सपोर्ट चार्ज आहे. सर्वच औद्योगिक ग्राहकांना याचा लाभ होत आहे. त्यामुळे ग्रीड सपोर्ट चार्जवरून औद्योगिक ग्राहकांची दिशाभूल करू नये.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात महावितरणने एक ऐतिहासिक कामगिरी केली आहे, ती म्हणजे विजेचे दर कमी करणे. या दरकपातीचा लाभ सर्व वीज ग्राहकांना होत असताना केवळ ०.१४ टक्के ग्राहकांना लागू झालेल्या ग्रीड सपोर्ट चार्जवरून वातावरण बिघडविणे योग्य नाही. आपल्या नफ्याचे प्रमाण कमी झाले म्हणून काही मुठभर सौरऊर्जा उत्पादक ग्राहकांसाठी सर्वांना वेठीला धरणे दुर्दैवाचे आहे.

**■ विश्वास पाठक**

**(लेखक महावितरणचे स्वतंत्र संचालक आहेत.)**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# महत्वाचे...

## आयशर टेम्पोची दुचाकीला धडक; पती-पत्नीचा जागीच मृत्यू

**वेळापूर, दि.१५ मे-**

वेळापूर, ता माळशिरस येथील पोलिस स्टेशन हद्दीत सांगोला रोड येथील घुमेरा ओढ्यानाजिक झालेल्या आयशर टेम्पो व दुचाकीच्या अपघातात शेरी येथील तानाजी शहाजी माने देशमुख व त्यांची पत्नी जयश्री तानाजी माने देशमुख यांचा जागीच मृत्यू झाला. ही घटना शुक्रवार १५ मे रोजी सायंकाळी ६ वाजल्याच्या सुम ारास घडली. प्रत्यक्षदर्शींकडून मिळालेल्या माहितीनुसार आयशर टेम्पो क्रमांक एम एच १० एडब्लू ४६७० ने दुचाकीवरून जात असणाऱ्या तानाजी माने देशमुख व त्यांची पत्नी जयश्री माने देशमुख यांना पाठीमागून धडक दिली यात पती पत्नी दोघेही गंभीर जखमी झाले दरम्यान उपचारापूर्वीच त्यांचा मृत्यू झाला. वेळापूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात त्यांचे शवविच्छेदन करण्यात आले व रात्री उशिरा शेरी नंबर १ येथील राहत्या घरी अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान वेळापूर पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करून आयशर टेम्पो व चालक यांना ताब्यात घेतले असून वेळापूर पोलिसात रात्री उशिरा पर्यंत गुन्हा दाखल करण्याचे काम सुरू होते.



## दुचाकींच्या धडकेत जखमी झालेल्या वृध्दाचा उपचारादरम्यान मृत्यू

**सोलापूर, दि.१५ मे-**

दोन दुचाकींच्या धडकेत जखमी झालेल्या लक्ष्मी टाकळी (ता. पंढरपूर) येथील ७३ वर्षीय दुचाकीस्वार वृध्द व्यक्तीचा उपचारादरम्यान सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात गुरुवारी मध्यरात्री मृत्यू झाला. गोवर्धन रामा लवंड असे त्यांचे नाव आहे. १२ मे रोजी सकाळी ते लक्ष्मी टाकळी येथून दुचाकीवरून निघाले असता मोवासे रोड येथे समोरुन येणाऱ्या दुसऱ्या दुचाकीने त्यांना धडक दिली होती. गंभीर जखमी झाल्याने त्यांना एका खासगी दवाखान्यात प्राथमिक उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात त्यांचा नातू जगदीश याने दाखल केले. उपचारादरम्यान गुरुवारी मध्यरात्री मृत्यू झाला.

## पतीचे भांडण सोडविताना पत्नीवर सत्तुरने वार

**सोलापूर, दि.१५ मे-**

पतीचे भांडण सोडविणाऱ्या पत्नीला सत्तूरने वार करुन जखमी करण्यात आल्याची घटना मंगळवेढा तालुक्यातील महमदाबाद येथे बुधवारी घडली. सुजाता विनोद काटे (वय-२८, रा. महमदाबाद) असे जखमी पत्नीचे नाव आहे. दि.१३ मे रोजी घराजवळ तिच्या पतीचे भांडण सुरु होते. ते भांडण सोडविण्यासाठी ती गेली असता तिला बाबुराव हेगडे, उषा हत्तीकर व इतर एक जणांनी मिळून सत्तुरने मारहाण केली. यात डोक्याला जखम झाल्याने खासगी दवाखान्यात व मंगळवेढ्याच्या आरोग्य केंद्रात उपचार करुन सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात नवनाथ घाडगे यांनी दाखल केले.

## तलाठ्याला गाडी पकडून का दिली म्हणून कोयता व तलवारीने हल्ला, चौघे जखमी

**सोलापूर, दि.१५ मे-**

माझी गाडी तलाठ्याला का पकडून दिली असे म्हणून कोयता, तलवार व दगडाने हल्ला करून चौघांना जखमी करण्यात आल्याची घटना सांगोला तालुक्यातील वाटंबरे गावात गुरुवारी रात्री साडे दहा वाजता घडली. दादासो जालिंदर पवार (वय-४०), दिलीप जालिंदर पवार (वय-४४), विक्रम दादासो पवार (वय-१९), प्रथमेश दिलीप पवार (वय-२२, सर्वजण रा.वाटंबरे, ता.सांगोला) असे जखमींची नावे आहेत. गुरुवारी रात्री १०.३० वाजता गावातील एका मोबाईल दुकानाजवळ ते चौघेजण थांबले असताना दीपक दत्तात्रय पवार व इतर दोघेजण त्याठिकाणी येऊन आमची गाडी तलाठ्याला का पकडून दिली असे म्हणत दगड ,कोयता व तलवारीने मारहाण केली. यात दादासो पवार यांना डोक्याला जखम व इतर तिघांना मुका मार लागल्याने त्यांना सांगोला येथील आरोग्य केंद्रात प्रथमोपचार करून येथील शासकीय रुग्णालयात पहाटे साडेतीन वाजता ते स्वतः दाखल झाले.

## वारंवार टोमणे मारत विवाहितेचा छळ; पतीसह पाच जणांविरुध्द गुन्हा दाखल

**सोलापूर, दि.१५ मे-**

लग्नामध्ये हुंडा कमी दिल्याचे सांगत वारंवार टोमणे मारुन एका विवाहितेचा मानसिक, शारीरिक छळ केल्याप्रकरणी पतीसह पाच जणांविरुध्द विजापूर नाका पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. पती अक्षय अडलगट्टा, सासू सुपर्णा अडलगट्टा, सासरे चंद्रकांत अडलगट्टा, नणंद भक्ती अडलगट्टा, विजयकुमार अडलगट्टा (सर्वजण रा.लोणी, ता.संगमनेर, जि.अहिल्यानगर) अशी त्यांची नावे आहेत. याबाबत प्रियंका अक्षय गिरगुणे (रा.वैष्णवी नगर, सैफुल, सोलापूर) यांनी फिर्याद दिली. दि.१९ एप्रिल २०२४ ते दि.१३ मे २०२६ दरम्यान सासरी नांदत असताना वरील आरोपींनी लग्नात हुंडा कमी दिला, असे म्हणत शिवीगाळ व मारहाण केली. पतीने स्वतः चाकुने मारुन घेवून नावाने चिठ्ठी लिहितो म्हणून धमकी दिली. आणि लाटण्याने मारुन माझ्या हाताचे हाड मोडुन गंभीर दुखापत केली. तसेच माझ्या दोन्ही भावांना बरबाद करतो, असे फोनवरुन धमकी दिली, असेही फिर्यादीत नमूद आहे.

## मागील भांडणाच्या कारणावरुन मारहाण

**सोलापूर, दि.१५ मे-**

मागील भांडणाचा राग मनात धरुन दोघा भावंडांना लोखंडी रॉड व कड्याने मारहाण करुन जखमी केल्याप्रकरणी चार जणांविरुध्द एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आदित्य कोळी, निखील शिंदे, अभि पाटील, अल्तमश मनियार अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. याबाबत अरिहंत महावीर दंडवते (रा.११५, आशा नगर, सोलापूर) यांनी फिर्याद दिली आहे. यातील फिर्यादी हे दि. १२ मे रोजी रात्री भाऊ वृषभ सोबत दुकान बंद करुन घराकडे जात असताना लोकमंगल हॉस्पिटल जवळ वरील आरोपींनी मागील भांडणाचा राग मनात धरुन फिर्यादी व त्याच्या भावाला शिवीगाळ करुन लाथाबुक्यांनी मारहाण केली.

# भांडवली मूल्य आधारित करप्रणाली; प्रस्ताव फेरसादर करण्याचा निर्णय

**महापालिका स्थायी समिती सभेत ४ विषयांना मान्यता**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

सोलापूर महापालिका प्रशासनाने भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली लागू करण्यासंदर्भातील प्रस्ताव फेर सादर करण्याचा निर्णय महापालिका स्थायी समितीच्या सभेत घेण्यात आला. यामुळे सोलापूरकरांना तूर्तास तरी दिलासा मि ळाला आहे. दरम्यान, पाचपैकी चार विषयांना मान्यता देण्यात आली.

महापालिकेच्या स्थायी समितीची सभा शुक्रवार, दि. १५ मे रोजी सभापती रंजीता चाकोते यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या सभेमध्ये एकूण पाच विषयांपैकी चार विषयांना मंजुरी देण्यात आली. या सभेपुढे भांडवली मूल्य आधारित कर प्रणाली संदर्भातील विषयासह इतर ४ विषय देखील मान्यतेसाठी पाठविले होते.



या भांडवली मूल्य आधारित कर प्रणालीच्या माध्यमातून भविष्यात शहरातील मिळकतदारांना कर आणि दरवाढीचा फटका बसणार असल्याची ओरड पुन्हा एकदा सुरू झाली होती. अशा स्थितीत स्थायी समितीमध्ये या प्रस्तावावर कोणता निर्णय होणार याकडे साऱ्यांचेच लक्ष लागले होते.

या प्रस्तावावरुन राजकीय स्तरावर विरोध झाला होता. मात्र सत्ताधारी भाजप पदाधिकाऱ्यांनी तात्काळ कोणतीही कर किंवा दरवाढ होणार नसल्याचे स्पष्ट केले होते. 'भांडवली मूल्य आधारित करप्रणाली'चा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे सादर करण्यात आला असल्याने सत्ताधारी काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले होते. सोलापूर शहराचा वाढता विस्तार आणि स्मार्ट सिटी अंतर्गत सुरू असलेले विकास प्रकल्प पाहता, महापालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत अधिक बळकट आणि पारदर्शक करणे आवश्यक असल्याचे प्रस्तावात महापालिका प्रशासनाने नमूद केले होते. भाडे मूल्यावर आधारित कर प्रणाली मालमत्तेच्या प्रत्यक्ष बाजारभावाशी सुसंगत नाही. त्यामुळे महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील तरतुदीनुसार भांडवली म ूल्य आधारित कर प्रणाली स्वीकारण्याचा हा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे प्रस्तावात नमूद आहे. सध्याच्या प्रणालीतील त्रुटीमध्ये एकाच भागात असलेल्या जुन्या आणि नवीन मालमत्तांच्या करात मोठी तफावत आहे.

भाडे मूल्यावर आधारित करामुळे महापालिकेच्या उत्पन्नात अपेक्षित वाढ होत नसल्याची आणि भाडे निश्चितीमध्ये मानवी हस्तक्षेत जास्त असल्याने त्यात मानवीय चुकांचा संभव असल्याचे दाखवत महाराष्ट्र महापालिका अधिनियमाचे कलम १२९ नुसार कर योग्य मूल्यावर किंवा भांडवली मूल्यावर बसवता येण्याजोगे मालमत्ता कर व त्यांच्या दरांची तरतूद करण्यात आलेली आहे.

नियमामध्ये मालमत्ता करात सुसूत्रता आणण्यासाठी भांडवली मूल्यावर आधारित कर प्रणालीनुसार मालमत्ता कर आकारणी बाबतचा पर्याय उपलब्ध करण्याबाबतची तरतूद समाविष्ट करणारा अधिनियम यापूर्वी आणला. त्यानुसार ही कर प्रणाली अमलात आल्यास महापालिकेला विविध बाबींचा फायदा होणार असल्याचेही प्रस्तावात नमूद केले होते.

### खोके धारकांचे नियोजनबध्द पुनर्वसन प्रस्तावास मान्यता

सोलापूर शहरातील अनधिकृत फेरीवाल्यांचे तसेच मंडई येथील खोके धारकांचे नियोजनबद्ध पुनर्वसन करणे आवश्यक आहे त्यामुळे शहरातील गर्दीच्या रस्त्यावरील अशा पद्धतीचे छोटे मोठे व्यवसाय करणाऱ्या व्यापाऱ्यांना त्यांचा व्यापार करता येईल व महापालिकेकडे नियोजनबद्ध पुनर्वसन केल्याने त्यापोटी महसूल देखील जमा होण्यास मदत होईल. तसेच रस्त्यावरील गर्दी कमी होऊन वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्यास मदत देखील होईल, याबाबत धोरण निश्चित करण्यासंबंधी व नियोजनासाठी निर्णय घेण्यासंबंधीचा प्रस्ताव स्थायी समिती सभेपुढे मंडई विभागाकडून पाठविण्यात आला होता. त्यास मान्यता देण्यात आली.

### भांडवली कर मूल्य आधारित प्रणालीस जनतेने विरोध करावा

स्थायी समितीच्या सभेमध्ये भांडवली कर मूल्य आधारित प्रणाली लागू करण्यासंदर्भातला प्रस्ताव तूर्तास तरी फेरसादर करण्याचा निर्णय घेतला आहे. वास्तविक पाहता या नव्या प्रणालीस विरोध आहे. असे असतानाही स्थायी समितीमध्ये हा विषय आणला गेला. भविष्यातही पुन्हा हा विषय पुढे आणून त्यास मंजुरी देण्याची शक्यता आहे. या नव्या कर प्रणालीस जनतेने तसेच विविध घटकांकडून विरोध झाला पाहिजे. पूर्वीपासूनच आमचा या प्रणालीला विरोध आहे. भाडेमूल्य आधारित प्रणालीच योग्य आहे, अशी भूमिका शिवसेनेचे गटनेते अमोल शिंदे यांनी मांडली.

# पोलिस उपायुक्त गौहर हसन पुणे शहर तर विजय कबाडे यांची सोलापूर ग्रामीण येथे बदली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

महाराष्ट्र शासनाच्या वतीने राज्यातील अनेक पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सोलापूर पोलीस आयुक्तालयातील पोलिस उपायुक्त गौहर हसन यांची पुणे शहर येथे तर उपायुक्त विजय कबाडे यांची सोलापूर ग्रामीण येथे बदली झाली आहे.





पोलिस उप आयुक्त गौहर हसन यांच्या जागी नागपूरच्या सहाय्यक पोलिस अधीक्षक वृष्टी जैन यांची उपायुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे. त्या सोलापूर जिल्हा परिषदेचे सीईओ कुशल जैन यांच्या पत्नी आहेत. सोलापूर पोलीस आयुक्तालयातील परिमंडळ क्र १ चे उप आयुक्त विजय कबाडे यांची सोलापूर ग्रामीण येथे अपर पोलीस अधीक्षक म्हणून बदली झाली असून त्यांच्या जागी सोलापूर ग्रामीणचे अपर पोलीस अधीक्षक प्रीतम यावलकर यांची पोलीस उप आयुक्त म्हणून सोलापूर पोलीस आयुक्तालयात बदली झाली आहे.

# ११ लाख ५५ हजार रुपये किंमतीचा गोवा बनावटीचा मद्यसाठा जप्त

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या विभागीय भरारी पथकाने सोलापूर जिल्ह्यात अवैधरित्या साठवून ठेवलेल्या गोवा बनावटीच्या विदेशी म द्यावर धडक कारवाई करत एकूण ११ लाख ५५ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. याप्रकरणी एका इसमाविरुध्द गुन्हा नोंदवून त्यास अटक करण्यात आली.



सोलापूर जिल्ह्यातील बार्शी तालुक्यात खामगाव-पिंपळगाव रस्त्यालगत पवार फार्महाऊस शेजारी झाडाझुडपामध्ये लपवून ठेवलेला मद्यसाठा महाराष्ट्र दारुबंदी कायद्यान्वये जप्त करण्यात आला. या कारवाईत गोवा बनावटीच्या 'अॅडोरियल व्हिस्की'च्या ७५० मिली क्षम तेच्या १ हजार २८४ सीलबंद बाटल्या (१०७ बॉक्स) असा एकूण ११ लाख ५५ हजार ६०० रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला.

राज्य उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त डॉ.राजेश देशमुख, सह आयुक्त प्रसाद सुर्वे, विभागीय उपायुक्त सागर धोमकर यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक नरेंद्र थोरात, दुय्यम निरीक्षक विराज माने, धीरज सस्ते, निनाद निकम, सहायक दुय्यम निरीक्षक अलिम शेख, जवान शशिकांत भट, राहुल तारळकर, प्रविण पुसावळे, हतिक कोळपे, वाहन चालक झिंगळे यांच्या पथकाने ही कामगिरी पार पाडली.

### ढाबेमालकांकडून झाला होता हल्ला

माढा तालुक्यातील उपळाई गाव परिसरात अवैध मद्यविक्री करणाऱ्या ढाब्यावर कारवाईसाठी गेलेल्या राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या पथकावर काही ढाबेमालकांकडून हल्ला करण्यात आला होता. यात अधिकारी व कर्मचाऱ्यांना मारहाण होऊन ते जखमी झाले होते.

# महापालिका आयुक्त, स्थायी सभापती यांच्या डेन्मार्क अभ्यास दौऱ्यास केंद्र शासनाकडून मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

सोलापूर महापालिकेचे आयुक्त सचिन ओम्बासे, स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांच्या प्रस्तावित डेन्मार्क अभ्यास दौरा रद्द होणार असल्याची चर्चा सुरु होती. दरम्यान, या दौऱ्याचे महत्व लक्षात घेता केंद्र शासनाकडून मान्यता मिळाली आहे. दि.१८ ते २२ मे दरम्यान हा दौरा असल्याचे सांगण्यात आले.

स्थायी समितीच्या सभापती रंजीता चाकोते यांनी सांगितले की, शुक्रवारी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीदरम्यान मला केंद्र सरकारकडून मेल आणि फोन आला. त्यामध्ये या दौऱ्याचा पुनर्विचार करुन दौऱ्यास मान्यता देण्यात आली. संबंधितांशी चर्चा करुन आम्ही या दौऱ्याला जाण्याचा निर्णय घेतला.

हा कोणत्याही प्रकारचा पर्यटन किंवा सहलीचा दौरा नाही.दौऱ्याचे संपूर्ण नियोजन आधीच पूर्ण झाले आहे. संबंधित अधिकाऱ्यांची नियुक्तीही करण्यात आली आहे. सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यंत अभ्यास, बैठक आणि लेक्चर्सचे नियोजन आहे. सोलापूरच्या हवामान आणि पाणी व्यवस्थापनासंदर्भातील अभ्यासासाठी हा दौरा उपयुक्त ठरणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

# विठ्ठल-रुक्मिणीमातेच्या तुळशी अर्चन पूजेची आजपासून ऑनलाईन नोंदणी

**तसा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.१५ मे -**

श्री विठ्ठल रुक्मिणी मातेची दि.१७ ते २४ मे २०२६ या कालावधीतील तुळशी अर्चन पुजेची ऑनलाईन पध्दतीने नोंदणी करण्याची सुरवात दि. १६ मे रोजी सकाळी ११ पासून होत असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. या पूजेसाठी २ हजार १०० रुपये इतके देणगी मूल्य आहे.

पूजेची नोंदणी https://www.vitthalrukminimandir.org या मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून करता येणार आहे. अधिकाधिका भाविकांनी याचा लाभ घ्यावा.

याबाबतची अधिक माहिती, अटी व शर्ती संदर्भात ०२१८६ - २९९२९९ या दूरध्वनी क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा, असे व्यवस्थापक प्रवीणकुमार घम यांनी सांगितले.

# सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटीकडून ना. गडकरी यांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१५ मे-**

केंद्रीय रस्ते व वाहतूक महामंत्री नितीन गडकरी हे सोलापूरच्या दौऱ्यावर आले असता सोलापूर जिल्हा कॉंग्रेस कमिटी आणि खासदार प्रणिती शिंदे यांच्या वतीने जिल्हाध्यक्ष सातलिंग शटगार यांनी ना.गडकरी यांचा सत्कार केला.

ना.नितीन गडकरी यांनी कोणत्याही प्रकारचे राजकारण न आणता व पक्षपात न करता मोहोळ ते वळसंग या रस्त्याच्या कामासाठी ७४० कोटी रुपये मंजूर केल्याबद्दल आभार मानण्यात आले. यावेळी जिल्हा परिषदेचे माजी विरोधी पक्षनेता शिवानंद बिराजदार, अल्पसंख्यांक विभागाचे जिल्हा उपाध्यक्ष जहांगीर शेख, ओबीसी विभागाचे बाळ दळवी, हनुमंतराव पाटील, अमोघसिध्द पुजारी, प्रकाश फुलारी आदी उपस्थित होते.

# छत्रपती संभाजी महाराज अद्वितीय पराक्रम, विद्वता, राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.१४ मे-**

स्वराज्याच्या रक्षणासाठी आपल्या प्राणांची आहुती देणारे स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज हे अद्वितीय पराक्रम, विद्वत्ता आणि राष्ट्रनिष्ठेचे प्रतीक होते. त्यांच्या शौर्य, त्याग आणि स्वराज्य रक्षणाच्या संघर्षमय जीवनातून आजच्या तरुण पिढीने प्रेरणा घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन संभाजीनगर येथील व्याख्याते डॉ. बालाजी जाधव यांनी केले.





छत्रपती संभाजी महाराज जयंतीनिमित्त पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठातील 'स्वराज्य रक्षक छत्रपती संभाजी महाराज अध्यासन केंद्रा'च्या वतीने आयोजित व्याख्यानात बोलताना ते पुढे म्हणाले, संभाजी महाराज संस्कृत, हिंदी, फारसीसह अनेक भाषांवर प्रभुत्व असलेले विद्वान राजे होते. राष्ट्रनिष्ठा, स्वाभिमान, संकटातही न डगमगणारे नेतृत्व हे संभाजी महाराजांच्या जीवनातून शिकण्यासारखे आहे.

कुलगुरु डॉ.प्रकाश महानवर हे अध्यक्षस्थानी होते. यावेळी सांगली येथील प्रसिध्द शाहीर अविष्कार देशिंगे यांनी संभाजी महाराजांच्या पराक्रमावर आधारित पोवाडा सादर केला. याप्रसंगी देशभक्ती आणि शिवकालीन इतिहासाच्या गर्जनांनी विद्यापीठ परिसर दणाणून गेले होते. यावेळी प्र-कुलगुरु डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ.अतुल लकडे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ.अनिल घनवट, रमेश चौंडेकर आदींची प्रमुख उपस्थिती होती. अध्यासन केंद्राचे अध्यक्ष प्रा.सचिन गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. सहायक कुलसचिव डॉ.शिवाजी शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. याप्रसंगी व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.देवानंद चिलवंत, परीक्षा संचालक डॉ.श्रीकांत अंधारे, वित्त व लेखाधिकारी महादेव खराडे, अध्यासन केंद्राचे सदस्य डॉ.नेताजी कोकाटे, डॉ.विकास शिंदे यांच्यासह प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

CMYK

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सैन्यदलात अधिकारी पदासाठी तरुणांना मोफत प्रशिक्षणाची सुवर्णसंधी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे :भारतीय सैन्यदल, नौदल आणि वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना संयुक्त संरक्षण सेवा (सीडीएस) परीक्षेची तयारी करण्यासाठी महाराष्ट्र शासनातर्फे नवयुवक आणि नवयुवतींसाठी एक सुवर्णसंधी उपलब्ध आहे. नाशिक येथील छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड येथे १५ जून, २०२६ ते २८ ऑगस्ट, २०२६ या कालावधीत सीडीएस कोर्स क्र. ६७ आयोजित करण्यात येत आहे. निवड केलेल्या प्रशिक्षणार्थींनी १४ जून, २०२६ रोजी सकाळी १० वाजता प्रशिक्षण केंद्रावर हजर रहावे.

या कोर्सदरम्यान प्रशिक्षणार्थींना मोफत प्रशिक्षण, निवास आणि भोजन सुविधा पुरविल्या जाणार आहेत. लातूर जिल्ह्यातील इच्छुक उमेदवारांनी या संधीचा लाभ घेण्यासाठी ९ जून, २०२६ रोजी जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, लातूर येथे मुलाखतीसाठी हजर रहावे. मुलाखतीस येताना उमेदवारांनी सैनिक कल्याण पुणे यांच्या संकेतस्थळावरून (किंवा संबंधित जिल्हा सैनिक कल्याण कार्यालयाकडून) सीडीएस-६७ कोर्सचे प्रवेशपत्र आणि त्यासोबत असलेल्या परिशिष्टांची प्रिंट भरून सोबत आणावी.

प्रवेशासाठी उमेदवार कोणत्याही शाखेचा पदवीधर असावा आणि त्याने लोकसेवा आयोग, नवी दिल्ली यांच्यामार्फत घेण्यात येणाऱ्या सीडीएस परीक्षेसाठी ऑनलाईन अर्ज केलेला असावा. यासोबतच संबंधित पात्रता प्रमाणपत्रही आणणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी प्रभारी अधिकारी, छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड यांच्याशी ईमेल (ीरळपळपस.र्लीलपरीहळज्ञसारळश्र.ले), दूरध्वनी (०२५३-२४५१०३२) किंवा व्हॉट्सअॅप (९१५६०७३३०६) द्वारे कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी ले. कर्नल प्रकाश पांढरे (निवृत्त) यांनी केले आहे.



# विविध वृत्त...

## १९ मे रोजी जिल्हास्तरीय विशेष कार्यशाळेचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे लातूर जिल्हा कार्यालय, समाज कल्याण सहाय्यक आयुक्त कार्यालय आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मातंग समाजातील १२ पोटजातींमधील बांधवांसाठी १९ मे २०२६ रोजी सकाळी ११ वाजता एक दिवसीय जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा लातूर येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन परिसरातील शासकीय मुलांचे वसतिगृह अभ्यासिका हॉल होणार आहे.

अनुसूचित जाती प्रवर्गातील मातंग समाजाच्या कल्याणासाठी केंद्र व राज्य शासनामार्फत विविध कल्याणकारी योजना राबविल्या जातात. या योजनांची माहिती समाजातील सर्व घटकापर्यंत पोहोचावी आणि जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा, या उद्देशाने या विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यशाळेत समाज कल्याण विभाग आणि जिल्हा परिषद समाज कल्याण विभागांतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध वैयक्तिक आणि सामूहिक लाभ योजनांची सविस्तर माहिती दिली जाईल. तसेच महामंडळामार्फत मिळणारे कर्ज, शैक्षणिक सवलती आणि रोजगाराच्या संधींबाबत तज्ज्ञ मार्गदर्शन करणार आहेत. मातंग समाजातील युवक-युवती आणि गरजू लाभार्थ्यांनी या कार्यशाळेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून शासकीय योजनांची माहिती घ्यावी, असे आवाहन साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

## मच्छिमारांना साधनांच्या खरेदीसाठी ७५ टक्क्यांपर्यंत शासकीय अनुदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : मच्छिमारीसाठी लागणाऱ्या साधनांच्या किमतीत दिवसेंदिवस मोठी वाढ होत असल्याने, गरीब मच्छिमारांना आपला व्यवसाय किफायतशीरपणे करता यावा, या उद्देशाने मत्स्यव्यवसाय विभागामार्फत अर्थसहाय्य योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत सहकारी संस्थांच्या सभासदांना आणि वैयक्तिक क्रियाशील मच्छिमारांना मासेमारी साधनांच्या खरेदीवर अनुदान दिले जाणार असून, लातूर येथील मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त यांनी यासाठी इच्छुक लाभार्थ्यांकडून प्रस्ताव मागविले आहेत.

या योजनेमध्ये तयार मासेमारी जाळीसाठी २४ हजार रुपये प्रकल्प किंमत निश्र्चित करण्यात आली असून, ३० किलो जाळीसाठी अर्थसहाय्य दिले जाईल. तसेच नौका खरेदीसाठी लाकडी नौकेकरिता ६० हजार, स्टील नौकेसाठी ३० हजार, तर फायबर नौकेसाठी १ लाख २० हजार रुपयांची प्रकल्प मर्यादा ठरवण्यात आली असून, यामध्ये राखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ७५ टक्के आणि अराखीव प्रवर्गातील लाभार्थ्यांना ५० टक्के शासकीय अनुदान दिले जाणार आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदार हा मत्स्यव्यवसाय सहकारी संस्थेचा सभासद किंवा वैयक्तिक क्रियाशील मच्छिमार असणे आवश्यक आहे. लाभार्थ्याने विहित नमुन्यातील अर्जासोबत प्रकल्प अहवाल, आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड, छायाचित्र, बँकेचे विवरणपत्र आणि खरेदीची जीएसटी पावती सादर करणे अनिवार्य आहे. जर लाभार्थी बँक कर्जाद्वारे किंवा स्वनिधीतून योजनेचा लाभ घेणार असेल, तर संबंधित बँकेचे शिफारसपत्र जोडणे आवश्यक आहे. कुटुंबातील इतर कोणत्याही व्यक्तीने यापूर्वी या योजनेचा लाभ घेतला असल्यास संबंधित लाभार्थी अपात्र ठरविण्यात येईल, असे मत्स्यव्यवसाय विभागाचे सहाय्यक आयुक्त कार्यालयामार्फत स्पष्ट करण्यात आले आहे. तरी पात्र मच्छिमारांनी लवकरात लवकर आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नीट पेपर फुटी प्रकरणी महाराष्ट्रातील संशयित आरोपींची संख्या वाढणार ?

## लातुरातील आरसीसी चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकरांचीही सीबीआयकडून कसून चौकशी

तभा वृत्तसेवा / श्रीधर स्वामी

लातूर, दि.१५ मे : नीट पेपरफुटी प्रकरणात लातूरचेही नाव आल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. गुरुवारी सेवानिवृत्त प्रा. पी.व्ही. कुलकर्णी यांना सीबीआयने ताब्यात घेतल्यानंतर लातुरातील नामांकित रेणुकाई केमिस्ट्री क्लासेस (आरसीसी) चे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर यांची गुरुवारी रात्री आणि शुक्रवारी पहाटेपासून कसून चौकशी केली. या चौकशीमुळे सीबीआयच्या तावडीत लातूरमधील आणखी 'मोहरे' आणि 'बडे प्यादे' सापडणार का ? याबद्दल चर्चांना एकच उधाण आले आहे. असे झाल्यास या प्रकरणातील महाराष्ट्रातील संशयित आरोपींची संख्या वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

लातूरच्या अर्थकारणाला वेगळी दिशा देण्याचे काम मागच्या काही वर्षात लातूरच्या जुन्या इंडस्ट्रिअल एरिया आणि आता ट्युशन एरिया म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या एरियाने केले आहे. लातूर पॅटर्नच्या गवगव्याचा फायदा व्यावसायिक उद्देशाने खाजगी शिकवणी वर्गांकडे वळलेल्या अनेक शिकवणी चालकांनी करून घेतला. यातून अनेक चेहरे मोठे झाले, नावारूपालाही आले. त्यापैकीच एक आरसीसी क्लासेसचे संचालक प्रा. शिवराज मोटेगावकर हे होत. त्यांनी आपल्या क्लासेसचा व्याप लातूरसह नांदेड, पुणे , नाशिक, कोल्हापूर, अकोला, छत्रपती संभाजीनगर परिसरातही वाढवल्याचे सर्वज्ञात आहे. आपल्या क्लासेसचा नीट परीक्षेचा निकाल राज्यातच नव्हे तर देशात अव्वल रहावा यासाठीही त्यांचे प्रयत्न असत. प्रा. मोटेगावकर यांच्याबद्दल पोलीस अधीक्षकांकडे याच प्रकरणात एका पालकाने तक्रार दिली असतानाही पोलीस प्रशासनाने क्लासेस चालकाच्या नावाचा साधा उल्लेख सुद्धा आपल्या प्रेस नोटमध्ये केला नव्हता. यावरून प्रा. मोटेगावकर यांचा लातूरच्या खाजगी शिकवणी चालकांमध्ये किती दरारा आहे, याचीच जणू पुष्टी होऊ शकते.

लातूरमध्ये अनेक खाजगी शिकवणी क्लासेस कार्यरत आहेत. त्यामध्ये आरसीसीचा उल्लेख प्राधान्याने केला जातो. प्रा. शिवराज मोटेगावकर लातूरमधील काही डॉक्टर मंडळींच्या पाल्यांसाठीही विशेष कोचिंग सेवा उपलब्ध करून देत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यासाठी ते अधिकचे शुल्कही आकारत असल्याचे बोलले जाते. अर्थात, हा त्यांच्या व्यवसायाचा एक भाग असल्याने त्यावर अधिक भाष्य करणे उचित ठरणार नाही. सीबीआयचे पथक या प्रकरणी लातूरमध्ये तळ ठोकून असल्याने एकूणच ट्युशन एरिया परिसरात शांत पण काहीसे तणावाचे वातावरण असल्याचे दिसून आले. सामान्य लातूरकरांचे या प्रकरणाकडे सूक्ष्म लक्ष असल्याचे पाहावयास मिळत आहे.

### प्रा. मोटेगावकरांची नऊ तास चौकशी

सीबीआयचे २८ सदस्यीय पथक या प्रकरणी लातुरात दाखल झाले आहे. या पथकाने शुक्रवारी तब्बल नऊ तास प्रा. शिवराज मोटेगावकर यांची कसून चौकशी केली. त्यात सीबीआयच्या हाती काही ठोस पुरावे तसेच या प्रकरणाशी संबंधित काही महत्वपूर्व कागदपत्रे मिळाल्याचे विश्वसनीय वृत्त आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात मोटेगावकर यांच्यावर सीबीआयकडून आणखी कारवाई होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. नीट पेपर फुटीप्रकरणी आणखीही काही मोठ्या माशांचा सहभाग जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. अर्थात त्यांचाही शोध घेण्याचे काम सीबीआयच्या माध्यमातून होणार आहे, याबद्दल कोणाच्याही मनात शंका नाही. मात्र, यातून एकही बडा मासा सुटणार नाही, याची खबरदारी सीबीआयने घ्यावी,अशी अपेक्षा असंख्य पालक बाळगून आहेत.

### लातूर पॅटर्न दैदिप्यमानच !

शैक्षणिक लातूर पॅटर्न अगदी बावन्नकशी सोने आहे, याबद्दल कोणाच्या मनात शंका नाही. नववी दहावीच्या निकालावर हा पॅटर्न अवलंबून आहे. यावर्षीही दहावीच्या निकालात १०० पैकी १०० गुण संपादन करणारे सर्वाधिक विद्यार्थी लातूरचेच आहेत. यावरून गुणवत्ता इथल्या मातीत ओतप्रोत भरलेली आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. लातूरच्या या दैदिप्यमान लातूर पॅटर्नलाअशा काही बाबींमुळे काही दोषी मंडळी गालबोट लावण्याचा प्रयत्न करत असतील तर त्यांच्यावर सीबीआय तथा पोलीस प्रशासनाकडून कठोर कारवाई होणारचआहे. जे दोषी आहेत, त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई व्हावी अशी अपेक्षा विद्यार्थी - पालक बाळगून आहेत.

## सीएनजी दुर्घटना नियंत्रणासाठी विविध यंत्रणांची संयुक्त रंगीत तालीम

### लातूरमध्ये आपत्ती व्यवस्थापनाचे प्रभावी सादरीकरण

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : आपत्कालीन परिस्थितीत विविध शासकीय विभागांमधील समन्वय आणि तत्परता तपासण्यासाठी महानगर गॅस लिमिटेडच्या वतीने लातूर येथे 'सीएनजी सुरक्षा व आपत्ती व्यवस्थापन' विषयावर भव्य संयुक्त प्रात्यक्षिकाचे (मॉक ड्रील) आयोजन करण्यात आले होते. संभाव्य गॅस गळती आणि आग दुर्घटनेच्या वेळी आपत्कालीन यंत्रणा कशा प्रकारे कार्य करतात, याचे यशस्वी सादरीकरण यावेळी करण्यात आले.

या रंगीत तालमीमध्ये एका सीएनजी वाहनाला गॅस गळतीमुळे आग लागल्याची काल्पनिक परिस्थिती निर्माण करण्यात आली होती. घटनेची माहिती मिळताच महानगर गॅसच्या कर्मचाऱ्यांनी प्राथमिक स्तरावर आग विझवण्याचे प्रयत्न केले. मात्र, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, महानगरपालिका अग्निशमन दल आणि पोलीस वाहतूक शाखा या यंत्रणांना त्वरित पाचारण करण्यात आले.



घटनेनंतर काही मिनिटांतच अग्निशमन दलाच्या गाड्या आणि रुग्णवाहिका घटनास्थळी दाखल झाल्या. जखमींना तातडीची वैद्यकीय मदत देऊन रुग्णालयात हलविणे, वाहतूक पोलिसांनी परिसराची नाकेबंदी करणे आणि अग्निशमन जवानांनी शिस्तबद्ध पद्धतीने आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवणे, अशा टप्प्यांत ही मोहीम राबवण्यात आली. यातून विविध विभागांमधील अचूक समन्वय आणि जलद प्रतिसाद प्रणाली दिसून आली.

या उपक्रमास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी डॉ. साकेब उस्मानी, वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक विठ्ठल दराडे, महापालिका अग्निशमन अधिकारी बापूसाहेब जाधव, आनंद शिंदे, तसेच औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालयाचे अधिकारी अतुल डांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ उपविभागातर्फे डॉ. प्रमोद पाटील यांनी या संपूर्ण प्रक्रियेचे सूक्ष्म निरीक्षण केले.

महानगर गॅसचे लातूर व धाराशिव जिल्हा प्रमुख राकेश तिडके यांच्या मार्गदर्शनाखाली आनंद शितोळे, समीर संकपाळ, पल्लव भुते, अक्षय कुचेकर आणि संतोष हल्लाळे यांनी या रंगीत तालमीच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## २६ वर्षांपासून प्रलंबित सातबारा दुरुस्तीचा प्रश्न

### जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारामुळे दोन दिवसांत निकाली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : एका तलाठ्याच्या चुकीमुळे सातबारा उताऱ्यावर २६ वर्षांपूर्वी झालेली चुकीची नोंद दुरुस्त करण्यासाठी पाठपुरावा करणाऱ्या एका ८५ वर्षीय वृद्धाला लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या संवेदनशीलतेमुळे अखेर न्याय मिळाला आहे. वयोवृद्ध शेतकरी प्रभाकर प्रयाग यांचा काही वर्षांपासून रेंगाळलेला सातबारा दुरुस्तीचा प्रश्र्न जिल्हाधिकाऱ्यांनी केवळ दोन दिवसांत मार्गी लावला.

लातूर येथील रहिवासी प्रभाकर विनायकराव प्रयाग (वय ८५) यांची खोपेगाव शिवारात वडिलोपार्जित जमीन आहे. २६ वर्षांपूर्वी वासनगाव तलावाच्या कालव्यासाठी या परिसरातील जमीन संपादित करण्यात आली होती. हा कालवा वास्तविक प्रभाकर प्रयाग यांच्या भावाच्या शेतातून गेला होता. मात्र, तत्कालीन तलाठ्याच्या नजरचुकीमुळे प्रयाग यांच्याही सातबाऱ्यावर '६ आर' जमीन संपादित झाल्याची नोंद करण्यात आली. ही चुकीची नोंद काढण्यासाठी श्री. प्रयाग मागील काही वर्षांपासून प्रशासनाकडे दाद मागत होते, मात्र हा तांत्रिक पेच सुटत नव्हता.

या प्रकरणाची वस्तुस्थिती जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या निदर्शनास येताच त्यांनी विलंब न लावता स्वतः या प्रकरणाची फाईल मागवून घेतली. प्रकरणाचे गांभीर्य आणि प्रयाग यांचे वय लक्षात घेऊन त्यांनी संबंधित विभागाला तातडीने दुरुस्तीचे आदेश दिले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या या आदेशानंतर प्रशासकीय यंत्रणेने चक्रे फिरवून अवघ्या दोन दिवसांत कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली आणि त्रुटीमुक्त नवीन सातबारा तयार केला. गुरुवार, १४ मे २०२६ रोजी जिल्हाधिकाऱ्यांनी प्रयाग यांना आपल्या कार्यालयात बोलावून त्यांच्या हाती दुरुस्त केलेला सातबारा सुपुर्द केला. २६ वर्षांचा प्रश्र्न मार्गी लागल्याने प्रयाग यांनी अत्यंत भावूक होत जिल्हाधिकाऱ्यांचे आभार मानले.

## लातूर जिल्ह्यात मतदार याद्यांची 'विशेष सखोल पुनरिक्षण' मोहीम

### २०.३६ लाख मतदारांच्या घरी पोहोचणार निवडणूक यंत्रणा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : भारत निवडणूक आयोगाने देशातील १६ राज्ये आणि ३ केंद्रशासित प्रदेशांमध्ये 'विशेष सखोल पुनरिक्षण' (एसआयआर) मोहिमेचा तिसरा टप्पा जाहीर केला आहे. या मोहिमेत महाराष्ट्राचा समावेश असून या मोहिमेंतर्गत लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या नोंदींची प्रत्यक्ष पडताळणी केली जाणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत देण्यात आली आहे.

महाराष्ट्रात विशेष सखोल पुनरिक्षण मोहीम अत्यंत व्यापक स्वरूपात राबवण्यात येणार आहे. यात लातूर जिल्ह्यातील सुमारे २० लाख ३६ हजार मतदारांच्या तपशिलाची खातरजमा २ हजार १४२ मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांमार्फत करण्यात येणार आहे. हे अधिकारी प्रत्येक मतदाराच्या घरी जाऊन माहिती गोळा करतील. या प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी राजकीय पक्षांतर्फे नेमण्यात आलेले 'बूथ लेव्हल एजंट्स' (बीएलए) त्यांना सहकार्य करणार आहेत.

सध्या सुरू असलेल्या जनगणनेच्या कामात व्यस्त असलेल्या क्षेत्रीय यंत्रणेचा विचार करून या तिसऱ्या टप्प्याचे वेळापत्रक निश्र्चित करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील ही प्रक्रिया जून महिन्यापासून सुरू होऊन ऑक्टोबरमध्ये पूर्ण होईल.

दिनांक २० ते २९ जून २०२६ या कालावधील बीएलओ यांना प्रशिक्षण आणि पूर्वतयारी करण्यात येईल. त्यानंतर ३० जून ते २९ जुलै २०२६ या कालावधीत घरोघरी जाऊन भेटी देण्यात येतील. ५ ऑगस्ट २०२६ रोजी मसुदा मतदार यादी प्रसिद्ध करण्यात येईल, तसेच ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत दावे व हरकती नोंदविता येतील आणि ७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादीची प्रसिद्ध करण्यात येईल.

भारत निवडणूक आयोगाने सर्व राजकीय पक्षांना प्रत्येक मतदान केंद्रावर आपले एजंट (बीएलए) नियुक्त करण्याचे आवाहन केले आहे. यामुळे मतदार यादीतून दुबार नावे तसेच मृत व्यक्तींची नावे काढणे आणि नवीन पात्र मतदारांची नोंदणी करणे ही प्रक्रिया अधिक पारदर्शक आणि अचूक होण्यास मदत होणार आहे.


लातूर जिल्ह्यातील विधानसभा क्षेत्रनिहाय मतदार संख्या- लातूर ग्रामीण- ३३२०११ लातूर शहर- ३९९१०५ अहमदपूर- ३४५३६० उदगीर (अ.जा.)- ३२३५६५ निलंगा- ३३३३९१ औसा- ३०३२०९

## उद्धवणारी संभाव्य परिस्थिती लक्षात घेवून आवश्यक सज्जता ठेवावी : पालकमंत्री

### जिल्हास्तरीय खरीप हंगामपूर्व आढावा बैठक - बियाणे, खते वितरणात सुसूत्रता ठेवावी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : भारतीय हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार २०२६ च्या मान्सूनवर 'एल-निनो'चा प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता आहे. या पार्श्र्वभूमीवर आगामी खरीप हंगामात उद्भवणाऱ्या परिस्थितीवर मात करण्यासाठी आवश्यक सज्जता ठेवावी. तसेच शेतकऱ्यांना पेरणी, बियाणे व खत वापर याविषयी योग्य मार्गदर्शन करावे, अशा सूचना राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी दिल्या.



खरीप हंगाम पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा घेण्यासाठी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली दूरदृश्य प्रणालीद्वारे आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. विधान परिषद आमदार तथा मुख्य प्रतोद विक्रम काळे, खासदार डॉ. शिवाजी काळगे, आमदार रमेश कराड, जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी राजेंद्र कदम यांच्यासह पशुसंवर्धन विभाग, अग्रणी बँक, आत्मा, वन आदी विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

आगामी खरीप हंगामात शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते यांचा पुरवठा सुरळीत होणे आवश्यक आहे. यासाठी जिल्ह्यातील सर्वच कृषि निविष्ठा केंद्रांमध्ये पुरेशा प्रमाणात बियाणे, रासायनिक खते उपलब्ध करून द्यावीत. कोणत्याही तालुक्यात तुटवडा निर्माण होवू नये, यासाठी निविष्ठा वितरणात सुसूत्रता ठेवावी, अशा सूचना पालकमंत्री भोसले यांनी दिल्या. तसेच महाबीज बियाणे वितरणाबाबत कोणत्याही प्रकारच्या तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घ्यावी, असेही त्यांनी सांगितले.

'एल-निनो'मुळे मॉन्सूनमध्ये अनिश्र्चितता राहणार असल्याने शेतकऱ्यांना पेरणी योग्य कालावधीबाबत सातत्याने मार्गदर्शन करावे, कोणत्या कालावधीत कोणत्या पिकाची पेरणी करणे योग्य राहील, याबाबत जनजागृती करावी. तसेच संभाव्य परिस्थितीत दुबार पेरणीची परिस्थिती निर्माण झाल्यास त्यासाठी पुरेसे बियाणे उपलब्ध होईल, यादृष्टीने सूक्ष्म नियोजन करावे. शेतकऱ्यांना बियाणे, रासायनिक खते आणि पाण्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत मार्गदर्शन करावे. यासाठी कार्यशाळा, प्रशिक्षणाचे आयोजन करण्याच्या सूचनाही पालकमंत्री भोसले यांनी यावेळी दिल्या.

लातूर जिल्ह्यातील वृक्षांचे प्रमाण अतिशय कमी असल्याने जिल्ह्यात वृक्ष लागवडीवर भर देण्याच्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचना आहेत. त्यानुसार आगामी काळात जास्तीत जास्त वृक्षारोपण आणि वृक्ष संवर्धनासाठी प्रयत्न करावेत. यासाठी स्थानिक स्वयंसेवी संस्थांची मदत घ्यावी. यासोबतच जलसंधारणाच्या कामांना गती देण्याच्या सूचनाही पालकमंत्र्यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कदम यांनी खरीप हंगाम पूर्वतयारीबाबत माहिती दिली. आगामी खरीप हंगामात ४ लाख ८५ हजार ५६४ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणीचे नियोजन असून त्यासाठी ३ लाख ६४ हजार २४८ क्विंटल बियाणे लागणार आहे. यापैकी २ लाख ३६ हजार ७६१ क्विंटल बियाणे शेतकऱ्यांकडे उपलब्ध असून महाबीज, राष्ट्रीय बीज निगम आणि खासगी कंपन्यांचे एकूण १ लाख २७ हजार ४८७ क्विंटल बियाणे उपलब्ध होणार आहे. रासायनिक खतांच्या सरासरी वापरानुसार यंदा १ लाख ४५ हजार मेट्रिक टन खताची आवश्यकता भासेल असा अंदाज आहे. त्यानुसार महिनानिहाय पुरेसे खतसाठा उपलब्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

बोगस बियाणे, खत विक्री रोखण्यासाठी आवश्यक खबरदारी घेण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. 'एल-निनो' मुळे उद्भवणाऱ्या आपत्कालीन परिस्थितीत पीक नियोजनाबाबत कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार पर्यायी पीक पद्धती, योग्य वाण निवड, राखीव बियाणे साठा यासंदर्भात व्यापक जनजागृती करण्यात येत असल्याचे कदम यांनी सांगितले.

आमदार काळे, खासदार डॉ. काळगे, आमदार कराड यांनीही यावेळी अनुषंगिक सूचना दिल्या.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# संक्षिप्त...

## मातृभूमी व कस्तुराबाई नर्सिंग स्कूल येथे जागतिक परिचारिका दिन साजरा



तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ मे : मातृभूमी प्रतिष्ठान शिक्षण प्रसारक मंडळद्वारा संचलित मातृभूमी व कस्तुराबाई नर्सिंग स्कूल येथे जागतिक परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य उषा कुलकर्णी या होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रियंका राठोड, डॉ राजेश राठोड,रेक्टर राहुल जाधव यांची उपस्थिती होती.

यावेळी डॉ. प्रियंका राठोड यांनी विद्यार्थ्यांना जागतिक परिचारिका दिनाचे महत्त्व पटवून देत परिचारिका क्षेत्रातील सेवा, समर्पण व कर्तव्यभावना याविषयी मार्गदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी रुग्णसेवा हीच सर्वोच्च सेवा मानून कार्य करावे, असे आवाहन केले.

कार्यक्रमास ट्युटर राहुल जाधव यांची उपस्थिती होती. विद्यार्थ्यांनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन प्रा बिभीषण मद्देवाड यांनी केले

यावेळी रेक्टर रेखा रणक्षेत्रे, मिरा बिरादार नेहा वाघमारे, अश्रिवनी काळे, दयानंद टाके ,विवेक देवर्षे ,दत्ता जाधव मुबारक पटेल आदींनी कार्यक्रम यशस्वितेसाठी प्रयत्न केले. यावेळी कस्तुबाई व मातृभूमी नर्सिंगस्कूलच्या विविध रुग्णालयातील कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थीनी सपना कोचेवाड,जयश्री गायकवाड ,सुषमा कांबळे ,कोथिबिंरे सीमा,धोतरे महादेवी, आदी परिचारीकांचा सत्कार करण्यात आला

## उपजिल्हा रुग्णालयात परिचारिका दिवस उत्साहात साजरा




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ मे : शासकीय उपजिल्हा रुग्णालय उदगीर येथे लोकसेवा मंडळतील रुग्णमित्रांनी परिचारिका दिवस निमित्ताने सर्व परिचारिका ( नर्स ) व ब्रदर्स अहोरात्र रुग्णसेवा देणाऱ्यांची प्रशंसा करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाला आदर या दृष्टीने कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमासाठी डॉ. पांडुरंग दोडके ( वैद्यकीय अधीक्षक ) , डॉ. मल्लिकार्जुन सुरशेट्टी (सर्जन ) देवणी प्रमुख पाहुणे , सौ रंजना साखरे (नर्स प्रमुख) सौ संगीता रेनापुरे. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ वैशाली नामदेव दंडीमे व सौ पार्वती गडकरी यांनी केले.

उपजिल्हा रुग्णालयातील सर्व परिचारिका व ब्रदर्स यांचा सत्कार गुलाब पुष्प गौरव करण्यात आला.

रुग्णालयात लोक सेवा मंडळा अंतर्गत रुग्णमित्र हे शासकीय उपजिल्हा रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना मदत व मार्गदर्शन केले जाते. चिट्टी कुठे काढायची, कोणता ओपीडी नंबर कुठे, कोणता वॉर्ड कुठे आहे, कोणती तपासणी कुठे होते, रक्ताची गरज असेल तर काय करावे अशा विविध गोष्टींची निस्वार्थपणे मदत व मार्गदर्शन करण्यात येते. यामुळे रुग्णांना व त्यांच्या नातेवाईकांना मानसिक आधार मिळतो. या कार्यक्रमात रुग्णालयात सेवा देणारे सर्व रुग्णमित्र , योगशिक्षक व स्वयंसेवक उपस्थित होते.

## नाली तुंबली, दुर्गंधी पसरली

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : शहरातील मुख्य बसस्थानकाच्या पाठीमागील गांधी मार्केट परिसर ते पोस्ट ऑफिसदरम्यान ठिकठिकाणी नाली तुंबली असून यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. ठराविक दिवसांनी नाली उपसा केला जातो. दुर्गंधीमुळे परिसरातील नागरिक व दुकानदारांना त्रास होत आहे.

# उदगीर- जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांची मागणी

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ मे : लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर आज मंत्रालयात राज्याचे कृषिमंत्री दत्ता मामा भरणे यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत अतिवृष्टीमुळे झालेल्या पीक नुकसान, जमीन खरडून झालेली हानी तसेच शेतकऱ्यांना देण्यात येणाऱ्या नुकसान भरपाईचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी माजी मंत्री संजय बनसोडे यांनी लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी मोठ्या संकटात सापडले असून त्यांना तातडीने व जास्तीत जास्त मदत मिळावी यासाठी राज्य शासनाकडे ठोस मागणी करण्यात आल्याचे सांगितले. तसेच माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनीही शासनाने शेतकऱ्यांच्या हितासाठी तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी केली.

बैठकीत मांडण्यात आलेल्या माहितीनुसार, गतवर्षी खरीप २०२५ च्या हंगामात उदगीर-जळकोट मतदारसंघातील जवळपास ८५ ते ९० टक्के पीक क्षेत्र नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झाले आहे. उदगीर तालुक्यात ६१ हजार ८४५ हेक्टर तर जळकोट तालुक्यात ३० हजार ८६७ हेक्टर क्षेत्रावर खरीप पेरणी झाली होती. एकूण ९२ हजार ७१२ हेक्टर क्षेत्रापैकी तब्बल ७७ हजार ८६५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले असून सुमारे ६८९८.३६ लाख रुपयांच्या नुकसान भरपाईचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात आला आहे.



शेतकऱ्यांना पीक विमा व नुकसान भरपाई तातडीने मिळावी यासाठी बैठकीत विविध महत्त्वाच्या मागण्या करण्यात आल्या. एनडीआरएफ पंचनाम्यांची माहिती ग्राह्य धरून सर्व पीक विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा मंजूर करावा, अतिवृष्टीमुळे पिकांच्या गुणवत्तेत झालेल्या घटीचाही विमा योजनेत समावेश करावा तसेच ई-पीक पाहणीतील तांत्रिक त्रुटी दूर करण्यासाठी तातडीची दुरुस्ती व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना बैठकीत देण्यात आल्या.

याशिवाय गाव पातळीवर पंचनामे करण्याची व्यवस्था, पीक कापणी प्रयोगांची संख्या वाढवणे, विमा कंपन्यांवर कडक नियंत्रण ठेवणे, शेतकऱ्यांना व्याजासह भरपाई देण्याची तरतूद करणे तसेच अल्पभूधारक शेतकऱ्यांचा विमा हप्ता शासनाने उचलावा, अशा विविध मागण्या शासनाकडे करण्यात आल्या.

माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी, लातूर जिल्ह्यातील व उदगीर-जळकोट मतदारसंघातील शेतकरी नैसर्गिक संकटामुळे मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शासनाने शेतकऱ्यांना न्याय देवुन तातडीने आणि जास्तीत जास्त नुकसान भरपाई द्यावी अशी भूमिका त्यांनी मांडली, शेतकऱ्यांच्या हितासाठी विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करण्याची मागणी ही आ.बनसोडे यांनी केली आहे.

विमा कंपनीने जिल्हास्तर व राज्यस्तरावर अपिल केले होते ते दोन्ही स्तरावर फेटाळण्यात आले आहेत. त्याप्रमाणे विमा कंपनीने मान्यता दिली असुन आता विमा कंपनी विमा भरपाई देण्याची कार्यवाही तातडीने करणार असल्याचे विमा कंपनीचे प्रतिनिधी चंदन जगताप यांनी बैठकीत सांगितले. माजी मंत्री तथा आमदार संजय बनसोडे यांनी विमा प्रतिनिधी यांना लातूर जिल्ह्यातील व उदगीर जळकोट मतदारसंघातील तसेच जिल्ह्यातील सर्व विमाधारक शेतकऱ्यांना जास्तीत जास्त विमा देण्याची कार्यवाही करण्याची सूचना केली.

या बैठकीस कृषि सचिव परिमल सिंह, कृषि आयुक्त सुरज मांढरे, लातूर जि.प. चे बांधकाम सभापती ज्ञानेश्र्वर बिरादार, जि.प. सदस्य डॉ. दीपक सोमवंशी, रामराव राठोड, प्रकाश राठोड, उदगिरचे राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष बालाजी भोसले, लातूर जिल्हा कृषी अधिकारी राजेंद्र कदम इत्यादी उपस्थित होते.

## शासकीय निवासी शाळेची १००% निकालाची परंपरा कायम

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १५ मे : शालांत प्रमाणपत्र परीक्षेत समाज कल्याण विभागांतर्गत चालणाऱ्या अनुसूचित जाती व नवबौद्ध मुलींची शासकीय निवासी शाळा बावची ता रेणापूर जी लातूर या शाळेच्या मुलींनी उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखत शाळेचा निकाल १००% लागला आहे.

यामध्ये खुशी गौतम तरकसे या विद्यार्थिनीने ९०.८०% घेऊन शाळेतुन प्रथम आली आहे. गौरी अरुण मोरे या विद्यार्थिनीने ८९.२०% घेऊन शाळेतुन द्वितीय तर केशरी वाल्मीक कोंकले या विद्यार्थिनीने ८५% घेऊन शाळेतुन तृतीय आली आहे.

परीक्षेस एकुण ३१ विद्यार्थीनी बसल्या होत्या त्यापैकी ३१ पैकी ३१ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत.

यामध्ये विशेष प्राविण्यासह १२ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत. प्रथम श्रेणी मध्ये ११ विद्यार्थीनी तर द्वितीय श्रेणी मध्ये ८ विद्यार्थीनी उत्तीर्ण झाल्या आहेत .

सर्व उत्तीर्ण व गुणवंत विद्यार्थीनींचे कौतुक व अभिनंदन समाज कल्याण लातूर विभागाचे प्रादेशिक उपायुक्त अविनाश देवसटवार तसेच समाज कल्याण कार्यालय लातूरचे सहाय्यक आयुक्त यादव गायकवाड, शाळेचे मुख्याध्यापक राहुल कांबळे, वस्तीगृह अधिक्षक मनिषा बडे, तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी ज्योती महाळंगीकर, निलेश मोहण गवळी, प्रशांत कांबळे तुकाराम देवकते, बाळू मदने आदिंनी अभिनंदन करून पुढील शिक्षणासाठी शुभेच्छा दिल्या.

# कवळी हिप्परग्यात जलसमृद्ध एकात्मिक विकास अभियानाचा शुभारंभ

## सात वर्षांत औसा तालुक्यातील ७० गावांचे उदिष्ट

तभा वृत्तसेवा

औसा दि. १५ मे : औसा तालुक्यातील ७० गावांचा सात वर्षांच्या कालावधीत जलसमृद्ध आणि एकात्मिक पद्धतीने परिपूर्ण विकास करण्याचा महत्त्वाकांक्षी संकल्प आ अभिमन्यू पवार यांनी हाती घेतला आहे. या अभियानाची सुरुवात पायलट प्रोजेक्ट म्हणून सात गावांपासून करण्यात आली आहे. या अभियानांतर्गत गावांचा केवळ पायाभूत विकास नव्हे तर आरोग्य, पोषण, पाणीपुरवठा, महिलांचे आरोग्य, व्यसनमुक्ती, दिव्यांग कल्याण आणि सामाजिक सक्षमीकरण अशा विविध अंगांनी सर्वांगीण विकास साधला जाणार असून कवळी हिप्परगा येथे आरोग्य शिबीराचे उद्घाटन करुन शुभारंभ करण्यात आला आहे.

औसा तालुक्यातील हिप्परगा कवळी येथे भव्य आरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार अभिमन्यू पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत भास्टेवाड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय चे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, क्रिएटिव्ह फाउंडेशन चे अध्यक्ष परीक्षित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.



आमदार अभिमन्यू पवार म्हणाले, या अभियानांतर्गत सात गावांतील प्रत्येक नागरिकांची सखोल आरोग्य तपासणी करण्यात येणार असून तब्बल ७२ विविध वैद्यकीय तपासण्यांद्वारे नागरिकांच्या आरोग्याची माहिती संकलित केली जाणार आहे. तपासणीत दुर्धर आजार आढळलेल्या रुग्णांवर पुणे आणि मुंबई येथील नामांकित रुग्णालयांमध्ये मोफत उपचार उपलब्ध करून दिले जाणार आहेत. प्रत्येक नागरिकासाठी डिजिटल आरोग्य कार्ड तयार करण्यात येणार असून ७० वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांसाठी १० लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार देणारी 'वयवंदना योजना' प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे आ. पवार यांनी यावेळी स्पष्ट केले.

महिलांच्या आरोग्यावर विशेष भर देत तोंडाचा कर्करोग, स्तन कर्करोग आणि गर्भाशय कर्करोग तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. किशोरवयीन मुलींना सॅनिटरी नॅपकिन उपलब्ध करून देणे, कुपोषणमुक्तीसाठी जनजागृती, शाळा आणि अंगणवाड्यांमधील पौष्टिक आहार तपासणी, व्यसनमुक्ती पथके, दिव्यांग बांधवांना साहित्य वाटप,टीबी मुक्त गाव अभियान, शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा, एकल महिलांची आरोग्य तपासणी आणि सर्व महिलांना रक्तगट कार्ड वितरण असे अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम अभियानांतर्गत राबविले जाणार आहेत.निरोगी गाव, सक्षम कुटुंब आणि आरोग्यदायी समाज घडविण्याच्या दिशेने हे अभियान अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरणार आहे, अशी भावना आमदार अभिमन्यू पवार यांनी व्यक्त केली.

जिल्हाधिकारी डॉ. भारत भास्टेवाड म्हणाले, लोकसहभागाशिवाय गावांचा सर्वांगीण विकास शक्य नाही.यासाठी ग्रामस्थांनी जागरूकपणे अभियानात सहभागी व्हावे.या अभियानात सहभागी व्हावे. असे आवाहन करुन शासनाकडून जलसमृद्ध आणि एकात्मिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर निधी आणि सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. आरोग्य शिबिरात विशेषतः महिलांनी आरोग्य शिबिरांचा लाभ घ्यावा. अनेक गंभीर आजार सुरुवातीला जाणवत नाहीत, मात्र तपासण्यांमधून ते निदर्शनास येतात. त्यामुळे वेळेवर आरोग्य तपासणी करणे अत्यंत गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना म्हणाले, आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना अंतर्गत पात्र कुटुंबांना दरवर्षी पाच लाख रुपयांपर्यंतचे मोफत आणि कॅशलेस उपचार उपलब्ध होतात. राज्यातील तसेच देशातील संलग्नित शासकीय आणि खासगी रुग्णालयांमध्ये हे उपचार घेता येतात. अनेक नागरिकांना या योजनांची माहिती नसल्याने त्यांनी ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन योजनांचा लाभ घ्यावा. असे आवाहन केले.

पंचायत समिती सभापती गंगाबाई कोदळीकर, शोभा अभिमन्यू पवार, उपसभापती अमोल पाटील, बाजार समिती सभापती चंद्रशेखर सोनावणे, जिल्हा परिषद सदस्या दिपाली भोसले, उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार घनशाम अडसूळ, सरपंच संतोष गोरे, उपसरपंच नितीन म्हेत्रे, चेअरमन व्यंकट पाटील तसेच तालुका आरोग्य अधिकारी डॉ. रेवन देवणीकर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ६७ जणांनी केले रक्तदान

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : लातूर येथील गांधी चौक पोलीस स्टेशन मध्ये कार्यरत असलेले पोलीस उप निरीक्षक अजय लोहेकर यांच्या३७ व्या वाढदिवसाचे औचित्य साधून शहरात ३० विविध ठिकाणी स्वइच्छेने रक्तदान करून वाढदिवस साजरा करण्यात आला .

दानात दान रक्त दान हे सर्वश्रेष्ठ दान असून यामुळे एखाद्याचा जीव वाचवला जाऊ शकतो, त्यामुळे प्रत्येकानी वर्षातून एकदा तरी रक्तदान करावे असे पोलीस उपनिरीक्षक अजय लोहेकर रक्तदान करणाऱ्या समोर म्हणाले,

## छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात

तभा वृत्तसेवा

रेणापूर दि. १५ मे : छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त रेणापूर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

संभाजी सेनेच्या वतीने आयोजित या कार्यक्रमात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे ॲड. श्रीकांत सूर्यवंशी आणि संतोष शिंदे यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

यावेळी संभाजी सेनेचे तालुकाध्यक्ष सुरेश चव्हाण, तालुका कार्याध्यक्ष एकनाथ काळे, बंकट दत्त, हनुमंत बारलेकर, शिवाजी मामा खटाळ, इलाई शेख, केशव कदम, किसन गडगळे, विद्यार्थी आघाडी तालुकाध्यक्ष बबलू शिंदे, सुरज कातळे, यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नीट-यूज पेपर लीक प्रकरणाची केंद्रीय यंत्रणांकडून निष्पक्ष चौकशी व्हावी : अभाविप

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ मे : अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) नीट-यूजी २०२६ परीक्षेशी संबंधित समोर येत असलेल्या पेपर लीक तसेच परीक्षेची गोपनीयता आणि विश्र्वासार्हतेबाबत निर्माण झालेल्या गंभीर प्रश्र्नांवर चिंता व्यक्त करते. विविध माध्यमांमधून, नेशनल टेस्टिंग एजेंसी (छढ-) तसेच तपास यंत्रणांकडून समोर येत असलेल्या माहितींमुळे देशभरातील लाखो विद्यार्थी व पालकांच्या मनात परीक्षा व्यवस्थेच्या विश्र्वासार्हतेबाबत गंभीर चिंता निर्माण झाली आहे. या पार्श्र्वभूमीवर नीट-यूजी २०२६ परीक्षा रद्द करण्यात येणे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. विशेष म्हणजे २०२४ मध्येही अशाच प्रकारच्या घटना समोर आल्यानंतर पुन्हा अशी परिस्थिती निर्माण होणे अत्यंत निराशाजनक आहे.

अभाविपचे स्पष्ट मत आहे की प्रवेश परीक्षांच्या शुचितेशी व विश्र्वासार्हतेशी कोणत्याही प्रकारची तडजोड स्वीकारली जाऊ शकत नाही. परीक्षा होण्यापूर्वी प्रश्र्नपत्रिका किंवा त्यासंबंधित माहिती काही लोकांपर्यंत पोहोचत असेल, तर तो केवळ परीक्षा व्यवस्थेवर आघात नसून वर्षभर परिश्रम करणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याशी अन्याय आहे.

अभाविप केंद्र सरकारकडे मागणी करते की, या संपूर्ण प्रकरणाची केंद्रीय यंत्रणांकडून निष्पक्ष व वेळबद्ध चौकशी करण्यात यावी तसेच यामध्ये दोषी आढळणारे परीक्षा माफिया, संबंधित व्यक्ती आणि कोणत्याही स्तरावर सहकार्य करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी. तसेच चौकशी पूर्ण होईपर्यंत नेशनल टेस्टिंग एजेंसी (छढ-) ने संपूर्ण प्रकरणात पारदर्शकता ठेवत विद्यार्थ्यांसमोर व पालकांसमोर वस्तुस्थिती स्पष्ट करावी.

अभाविप देवगिरी प्रदेशमंत्री डॉ. वरुणराज नन्नवरे म्हणाले की, देशातील लाखो विद्यार्थी अनेक वर्षांच्या मेहनतीनंतर आणि संघर्षानंतर नीटसारख्या परीक्षांना सामोरे जातात. अशा परिस्थितीत कोणत्याही प्रकारची अनियमितता विद्यार्थ्यांच्या मनोबलावर आणि भविष्यावर गंभीर परिणाम करणारी असते. त्यामुळे संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी होणे आवश्यक असून दोषींना कोणत्याही परिस्थितीत पाठीशी घातले जाऊ नये. तसेच विद्यार्थ्यांनी अफवांवर विश्र्वास ठेवू नये, संयम राखावा आणि घाबरून जाऊ नये. अखिल भारतीय विद्यार्थी परिषद विद्यार्थ्यांच्या हितासाठी, पारदर्शक परीक्षा व्यवस्था आणि न्याय सुनिश्र्चित करण्यासाठी सातत्याने आवाज उठवत राहील.

## रासायनिक खतांचा वापर कमी करून नैसर्गिक शेतीकडे वळा

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १५ मे : पश्र्चिम आशियाई देशांतील सद्यस्थिती आणि जागतिक संकटाच्या पार्श्र्वभूमीवर, केंद्र व राज्य शासनाने कृषी क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण पाऊले उचलली आहेत. त्यानुसार रासायनिक खतांवरील अवलंबित्व कमी करून शाश्र्वत शेतीला चालना देण्यासाठी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी नैसर्गिक, जैविक आणि सेंद्रिय शेती पद्धतीचा अवलंब करावा, असे आवाहन लातूरचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम यांनी केले आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना केलेल्या आवाहनानुसार, राज्य शासनाने कृषी विभागामार्फत विविध उपाययोजना प्रस्तावित केल्या आहेत. रासायनिक खतांच्या अतिवापरामुळे जमिनीचा पोत बिघडत असून, जागतिक बाजारपेठेतील खतांच्या उपलब्धतेवरही परिणाम होत आहे. ही परिस्थिती विचारात घेता, जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी पारंपरिक रासायनिक शेतीकडून नैसर्गिक शेतीकडे वळणे आवश्यक आहे. यामुळे केवळ जमिनीची सुपीकता टिकणार नाही, तर उत्पादन खर्च कमी होऊन विषमुक्त अन्ननिर्मितीला चालना मिळेल.

भविष्यात रासायनिक खतांची उपलब्धता सुरळीत राहावी आणि खतांचे वाटप पारदर्शक व योग्य पद्धतीने व्हावे, यासाठी प्रशासकीय स्तरावर नियोजन करण्यात येत आहे. या नियोजनाचा भाग म्हणून शेतकऱ्यांनी 'ग्रीस्टॅक' या प्रणालीवर आपली नोंदणी करणे अनिवार्य आहे. या नोंदणीमुळे खतांचा संतुलित वापर आणि शासकीय योजनांचा लाभ थेट शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवणे सोपे होणार आहे.

कार्यालयाशी संपर्क साधावा. जिल्ह्यातील सर्व शेतकरी बांधवांनी बदलत्या जागतिक परिस्थितीचा विचार करून आणि शासनाच्या धोरणांना प्रतिसाद देऊन नैसर्गिक शेतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र उदयगिरीत छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी




तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १५ मे : येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य प्रा. आडेप्पा अंजुरे यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी सहसचिव प्रशांत पेन्सलवार, कोषाध्यक्ष महादेव नौबदे, प्राचार्य डॉ. आर. के. मस्के, उपप्राचार्य डॉ. एस. जी. कोडचे, ग्रंथपाल डॉ. एल. बी. पेन्सलवार, दिनविशेष समितीचे प्रमुख डॉ. एम. एस. खांडेकर तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# किनवटमध्ये महसूल विभागाचा थरार; मुसळधार पावसात मध्यरात्री 'छापा'

**तभा वृतसेवा**
**किनवट, दि. १५ मे -**

तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या अवैध वाळू वाहतुकीला लगाम घालण्यासाठी महसूल विभागाने शुक्रवारी (दि. १५ मे) पहाटेच्या सुमारास मोठी कारवाई केली. विजांचा कडकडाट आणि मुसळधार पावसाची तमा न बाळगता महसूल पथकाने दोन किलोमीटर पायपीट करून दाभाडी शिवारात वाळूने भरलेला ट्रॅक्टर पकडला. या धडक कारवाईमुळे वाळू माफियांचे धाबे दणाणले आहेत.



मिळालेल्या माहितीनुसार, मौजे दाभाडी परिसरात रात्रीच्या अंधारात विनापरवाना रेती उपसा आणि वाहतूक होत असल्याची गुप्त माहिती प्रशासनाला मिळाली होती. सहाय्यक जिल्हाधिकारी जेनीतचंद्र दोंन्तुला आणि तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली तातडीने एक विशेष पथक तैनात करण्यात आले.

शुक्रवारी रात्री ११:४० च्या सुमारास या मोहिमेला सुरुवात झाली. निसरडा रस्ता आणि कोसळणाऱ्या पावसामुळे वाहने नेणे शक्य नसल्याने, महसूल कर्मचाऱ्यांनी सुमारे दोन किलोमीटरचा रस्ता पायी कापला. पहाटे १:५० वाजण्याच्या सुमारास पथकाने दाभाडी शिवारात सापळा रचून रेतीने भरलेला ट्रॅक्टर (क्रमांक चक २६ उए १२६५) रंगेहात पकडला. हा ट्रॅक्टर मौजे दाभाडी येथील प्रल्हाद लक्ष्मण शिंदे यांच्या मालकीचा असल्याचे निष्पन्न झाले आहे.

या मोहिमेत मंडळ अधिकारी (बोधडी बु.) जयराम गाडे, मंडळ अधिकारी (मांडवी) विनोद सिंगेवार, ग्राम महसूल अधिकारी हरीश यादव, मेघश्याम सांगवीकर, सचिन धुमाळे आणि संदीप मडावी यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

जप्त केलेला ट्रॅक्टर पहाटे २:३० वाजता किनवट तहसील कार्यालयात जमा करण्यात आला आहे. अवैध वाळू उपसा आणि वाहतूक करून शासनाचा महसूल बुडवणाऱ्यांची गय केली जाणार नाही. ही मोहीम यापुढेही तीव्र केली जाईल, असा इशारा तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांनी दिला आहे. तसेच, नागरिकांनी अशा अवैध प्रकारांची माहिती प्रशासनाला देऊन सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

# स्वारातीम विद्यापीठात 'डेव्हलपमेंट स्टडीज' पदविका अभ्यासक्रम सुरू : डॉ. महेश मगर

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ मे -**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रामार्फत आगामी शैक्षणिक वर्षापासून पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा इन डेव्हलपमेंट स्टडीज हा एक वर्षाचा पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार आहे. विद्यापीठाच्या अधिसभेमध्ये या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या अधिसभेचे सदस्य डॉ. महेश मगर यांनी मागील अधिसभा बैठकीत रूरल डेव्हलपमेंट अथवा डेव्हलपमेंट स्टडीज या विषयांशी संबंधित अभ्यासक्रम सुरू करण्याबाबत प्रस्ताव मांडला होता. मराठवाड्यातील ग्रामीण, सामाजिक व आर्थिक प्रश्नांचा शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अभ्यासक्रमाची आवश्यकता असल्याचे त्यांनी अधोरेखित केले होते. अधिसभेमध्ये यावर सविस्तर चर्चा झाल्यानंतर प्रस्तावास मंजुरी देण्यात आली. त्यानुसार, डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्रामार्फत हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येत असून अभ्यासक्रमाची रूपरेषा, अभ्यासक्रम संरचना तसेच प्रवेश प्रक्रियेची नियमावली अध्यासन केंद्राचे संचालक डॉ. दिलीप चव्हाण यांनी तयार केली आहे. अभ्यासक्रम राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० अनुषंगाने तयार करण्यात आला असून ग्रामीण विकास, विकास अध्ययन, सार्वजनिक धोरण, कृषी व सामाजिक-आर्थिक प्रश्न, स्थानिक स्वराज्य संस्था आणि क्षेत्रीय अभ्यास यांसारख्या विषयांचा समावेश करण्यात आला आहे.

हा अभ्यासक्रम एक वर्ष कालावधीचा असून दोन सत्रांमध्ये विभागलेला आहे. क्षेत्रभेटी, प्रात्यक्षिके, अहवाल लेखन, सादरीकरण आणि संशोधनाभिमुख अध्ययनावर विशेष भर देणे आदी अभ्यासक्रमामध्ये नमूद करण्यात आले आहे.

डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र सुरू करण्यासाठी अधिसभेत प्रस्ताव मान्य करून घेतला होता. नोंदणीकृत पदवीधर मतदार निवडणुकीच्या जाहीरनामांमध्ये डॉ. शंकरराव चव्हाण अध्यासन केंद्र सुरू करणार यांचाही समावेश होतो. माझ्या पहिल्याच अधिसभा सदस्य काळात ते सुरू झाले, याचा मला अभिमान आहे. आता माझ्या दुसऱ्या अधिसभा कार्यकाळात त्याच अध्यासन केंद्र पदविका अभ्यासक्रम सुरू केल्याबद्दल प्रशासनाचे डॉ. महेश मगर यांनी आभार मानले.

## अवैध रेतीचा उपसा करणाऱ्या दोघांना अटक

**नांदेड** - नांदेड ग्रामीण पोलिसांनी काल मध्यरात्री साडेबारा वाजता विष्णूपुरी शिवारात धाड टाकून अवैध रेतीचा उपसा करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून ३९ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ग्रामीण पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार विष्णूपुरी शिवारात गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणात वाळूचा उपसा अवैधरित्या होत असल्याचे समजले. त्यानुसार काल रात्री त्यांनी धाड टाकून एक ट्रॅक्टर, पाण्यात तरंगणारे ३२ तराफे, रेती उपसा करणारे चार इंजिन असा ३९ लाख ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. ज्यात रेतीचाही समावेश आहे. पोलिसांनी ट्रॅक्टर चालक गजानन वानखेडे व त्याचा सहकारी आनंदा गोडबोले यांना अटक केली असून, यातील अन्य दोघेजण मात्र पळून जाण्यात यशस्वी ठरले. त्यांचा तपास व शोध मोहिम सुरु आहे. यात जप्त केलेले ३२ तराफे पोलिसांनी जाळून टाकले आहेत. सचिन चावरे यांच्या फिर्यादीवरुन आरोपीविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस असल्याची बतावणी करुन फसवणूक

**नांदेड-** नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत पाकीजा फंक्शन हॉलसमोर आपण पोलीस असल्याची बतावणी करुन एका व्यक्तीच्या जवळील ६५ हजार रुपयांचे दागिणे लंपास केले आहेत. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल केला आहे.

दामोदर हनुमानदास जाजू हे काल रात्री आपल्या घरी जात असताना पाकीजा फंक्शन हॉलजवळ दोन इसम त्यांच्याजवळ आले आणि त्यांनी आम्ही पोलीस असून या भागात चोर्‍या होत आहेत असे सांगून जाजू यांच्या जवळील सोन्याची चैन व अंगठी असा ऐवज एका पिशवीत ठेवला व तेथून ते पिशवी घेवून पसार झाले. त्याची किंमत ६५ हजार रुपये एवढी असून, पोलीस असल्याची बतावणी करुन आपल्याला फसविले अशा आशयाची तक्रार त्यांनी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात दिली. त्यावरुन अज्ञात दोन व्यक्तीविरुध्द फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**अर्धापूर-**अर्धापूर शहरातील नामांकित वकील ॲड.शेख आमेर शेख सगीर अर्धापूरकर यांच्या वतीने वॉर्ड क्रमांक ३ तसेच अर्धापूर शहरातील सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात इयत्ता १० वी व १२ वी उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभ उत्साहात संपन्न झाला. यावेळी



विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देत विविध क्षेत्रातील करिअर संमधिबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमात बोलताना ॲड.शेख आमेर यांनी विद्यार्थ्यांनी आपल्या भविष्यातील ध्येय डोळ्यासमोर ठेवून शिक्षण घ्यावे,असे आवाहन केले. कायद्याच्या क्षेत्रात करिअर करायचे असल्यास सेट परीक्षा देऊन बीएसएल व एलएल.बी. शिक्षण घेता येते, तर विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन जेईई परीक्षेद्वारे इंजिनिअरिंग तसेच कॉम्प्युटर इंजिनिअरिंगमध्ये उज्ज्वल करिअर करता येते, असे त्यांनी सांगितले. तसेच डॉक्टर होण्यासाठी नीट परीक्षा उत्तीर्ण होऊन एमबीबीएस, बीएएमएस, बीएचएमएस आदी अभ्यासक्रमांना प्रवेश घेता येतो, अशी माहितीही त्यांनी विद्यार्थ्यांना दिली. याशिवाय आयटीआयमधून तांत्रिक कौशल्य आत्मसात करून हाताला हुनर मिळवता येतो, तर बीबीए शिक्षणातून उत्तम व्यावसायिक बनण्याची संधी उपलब्ध असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. एकीकडे शिक्षण महाग करून विद्यार्थ्यांना शिक्षणापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरू आहेत, मात्र देशाची प्रगती आणि समाजाचे उज्वल भविष्य घडवण्यासाठी विद्यार्थ्यांनी चांगले शिक्षण घेऊन समाजातील सर्व घटकांना न्याय देणारे व्यक्तिमत्त्व बनावे, असे प्रेरणादायी विचार त्यांनी व्यक्त केले. यावेळी १० वी व १२ वी उत्तीर्ण विद्यार्थी मोठ्या संख्येने ॲड. शेख आमेर यांच्या कार्यालयात उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी आणि महापुरुषांचा इतिहास समजावा यासाठी ॲड. शेख आमेर यांनी सर्व विद्यार्थ्यांना शिवाजी कोण होता? हे पुस्तक भेट दिले. तसेच विद्यार्थ्यांचा पुष्पहार घालून सत्कार करून त्यांच्या भावी आयुष्यास शुभेच्छा देण्यात आल्या.

## रणजित गोणारकर यांना केळुसकर गुरुजी प्रेरणा पुरस्कार जाहीर

**नांदेड** -येथील सत्यशोधक विचार मंचाच्या वतीने दिला जाणारा केळुसकर गुरुजी प्रेरणा पुरस्कार माध्यमिक शिक्षक रणजित गोणारकर यांना जाहीर झाला आहे. गोणारकर यांची शैक्षणिक, सामाजिक, साहित्यिक तथा सांस्कृतिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन गेली पंचवीस वर्षे कार्यरत असलेल्या सत्यशोधक विचारमंचाने त्यांची निवड केली आहे. निवडीचे पत्र मंचाचे अध्यक्ष कोंडदेव हाटकर यांनी दिले. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे, २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, संयोजन समितीचे नागोराव डोंगरे यांची उपस्थिती होती. शहरात जून महिन्यात होणाऱ्या २१ व्या आंबेडकरवादी साहित्य संमेलनात रणजित गोणारकर यांना मान्यवरांच्या हस्ते सदरील पुरस्कार देऊन गौरवण्यात येणार असून पुरस्काराचे स्वरूप मानाचा फेटा, शाल, ग्रंथ, मानचिन्हे, सन्मानचिन्हे, गौरवपत्र असे राहणार आहे, असे संयोजन समितीच्या वतीने कळविण्यात आले आहे. रणजित गोणारकर हे उमरी तालुक्यातील बळेगाव येथे कृष्णाई माध्यमिक विद्यालयात कार्यरत आहेत. पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल मातोश्री भागाबाई डोंगरे प्रतिष्ठान उमरी व सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

# एसजीजीएस संस्थेतील १३६ शास्त्रज्ञांचा एडी सायंटिफिक इंडेक्स मध्ये समावेश

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १५ मे -**

श्री गुरु गोबिंद सिंघजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालयाने शैक्षणिक व संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करत संस्थेतील १३६ शास्त्रज्ञांचा प्रतिष्ठित एडी सायंटिफिक इंडेक्स एच-इंडेक्स रँकिंग २०२६ (ऊ -डलळशपींळषळल खपवशु -२०२६) मध्ये समावेश झाल्याचा मान मिळविला आहे.



महाराष्ट्रातील एका अभियांत्रिकी संस्थेमधून इतक्या मोठ्या संख्येने शास्त्रज्ञांचा समावेश होणे ही अत्यंत अभिमानाची बाब असून, यामुळे संस्थेची संशोधन क्षेत्रातील भरीव कामगिरी तसेच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक प्रभाव अधोरेखित झाला आहे. या शास्त्रज्ञांच्या यादीत संस्थेचे संचालक डॉ. मनेश ब. कोकरे, डॉ. अनिल गोंडे, डॉ. अभिजित नांदेडकर, डॉ. अरुण पाटील, डॉ. डी. डी. डोये, डॉ. जे. व्हि. मेघा, डॉ. माधव वैद्य, डॉ. मिलिंद भालेराव, डॉ. बी. आर. बोमडे ईत्यादी प्राध्यापकांचा समावेश आहे.

दि. १३ मे २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या या क्रमवारीत संशोधकांचे मूल्यमापन एच-इंडेक्स, सायटेशन्स, आय-१० इंडेक्स तसेच मागील पाच वर्षांतील संशोधन कार्य यांच्या आधारे करण्यात आले आहे. एडी सायंटिफिक इंडेक्समध्ये जगभरातील २२१ देशांतील २६ लाखांहून अधिक शास्त्रज्ञांचा समावेश आहे.

ही यशस्वी कामगिरी संस्थेच्या पुढील बाबींप्रती असलेल्या सातत्यपूर्ण बांधिलकीचे प्रतीक आहे

दर्जेदार संशोधन व नवोपक्रम, नामांकित संशोधन नियतकालिकांमध्ये प्रकाशने,आंतरशाखीय शैक्षणिक सहकार्य, संशोधनाभिमुख शैक्षणिक वातावरणाची निर्मिती.या यशातून संस्थेतील प्राध्यापक व संशोधकांचे ज्ञानवृद्धी, विज्ञान व तंत्रज्ञान विकासासाठीचे योगदान अधोरेखित झाले आहे.

संस्थेच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर्सचे मा. अध्यक्ष सुनील रायठठ्ठा, तसेच सदस्य श्री प्रशांत पोळ, प्रा. विक्रम गद्रे (आयआयटी मुंबई), निखिल मुंडले, संत बाबा सुखविंदर सिंघजी, सौ. राजश्रीताई पाटील, डॉ. डी. डी. डोये आणि डॉ. जे. व्ही. मेघा यांनी या उल्लेखनीय कामगिरीबद्दल सर्व १३६ शास्त्रज्ञांचे, प्राध्यापकांचे व संस्थेच्या प्रशासनाचे अभिनंदन केले आहे.महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ. विनोद मोहितकर यांनीही संस्थेच्या संशोधन क्षेत्रातील प्रगतीचे कौतुक करून सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन केले. संस्थेचे संचालक डॉ. मनेश कोकरे यांनी देखील सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन करून संस्थेची संशोधन संस्कृती व शैक्षणिक प्रतिष्ठा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर उंचावण्यासाठी त्यांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक केले. भविष्यातही संस्था संशोधन, नवोपक्रम व तांत्रिक शिक्षण क्षेत्रात अधिक मोठी यशे संपादन करेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

संस्थेतील सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, माजी विद्यार्थी व कर्मचारी यांनीही सर्व मानांकित शास्त्रज्ञांचे अभिनंदन करून संस्थेच्या लौकिकात भर घातल्याबद्दल अभिनंदन केले.

# विवाह सोहळ्यात २५१ संविधान ग्रंथांची भेट

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १५ मे -**

मौजे बरबडा ता. नायगाव येथे दि. १० मे रोजी केंद्रीय मुख्याध्यापक माधवराव रेडेवाड यांची सुकन्या चि.सौ. कां. मनीषा आणि श्रीमती सुनंदा अशोकराव जेठेवाड यांचे चि. अजिंक्य यांचा विवाह सोहळा अतिशय थाटात पार पडला. बरबडा येथील रेडेवाड व जेठेवाड परिवाराच्या मंगल प्रसंगी आजच्या काळातील दस्ती, टोपी, शाल, हार, तुरे या पारंपारिक पद्धतीला फाटा देत रेडेवाड व जेठेवाड परिवाराने वधू-वरांना शुभाशीर्वाद देण्यासाठी उपस्थित पाहुणे मंडळींना अतिशय आदराने कायदेशीररित्या मानवी मूल्यांचे रक्षण करणारा मौलिक ग्रंथ भारतीय संविधान २५१ मान्यवरांना भेट देऊन सन्मान केला.

ज्याअर्थी भारतीय जनतेचे हक्क आणि अधिकार कर्तव्ये प्रदान करणारे भारतीय संविधान प्रत्येकाच्या घरात उपलब्ध असावे, भारतीय जनतेचे सार्वभौमत्व, स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय हक्काचे संवर्धन करणारा मौलिक दस्तऐवज प्रत्येकानी अध्ययन करावा, असा सदहेतू मनी धरून रेडेवाड व जेठेवाड परिवाराच्या अभिनव उपक्रमांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

यावेळी सामाजिक कार्यकर्ते नागनाथराव घिसेवाड, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी, माजी जि.प. अध्यक्ष आनंदराव गुंडले, मनोज पाटील मोरे, सौ. शंकुतला भगवान मुदिराज नगराध्यक्ष उमरी, सामाजिक कार्यकर्ते शशिकांत भुसेवाड, नगरसेवक लक्ष्मण कंधारकर, बोईनवाड, बालाजी मदेवाड, शिक्षणाधिकारी दिलीपकुमार बनसोडे, शिक्षणाधिकारी मनपा प्रवीणा मांदळे, उपशिक्षणाधिकारी नागराज बनसोडे, शिवाजीराव नाईकवाडे, शिक्षकनेते विठ्ठलराव ताकबिडे, संजय कोठाळे, प्रल्हाद राठोड, व्यंकटराव गंदपवाड, चंद्रकांत गुंगेवाड, वसंतराव कलंबरकर, गिरीधारी मोळके, आनंदा रेजितवाड, मारोती बिचेवार, केरबा जेठेवाड, रोहिदास बस्वदे, जयवंत काळे, मारोती सांगवीकर, शंकर गालेवाड, डॉ. बालाजी आदमपूरकर, डॉ. विठ्ठल मेकेवाड, डॉ. संजय व्यंकटपूरवार, डॉ. रवी सुरेवाड, डॉ. अविनाश बुन्नावार, डॉ. तर्फेवाड, राम मालेवाड, आनंद मनाळकर, हनमंत मामीलवाड, गंगाधर कल्याणकर, दादाराव कोठेवाड, हनमंत उलिगडे आदींची उपस्थिती होती.

# मुदखेड तालुक्यातील दोन गावांची जनगणना स्वगणनेत शंभर टक्के कामगिरी

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १५ मे -**

देशभरात सुरू असलेल्या जनगणना-२०२७ प्रक्रियेत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना स्वगणना करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. दि. १ मे ते १५ मे २०२६ या कालावधीत सुरू असलेल्या या मोहिमेला नांदेड जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून, मुदखेड तालुक्यातील आमरापुर/दुधनवाडी व बोरगाव सीता या गावांनी शंभर टक्के स्वगणना पूर्ण करून आदर्श निर्माण केला आहे.



या उल्लेखनीय कामगिरीबद्दल प्रशासनाच्या वतीने संबंधित गावांतील नागरिकांचे अभिनंदन करण्यात आले आहे. तालुक्यातील इतर गावांनीही या गावांचा आदर्श घेऊन स्वगणना मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन तहसीलदार तथा चार्ज अधिकारी, तालुका मुदखेड आनंद देऊळगावकर यांनी केले आहे.

देशभरात सुरू असलेल्या जनगणना प्रक्रियेसाठी प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून त्यांना आवश्यक प्रशिक्षणही देण्यात आले आहे. या प्रक्रियेत अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नागरिकांना स्वतःची माहिती ऑनलाइन पद्धतीने नोंदविण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. या उपक्रमास नागरिकांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळत असल्याचे प्रशासनाने सांगितले.

सदर स्वगणना मोहीम जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी राहुल कर्डीले, निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा जनगणना अधिकारी किरण अंबेकर, उपविभागीय अधिकारी प्रवीण मेंगशेट्टी, तहसीलदार तथा चार्ज अधिकारी आनंद देऊळगावकर आणि नायब तहसीलदार तथा अतिरिक्त चार्ज अधिकारी मारोतराव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आली.

या मोहिमेत पर्यवेक्षक सविता पदमवार, आमरापुर/दुधनवाडी येथील प्रगणक छाया पाटील, बोरगाव सीता येथील प्रगणक ठाकूर (सहशिक्षक) यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. तसेच फिल्ड ट्रेनर गोविंद शिरुरकर व विद्याधर शेवाळकर, सरपंच नवनाथ कदम, माजी पोलीस पाटील नाईकवाडे, पोलीस पाटील भागवत कोल्हे, ग्राम महसूल अधिकारी गलांडे तसेच जनगणना शाखेतील कर्मचारी उल्हास जवळेकर आणि तांत्रिक सहाय्यक गोविंद शिंदे यांनी सहकार्य केले.

# इस्लापूर ग्रामपंचायत अधिकाऱ्यांवर वाढतोय जनआक्रोश; एकामागून एक कारनामे उघडकीस

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १५ मे -**

किनवट तालुक्यातील इस्लापूर ग्रामपंचायतीतील माहिती अधिकार प्रकरण आता चांगलेच तापले असून, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागविण्यात आलेली माहिती वारंवार आदेश देऊनही उपलब्ध करून न दिल्याने ग्रामपंचायत प्रशासनाविरोधात जनआक्रोश वाढत आहे. विशेष म्हणजे, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त अथवा छत्रछाया असल्यानेच कारवाई होत नसल्याचे आरोप आता गावकऱ्यांमधून उघडपणे केले जात आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, अपीलकर्त्याने १ जानेवारी २०२१ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीतील ग्रामपंचायतीअंतर्गत झालेली विकासकामे, वार्षिक अंदाजपत्रके, निधी खर्च, मंजूर कामे तसेच विविध प्रशासकीय कागदपत्रांची माहिती माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत मागविली होती. मात्र नियमानुसार माहिती उपलब्ध करून न दिल्याने अपीलकर्त्याने माहिती अधिकार कायदा २००५ च्या कलम १९(१) अन्वये दिनांक ३ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रथम अपील दाखल केले.

माहिती अधिकार कायद्यातील कलम ७(१) नुसार अर्जदारास ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असतानाही संबंधित ग्रामपंचायत प्रशासनाने माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

यानंतर अपीलकर्त्याने दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी गटविकास अधिकारी पंचायत समिती किनवट यांच्याकडे प्रथम अपील अर्ज दाखल केला. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी पंचायत समिती किनवट यांनी दिनांक २४ एप्रिल २०२६ रोजी पत्र निर्गमित करून दिनांक ४ मे २०२६ रोजी पंचायत समिती कार्यालयात सुनावणी ठेवली होती.

विशेष म्हणजे, अपीलकर्ते हे सुनावणीसाठी मुंबईहून उपस्थित राहिले; मात्र संबंधित ग्रामपंचायत अधिकारी सुनावणीस गैरहजर राहिल्याचे समोर आले. सुनावणीदरम्यान अपीलकर्त्याने मागणी केलेली कोणतीही माहिती ग्रामपंचायत प्रशासनाने उपलब्ध करून दिलेली नाही, अशी भूमिका मांडली.

सदर प्रकरणाची गंभीर दखल घेत प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी जनमाहिती अधिकारी ग्रामपंचायत इस्लापूर यांना माहिती अधिकार अधिनियम २०२६ नुसार मागितलेली संपूर्ण माहिती सात दिवसांच्या आत विनाविलंब व विनाशुल्क उपलब्ध करून देण्याचे स्पष्ट आदेश दिले होते. मात्र आदेशानंतरही अनेक दिवस उलटून गेले तरी माहिती उपलब्ध करण्यात आलेली नसल्याचा आरोप कायम आहे.

दरम्यान, इस्लापूर शहरात गेल्या काही काळात विविध विकासकामे, निधी खर्च, कथित नियमबाह्य कारभार तसेच वेगवेगळे प्रशासकीय कारनामे उघडकीस येत असल्याने ग्रामपंचायत प्रशासनाविषयी संशयाचे वातावरण अधिक गडद होत आहे. माहिती लपविण्यामागे नेमके काय दडले आहे? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

गावकऱ्यांमध्ये आता उघडपणे चर्चा सुरू असून, संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर वरिष्ठ अधिकाऱ्यांचा वरदहस्त किंवा छत्रछाया असल्यानेच आदेश असूनही कारवाई होत नाही, असे आरोप करण्यात येत आहेत. सामान्य नागरिकांना नियम दाखवले जातात; मात्र अधिकाऱ्यांसाठी वेगळे नियम आहेत का? असा संतप्त सवालही नागरिकांनी उपस्थित केला आहे.

कायद्यातील कलम २० नुसार माहिती देण्यास जाणीवपूर्वक टाळाटाळ करणे, माहिती लपविणे अथवा वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाचे पालन न करणे ही गंभीर बाब मानली जाते. अशा परिस्थितीत संबंधित जनमाहिती अधिकाऱ्यावर प्रतिदिन २५० रुपयांप्रमाणे कमाल २५ हजार रुपयांपर्यंत दंडात्मक कारवाईची तरतूद आहे.

स्थानिक स्तरावर न्याय न मिळाल्याने अखेर अपीलकर्त्यावर छत्रपती संभाजीनगर येथील माहिती आयोगाच्या खंडपीठाचे दार ठोठावण्याची वेळ आल्याचे बोलले जात असून, या संपूर्ण प्रकरणात वरिष्ठ प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेणार याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**माहिती अधिकार कायद्याचा सन्मान राखावा : अमोल पवार**

माहिती अधिकार कायदा हा सामान्य नागरिकांना प्रशासनाकडून पारदर्शकता मिळवून देणारा महत्त्वाचा कायदा आहे. मात्र इस्लापूर ग्रामपंचायतीकडून मागविलेली माहिती वारंवार आदेश देऊनही उपलब्ध करून दिली जात नसल्याने प्रशासनाची भूमिका संशयास्पद वाटत आहे. मी नियमानुसार अर्ज, प्रथम अपील तसेच सुनावणीची प्रक्रिया पूर्ण केली. मुंबईहून स्वतः उपस्थित राहूनही संबंधित अधिकारी गैरहजर राहिले, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी स्पष्ट आदेश दिल्यानंतरही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे आता या प्रकरणात माहिती आयोगाकडे दाद मागण्याशिवाय पर्याय उरलेला नाही. ग्रामपंचायतीतील विकासकामे, निधी खर्च आणि प्रशासकीय व्यवहार पारदर्शक असतील तर माहिती देण्यास टाळाटाळ का केली जाते? असा प्रश्न आता सर्वसामान्य नागरिकांनाही पडला आहे.

प्रशासनाने या प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधितांवर योग्य कारवाई करावी व माहिती अधिकार कायद्याचा सन्मान राखावा, हीच अपेक्षा असल्याचे अमोल पवार म्हणाले.

CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## ढोकीतील सोलार प्रोजेक्टमधून ७० हजारांचे केबल चोरी

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१५ मे -**

ढोकी येथील ७ एमव्ही सोलार प्रोजेक्टमधून अज्ञात चोरट्यांनी अर्थिंग केबल चोरी करून वायरचे नुकसान केल्याची घटना उघडकीस आली आहे.

दि. ८ मे २०२६ रोजी पहाटे १.३० ते २.०० वाजण्याच्या दरम्यान ढोकी येथील सर्वे नं. ६२ मधील सोलार प्रोजेक्ट परिसरात ही घटना घडली.

अज्ञात चोरट्यांनी प्रकल्पातील १२ इनव्हर्टरचे ५० स्केअर एमएम सीयू अर्थिंग केबल अंदाजे २४५ फूट लांबीचे, एकूण सुमारे ७० हजार रुपये किमतीचे साहित्य चोरून नेले.

याशिवाय डीसी केबल रेड आणि डीसी केबल ब्लॅक वायर तोडून कट करून नुकसान करण्यात आले असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी ज्ञानेश्वर मोहन केंचे (वय ३५, रा. ढोकी ता. जि. धाराशिव) यांनी दि. १४ मे रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून ढोकी पोलीस ठाणे येथे भारतीय न्याय संहिता कलम ३०३(२) व ३२४(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.



## संक्षिप्त वृत्त...



### पोलीस उपनिरीक्षक संजय शिंदे यांचा सत्कार

**लोहारा, दि.१५ मे -**

लोहारा शहरातील हाजी शब्बीर अहेमद अन्सारी बहुउद्देशीय सामाजिक संस्थेच्या वतीने संजय शिंदे यांचा सत्कार करण्यात आला. पोलीस उपनिरीक्षक पदावर पदोन्नती होऊन त्यांनी लोहारा पोलीस ठाण्यात रुजू झाल्यानिमित्त हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी संस्थेचे अध्यक्ष महेबुब फकीर, माजी उपनिरीक्षक रियाज पटेल, पोलीस कर्मचारी सतीश झिंगाडे, शेवाळे, रमेश रेनके, युसुफ कुरेशी, नामु कुंभार, सुरेश थोरात आदी उपस्थित होते.

### व्ही. पी. शैक्षणिक संकुलाच्या कृषि महाविद्यालयाचे कॅम्पस प्लेसमेंटमध्ये यश

**धाराशिव, दि.१५ मे -**

व्ही. पी. शैक्षणिक संकुलातील कृषि महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी कॅम्पस प्लेसमेंटमध्ये उल्लेखनीय यश मिळवत



आयसीआयसीआय बँकेत निवड मिळवली आहे. महाविद्यालयात आयोजित कॅम्पस प्लेसमेंट प्रक्रियेत अंतिम सत्रातील ३० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यापैकी वैष्णवी रमेश वाघ आणि अभिनव अंगद काळे यांची रिलेशनशिप मॅनेजर - फार्मर फायनान्स पदासाठी अंतिम निवड झाली. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना कृषी कर्ज, अवजारे कर्ज, सोनेतारण कर्ज व शेतकरी वित्तीय योजनांमध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. या निवडीबद्दल धनेश्वरी शिक्षण समूहाचे अध्यक्ष डॉ. प्रतापसिंह पाटील आणि करण प्रतापसिंह पाटील यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील, व्यवस्थापक प्रा. हरी घाडगे, प्लेसमेंट सेल प्रमुख डॉ. शेख मोहसीन यांच्यासह प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी विशेष सहकार्य केले.

### सुरज साळुंके यांची शिवसेनेच्या प्रभारी सहसंपर्कप्रमुखपदी नियुक्ती

**धाराशिव, दि.१५ मे -**

शिवसेनेचे सुरज साळुंके यांची धाराशिव लोकसभा प्रभारी सहसंपर्कप्रमुखपदी नियुक्ती करण्यात आली



आहे. पक्षाचे सचिव संजय मोरे यांनी नियुक्तीपत्र प्रदान केले. मुंबई येथे पालकमंत्री प्रतापराव सरनाईक यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक मजबूत करण्यासाठी कार्य करणार असल्याचे साळुंके यांनी सांगितले. जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना त्यांनी धाराशिव-कळंब मतदारसंघात शिवसेनेचे संघटन मजबूत केले असून त्यांच्या निवडीचे शिवसैनिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.



### लोहारात कायमस्वरूपी पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात

**लोहारा, दि.१५ मे -**

लोहारा शहरातील पाणीटंचाई कायमची दूर व्हावी या उद्देशाने मा. आमदार तथा शिवसेना उपनेते ज्ञानराज चौगुले यांच्या प्रयत्नांतून मंजूर झालेली पाणीपुरवठा योजना आता अंतिम टप्प्यात आली आहे. या योजनेच्या कामाची मुख्याधिकारी लक्ष्मण कुंभार, नगराध्यक्षा वैशाली खराडे, नगरअभियंता सुमित पाटील तसेच नगरसेवकांनी प्रत्यक्ष पाहणी केली. विहीर व पाइपलाइनचे काम युद्धपातळीवर सुरू असून लवकरच शहरवासीयांना मुबलक व नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होणार असल्याचे सांगण्यात आले. या महत्त्वाकांक्षी योजनेमुळे लोहारा शहरातील पाणीटंचाई दूर होऊन शहराच्या विकासाला चालना मिळणार आहे. आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या पाठपुराव्यामुळे हे काम अंतिम टप्प्यात पोहोचल्याने नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, नागरिकांकडून त्यांचे आभार मानले जात आहेत.

### वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर पोलिसांचा दणका

**धाराशिव, दि.१५ मे -**

धाराशिव शहर वाहतूक शाखा तसेच संबंधित पोलीस ठाण्यांच्या वतीने शहरातील महत्त्वाच्या रस्त्यांवर वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात विशेष मोहीम राबविण्यात आली. दि. १४ मे रोजी करण्यात आलेल्या या कारवाईदरम्यान मोटार वाहन कायदा व नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर एकूण १५६ कारवाया करण्यात आल्या. या कारवाईतून तब्बल १ लाख ८० हजार रुपयांचे तडजोड शुल्क वसूल करण्यात आले आहे.

# परंड्यात अतिक्रमण हटाव मोहिमेची धडक कारवाई

**मंडई पेठ व किल्ला परिसरातील टपऱ्या, बांधकामांवर बुलडोजर... प्रमुख मार्ग झाले मोकळे...**

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.१५ मे -**

परंडा शहरातील किल्ला परिसर, मंडई पेठ चौक परिसरात परंडा नगर परिषदेच्या अतिक्रमण प्रतिबंधक विभागाने शुक्रवारी (दि.१५ मे) मोठी कारवाई करत परिसरातील व्यावसायिक पानटपऱ्या तसेच छोटे-मोठे अतिक्रमित बांधकामे बुलडोजरच्या साह्याने जमीनदोस्त केली.






कारवाईदरम्यान काही अतिक्रमणधारक व अधिकाऱ्यांमध्ये काही काळ शाब्दिक चकमक झाली. मात्र विरोध झुगारून प्रशासनाने अखेर ही कारवाई पूर्ण केली. तर काही हातगाडी व्यावसायिकांनी स्वतः हून आपले अतिक्रमण हटवले. या मोहिमेमुळे झाकाळलेला मंडई पेठेतील रस्ता व परिसर मोकळा झाला आहे. या अतिक्रमणविरोधी कारवाईत परंडा नगर परिषद यांच्या मुख्याधिकारी मनीषा वडेपल्ली, तहसील कार्यालयाचे अधिकारी व कर्मचारी, परंडा पोलीस ठाणे येथील पोलीस अधिकारी-कर्मचारी तसेच नगर परिषदेचे कर्मचारी सहभागी झाले होते. अतिक्रमण हटाव मोहिमेमुळे किल्ला परिसरातील प्रमुख मार्ग मोकळे झाल्याने भाविक व पर्यटकांच्या वाहतुकीत मोठी सुधारणा होणार असून दर्शनासाठी आणि पर्यटनासाठी येणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

सार्वजनिक रस्त्यावर पुन्हा अतिक्रमण करू नये, असे आवाहन नगरपरिषद प्रशासनाने फेरीवाले व व्यावसायिकांना केले आहे. दरम्यान, आज ज्या पद्धतीने अतिक्रमण हटाव मोहीम राबविण्यात आली, त्याचप्रमाणे परंडा शहरातील बार्शी रोड, करमाळा रोड आणि कुर्डूवाडी रोड परिसरातील अतिक्रमणही हटवावे, अशी चर्चा नागरिकांमधून सुरू होती.

## धाराशिवच्या १३२ गावांत उभारणार 'आदर्श गाव' मॉडेल

**उद्योग, स्वच्छता, जलसंधारण आणि युवक सक्षमीकरणाचा समन्वित विकास आराखडा**

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मे -**

ग्रामीण भागाच्या सर्वांगीण विकासासाठी धाराशिव जिल्हा प्रशासनाने महत्त्वाकांक्षी पाऊल उचलले असून, पोखरा योजनेंतर्गत निवडलेल्या जिल्ह्यातील १३२ गावांमध्ये आता 'आदर्श गाव' अभियान राबविण्यात येणार आहे. शेतीपुरता मर्यादित न राहता उद्योग, जलसंधारण, युवक सक्षमीकरण, स्वच्छता आणि ग्रामविकास या सर्व बाबींना एकत्रित चालना देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे.

जिल्हाधिकारी कीर्ती किरण पुजार यांनी या गावांच्या विकासासाठी विशेष आराखडा तयार केला असून, पुढील दोन वर्षांत या गावांमध्ये विकासाची नवी चळवळ उभी करण्याचा संकल्प व्यक्त केला आहे. प्रशासन आणि लोकसहभाग यांच्या माध्यमातून ही गावे राज्यासाठी आदर्श ठरावीत, असा मानस त्यांनी व्यक्त केला.

या अभियानांतर्गत प्रत्येक गावात किमान दहा युवक उद्योजक तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

ग्रामीण युवकांना स्वावलंबी बनविण्यासाठी प्रक्रिया उद्योगांना प्रोत्साहन देण्यात येणार असून, दाल मिल, हळद व मिरची पावडर निर्मिती, ठिबक सिंचन योजना तसेच कृषीपूरक व्यवसायांसाठी प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाणार आहे. ग्रामीण अर्थव्यवस्थेला चालना देत रोजगारनिर्मिती वाढविण्यावर प्रशासनाचा विशेष भर राहणार आहे.

गावातील स्वच्छता, हागणदारीमुक्ती आणि आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्यासाठी ग्रामपंचायतींना सक्रिय भूमिका बजवावी लागणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. योजना केवळ कागदावर न राहता प्रत्यक्षात प्रभावीपणे राबविली जावी, यासाठी प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.

प्रत्येक गावासाठी एका अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात येणार असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविला जाणार आहे.

तलाठी, ग्रामसेवक, उमेद अभियानातील कर्मचारी तसेच स्थानिक यंत्रणांना सक्रिय सहभाग घ्यावा लागणार आहे. विशेष म्हणजे नियुक्त अधिकारी प्रत्येक १५ दिवसांत किमान एक दिवस संबंधित गावात मुक्कामी राहून ग्रामस्थांशी संवाद साधणार असून, विविध समस्यांचे तातडीने निराकरण करण्यावर भर दिला जाणार आहे.

ग्रामीण नागरिकांना शासकीय कामांसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजवावे लागू नयेत, यासाठी गावपातळीवर 'एक खिडकी योजना' राबविण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. कृषी, महिला व बालकल्याण, समाजकल्याण यांसह विविध विभागांच्या योजनांची माहिती आणि लाभ एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांचा वेळ, पैसा आणि प्रशासकीय त्रास मोठ्या प्रमाणात कमी होणार असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

### आर्ट ऑफ लिव्हिंग'चा सहभाग...

या उपक्रमात विविध सेवाभावी संस्थांचा सहभाग राहणार असून, विशेषतः rt of Living Foundation च्या स्वयंसेवकांची महत्त्वपूर्ण भूमिका असणार आहे. ग्रामस्थांना जीवनकौशल्य, सकारात्मक विचार, व्यक्तिमत्त्व विकास आणि सामाजिक बांधिलकी याबाबत प्रशिक्षण दिले जाणार आहे.

### ग्रामीण विकासाचा नवा पॅटर्न?...

पोखरा योजनेंतर्गत निवडलेल्या १३२ गावांमध्ये राबविण्यात येणारे हे अभियान जिल्ह्यासाठी ग्रामीण विकासाचा नवा पॅटर्न ठरू शकतो, अशी चर्चा सुरू झाली आहे. शेतीसोबत उद्योग, कौशल्य विकास, स्वच्छता, जलसंधारण आणि लोकसहभाग यांचा संगम साधत प्रशासनाने 'आदर्श गाव' उभारणीचा घेतलेला संकल्प आगामी काळात कितपत यशस्वी ठरतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## तुळजापूरातून सात लाखांची कार चोरी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मे -**

तुळजापूर शहरातून अंदाजे ७ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर कार अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना घडली आहे.

फिर्यादी जितेंद्र मधुसुदन भुमकर (वय ५६, रा. साळुंके गल्ली, तुळजापूर) यांच्या भाच्याची मारुती सुझुकी स्विफ्ट डिझायर (क्र. एमएच १२ एके ६३११) ही कार अज्ञात चोरट्यांनी लंपास केली. चोरीस गेलेल्या वाहनाची किंमत सुमारे ७ लाख रुपये असल्याचे सांगण्यात आले.


याप्रकरणी जितेंद्र मधुसुदन भुमकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविला आहे.

## भानसगावात घरफोडी; सोन्या-चांदीसह ६८ हजारांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मे -**

भानसगाव येथे अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून मोबाईल, घड्याळ तसेच सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण ६८ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे.

फिर्यादी किरण बबन लोंढे (वय ३२, रा. भानसगाव ता. जि. धाराशिव) यांच्या राहत्या घराच्या पाठीमागील उघड्या दरवाजातून अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश केला. दि. ११ मे २०२६ रोजी पहाटे ३ ते सकाळी ६ वाजण्याच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली.



चोरट्याने घरातील मोबाईल फोन, पॉवर बँक, टायटन कंपनीचे घड्याळ तसेच १२ ग्रॅम सोन्याचे व २२ ग्रॅम चांदीचे दागिने असा एकूण ६८ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला.

याप्रकरणी किरण बबन लोंढे यांनी दि.१४ मे रोजी दिलेल्या फिर्यादीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## मुरुम उपकेंद्रातून ४५ हजारांचे करंट ट्रान्सफॉर्मर चोरी


### अज्ञात चोरट्यांविरोधात पोलीसात गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मे -**

मुरुम येथील ३३/११ केव्ही उपकेंद्रातून ११ केव्ही करंट ट्रान्सफॉर्मर चोरी झाल्याची घटना उघडकीस आली असून अज्ञात चोरट्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दि. २३ एप्रिल २०२६ रोजी रात्री ११ वाजल्यापासून दि. २४ एप्रिल रोजी सकाळी ६ वाजेपर्यंत तसेच दि. ४ मे रोजी रात्री ११.३० ते दि. ५ मे रोजी सकाळी १० वाजण्याच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली. अज्ञात व्यक्तीने ३३/११ केव्ही उपकेंद्र मुरुम येथील सिटी ११ केव्ही करंट ट्रान्सफॉर्मर क्रमांक ९ चोरी करून नेला. चोरीस गेलेल्या साहित्याची किंमत अंदाजे ४५ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले.

याप्रकरणी फिर्यादी बशीर अहमद इसाक जमादार (वय ५३, व्यवसाय खाजगी नोकरी, रा. यशवंत नगर, मुरुम ता. उमरगा



जि. धाराशिव) यांनी दि. १४ मे २०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरून मुरुम पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

## भुममध्ये गावठी दारू जप्त; दोन महिलांवर गुन्हे

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१५ मे -**

भुम पोलिसांनी अवैध गावठी दारू विक्रीविरोधात कारवाई करत दोन महिलांविरुद्ध स्वतंत्र गुन्हे नोंदविले आहेत.

आरोपी कमलबाई किसन शिंदे (वय ५२, रा. वाकवड ता. भुम) यांच्या घरासमोरून अंदाजे २ हजार रुपये किमतीची २० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. तसेच आरोपी सिंधुबाई बलभिम काळे (वय ५८, रा. कल्याणनगर ता. भुम) यांच्याकडून कल्याणनगर रोडवर २० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली.

## पाणंद रस्त्यांमुळे शेतकऱ्यांना दिलासा : वाशी तालुक्यात पाणंद रस्ता योजनेच्या कामांना वेग

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.१५ मे -**

शेतरस्ते हे शेतकऱ्यांच्या दृष्टीने जीवनवाहिनी मानले जातात. शेतात जाण्यासाठी चांगले रस्ते उपलब्ध असतील तर मशागत, पेरणी, औषध फवारणी तसेच शेतमालाची वाहतूक वेळेत करणे शक्य होते. मात्र ग्रामीण भागातील अनेक पाणंद रस्ते गेल्या अनेक वर्षांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत असल्याने शेतकऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे.

अनेक ठिकाणी रस्त्यांवर झाडे-झुडपे वाढली असून पावसाळ्यात चिखलामुळे शेतात जाणे कठीण बनते. त्यामुळे ट्रॅक्टर, बैलगाडी तसेच ऊसासारख्या पिकांची वाहतूक करताना शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो.



वेळेवर शेतीची कामे न झाल्याने उत्पादनावरही परिणाम होत असल्याची भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांच्या या समस्या लक्षात घेऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सुरू केलेल्या मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेअंतर्गत धाराशिव जिल्ह्यातील वाशी तालुक्यात विविध रस्त्यांच्या कामांना सुरुवात करण्यात आली आहे. राज्याचे माजी आरोग्यमंत्री तथा आमदार तानाजी सावंत यांनीही ही योजना ग्रामीण भागातील प्रत्येक गाव व वाड्यापर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याचा निर्धार केला असून मतदारसंघात या कामांना गती देण्यात आली आहे. वाशी तालुक्याचे तहसीलदार प्रकाश मेहत्रे तसेच तेरखेडा जिल्हा परिषद गटाचे सदस्य विकी चव्हाण यांनी गुरुवारी (दि.१५ मे) परिसरातील पाणंद रस्त्यांची पाहणी करत शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी अनेक शेतकऱ्यांनी रस्त्यांच्या अभावामुळे शेतीची कामे करताना होणाऱ्या अडचणी मांडल्या. प्रशासनाकडून लवकरात लवकर रस्त्यांची कामे पूर्ण करण्याचे आश्वासन देण्यात आले.

यावेळी तलाठी प्रवीण पालके, बालाजी हलकरे, बालाजी घोलप तसेच ग्रामस्थ आणि शेतकरी उपस्थित होते.

## 'डिजिटल जनगणना'साठी प्रशासन सज्ज; लोहाऱ्यात जनगणना साहित्याचे वितरण

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१५ मे -**

देशातील १६ व्या भारतीय जनगणनेची प्रक्रिया आता गतिमान झाली असून, पहिल्या टप्प्यातील 'घरयादी व घरगणना' (Houselisting and Housing Census) या कामासाठी प्रशासनाने कंबर कसली आहे. २०२७ मधील मुख्य जनगणना ही देशातील पहिली 'डिजिटल जनगणना' ठरणार असल्याने याकडे विशेष महत्त्वाने पाहिले जात आहे.

जनगणना प्रक्रिया दोन टप्प्यांत पार पडणार असून, पहिल्या टप्प्यात घरांची यादी तयार करणे, घरांची स्थिती तसेच उपलब्ध सोयी-सुविधांची माहिती संकलित केली जाणार आहे. दुसऱ्या टप्प्यात फेब्रुवारी २०२७ मध्ये प्रत्यक्ष लोकसंख्या गणना करण्यात येणार आहे. यंदाच्या जनगणनेत प्रथमच प्रगणकांकडून कागदी अर्जांऐवजी विशेष विकसित मोबाईल पचा वापर करून घरोघरी माहिती संकलित केली जाणार आहे. त्यामुळे माहिती अधिक अचूक आणि जलद गतीने नोंदवली जाणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.या राष्ट्रीय कार्यासाठी तालुक्यातून २१७ प्रगणक व पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आली असून, त्यांना डिजिटल प्रणाली हाताळण्याचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले आहे. पहिल्या टप्प्यात घराचे स्वरूप

### २१७ प्रगणकांना विशेष प्रशिक्षण

(कच्चे किंवा पक्के), पिण्याच्या पाण्याची सोय, वीज, शौचालयाची उपलब्धता, स्वयंपाकासाठी वापरले जाणारे इंधन तसेच कुटुंबाकडे असलेली मालमत्ता जसे सायकल, कार, टीव्ही, इंटरनेट आदींबाबत साधारण १ ते ३३ प्रश्न विचारले जाणार आहेत.

जनगणनेचे साहित्य वितरण तहसील कार्यालय लोहारा येथे तहसीलदार रणजितसिंह कोळेकर यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नायब तहसीलदार रतन काजळे, अनिल अहिरे, महेश कुलकर्णी, वजीर अत्तार, जनगणना पर्यवेक्षक भिमाशंकर डोकडे तसेच जनगणना नियंत्रण कक्ष टीममधील सिद्धेश्वर बिराजदार, नयन शेख, जगताप, मोरे, कोरे, राठोड आदी उपस्थित होते.

**CHANGE IN NAME**

I have change my name from **BARKUL KAILASH ACHYUT TO KAILAS ACHYUT BARKUL.** Hence for this declaration in future I will use this name KAILAS ACHYUT BARKUL, the same Name will be used by wife and Children.

OLD NAME:- **BARKUL KAILASH ACHYUT**

NEW NAME:- **KAILAS ACHYUT BARKUL**

ADDRESS:- YERMALA, OSMANABAD, MAHARASHTRA - 413525.